Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 20TH JANUARY 1898.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### स्टांपासंबंधी कायदा एकत्र करून सुधारण्याबाबतच्या आक्टाचा मसुदा.

अनुक्रमणिका.

कलमें.

बाब १.

प्रथमारंभींचे नियम.

१. लहान सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

२. व्याख्या.

बाब २.

स्टांपड्यूटी.

अ.—ड्यूटीबाबद दस्तऐवजांची पात्रता याविषयीं.

३. ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारे दस्तऐवज.

४. एकाच कामांत उपयोग केलेले कित्येक दस्तऐवज.

५. कित्येक भिन्न भिन्न बाबतींसंबंधी दस्तऐवज.

६. १ ले परिशिष्टांतील निरनिराळ्या व्याख्या लागू असणारे दस्तऐवज.

७. समुद्राचे विमाच्या पालिसी.

८. सन १८७९ च्या ११ व्या आक्टाअन्वयें पैका कर्जी घेण्यासंबंधी काढलेले बांड, डिबेंचर किंवा इतर सिक्युरिटी.

कलमें.

९. ड्यूटीचे दर कमी किंवा माफ करण्याचा किंवा तोडजोड करण्याचा अधिकार.

ब.—स्टांप व त्यांचा उपयोग करण्याची रीति यांविषयीं.

१०. ड्यूटी कशा द्याव्या.

११. चिकटणारे स्टांपांचा उपयोग.

१२. चिकटणारे स्टांप रद्द करणें.

१३. वठविलेले स्टांप मारलेले कागदावर दस्तऐवज कसे लिहावे.

१४. एका स्टांपावर एकच मात्र दस्तऐवज असावा.

१५. १३ वे किंवा १४ वे कलमाविरुद्ध रीतीनें लिहिलेला दस्तऐवज वगरस्टांपाचा आहे असें समजावें.

१६. ड्यूटी दर्शविणें.

क.—दस्तऐवजांवर स्टांप मारण्याचे वेळेबाबद.

१७. ब्रिटिश इंडियांत करून द्यावयाचे दस्तऐवज.

१८. बिलें व चेक व नोटी यांखेरीज इतर दस्तऐवज ब्रिटिश इंडियाबाहेर करून दिलेले असतील ते.

कलमें.

१९. ब्रिटिश इंडियाबाहेर लिहिलेलीं बिलें व चेक व नोटी.

ड.—ड्यूटीसाठीं किंमत करण्याबाबद.

२०. पारके चलनी नाण्यांत लिहिलेले रकमेचा दुसरे नाण्यांत हिशोब करणें.

२१. स्टाकची व बाजारांत विकतां येते असे सिक्यूरिटीची किंमत करणें.

२२. वटावाचा दर किंवा भावाचा अजमास लिहिल्याचें फळ.

२३. व्याज मिळावयाचे दस्तऐवज.

२४. कर्जाचे ऐवजीं ट्रान्सफर असेल त्यावर किंवा पुढें ऐवज द्यावयाचा ही गोष्ट वगैरे लागू असणारे ट्रान्सफरावर ड्यूटी कशी चार्ज करावी.

२५. आन्यूइटी वगैरेंचे प्रसंगीं किंमत करणें.

२६. विषयाची किंमत ठरवितां येत नसेल तेव्हां स्टांप.

२७. ड्यूटी कमजास्त करणाऱ्या गोष्टी दस्तऐवजांत लिहिणें.

२८. कित्येक कन्वेयन्सांचे प्रसंगीं ड्यूटीबाबद हुकुम.

ई.—ड्यूटी कोणीं द्यावी.

२९. ड्यूटी कोणीं द्यावी.

३०. कांहीं प्रसंगीं पावती देण्याची आवश्यकता.

---

## बाब ३.

### स्टांपांबाबद ठराव करणें.

३१. योग्य स्टांप कोणता याबाबद ठराव करणें. विशेष ठराव.

३२. कलेक्टरानें देण्याचें सर्टिफिकेट.

---

## बाब ४.

### योग्य रीतीनें स्टांप न मारलेले दस्तऐवज.

३३. दस्तऐवज तपासणें व अटकावून ठेवणें.

३४. स्टांप नसलेल्या पावत्यांसंबंधीं विशेष ठराव.

कलमें.

३५. योग्य रीतीनें स्टांप न मारलेले दस्तऐवज पुरावा वगैरेस घेण्याचा अधिकार नाहीं.

ड्यूटी व दंड दिला असतां दस्तऐवज ग्राह्य होतील;

आणि फौजदारी चालविलेले कित्येक कामांत;

आणि सरकारानें किंवा सरकारच्या वतीनें केले असतील तेव्हां.

३६. दस्तऐवज घेतल्याबाबद तकरार केव्हां काढू नये.

३७. अयोग्य स्टांप असलेले दस्तऐवज घेणें.

३८. अटकावून ठेवलेले दस्तऐवजांबदल कशी व्यवस्था करावी.

३९. कलम ३८, पोटकलम (१), याअन्वयें दिलेला दंड परत देण्याचा कलेक्टराचा अधिकार.

४० अटकावून ठेवलेले दस्तऐवजांवर स्टांप मारण्याचा कलेक्टराचा अधिकार.

४१. अपायामुळें योग्य रीतीनें स्टांप न मारलेले दस्तऐवज.

४२. ज्या दस्तऐवजाची ३९ वे किंवा ४० वे किंवा ४१ वे कलमाअन्वयें ड्यूटी दिली असेल त्या दस्तऐवजावर शेरा.

४३. स्टांपाचे कायद्याविरुद्ध केलेले अपराधाबद्दल खटला करणें.

४४. ड्यूटी किंवा दंड देणारे मनुष्यांस ती किंवा तो कांहीं प्रसंगीं वसूल करण्याचा अधिकार आहे.

४५. कित्येक प्रसंगीं दंड माफ करण्याचा किंवा परत देण्याचा अगर फाजील ड्यूटी परत देण्याचा रेवेन्यू अधिकाऱ्यास अधिकार.

३९ वे किंवा ४० वे कलमाअन्वयें दिलेले दंडाची माफी.

४६. ३८ वे कलमाअन्वयें पाठविलेले दस्तऐवज हरवल्याबद्दल जबाबदारी नाहीं.

सदर्हूप्रमाणें पाठवावयाचे दस्तऐवजाची नकल करण्याचा अधिकार आहे.

४७. ऐवज देणारास वगर स्टांपाचीं बिलें व चेक पोंहोंचतील त्यांवर स्टांप लावण्याचा त्याचा अधिकार.

४८. ड्यूटी व दंड वसूल करणें.


---

कलमें.

## बाब ५.

### कित्येक प्रसंगीं स्टांपांबद्दल मोबदला.

४९. बिघडलेले स्टांपांबद्दल मोबदला.

५०. दाद मिळण्यासाठीं अर्जी केव्हां केली पाहिजे.

५१. मंडळ्यांस पुढें जरूर नसलेले छापील नमुन्यांचे प्रसंगीं मोबदला.

५२. करावयाचा तो उपयोग न केलेले स्टांपांबदल मोबदला.

५३. बिघडलेले व करावयाचा तसा उपयोग न केलेले स्टांपांबदल मोबदला कसा द्यावा.

५४. उपयोग करण्यासाठीं ज्या स्टांपाची जरूर नसेल त्या स्टांपाबदल मोबदला.

५५. कित्येक डिबेंचर नवे केल्यावर मोबदला.

---

## बाब ६.

### लिहून पाठविणें व तपासणी.

५६. (१) मुख्य रेव्हिन्यू अधिकाऱ्याचा निर्बंध.

(२) चार्ज होण्यास पात्र असणारे ड्यूटीविषयीं कलेक्टरास संशय येईल तेव्हां काम चालविण्याची रीति.

५७. रेव्हेन्यू अधिकाऱ्यानें है कोर्टास लिहून पाठविणें.

५८. आणखी तपशील मागविण्याचा कोर्टाचा अधिकार.

५९. लिहून आलेल्याचा निकाल करण्यांत काम चालविण्याची रीति.

६०. दुसरे कोर्टांनीं है कोर्टास लिहून पाठविणें.

६१ स्टांपाचे पुरतेपणाबाबद कोर्टाचे कित्येक फैसल्यांची तपासणी.

---

## बाब ७.

### फौजदारी गुन्हे व काम चालविण्याची रीति.

६२. योग्य रीतीनें स्टांप न मारलेला दस्तऐवज करून दिल्याबदल दंड.

कलमें.

६३. चिकटणारा स्टांप रद्द करण्यास चुकल्याबदल दंड.

६४. २७ वे कलमांतील ठरावांप्रमाणें करण्याचें वर्जिलें असतां दंड.

६५. पावती देण्यास नाहीं म्हटल्याबदल व पावत्यांबदलची ड्यूटी टाळण्याची युक्ति केल्याबदल दंड.

६६. पालिसी न करण्याबदल दंड.

किंवा जी कोणतीही पालिसी योग्य रीतीनें स्टांप मारलेली नसेल ती करणें वगैरेबदल.

६७. ज्या बिलांचे किंवा मरीन पालिसींचें सेट म्हणून असतील त्या बिलांच्या किंवा मरीन पालिसींच्या संपूर्ण प्रती न लिहिल्याबदल दंड.

६८. बिलावर पुढली तारीख घालणें वगैरेबदल दंड.

महसूल बुडण्याची इतर युक्ति केल्याबदल.

६९. स्टांपाचे विकरीसंबंधी कानू तोडल्याबदल व हुकुमावांचून विकरी केल्याबदल शिक्षा.

७०. फिर्याद करणें व चालविणें.

७१. माजिस्ट्रेटांची हुकुमत.

७२. इनसाफाची जागा.

---

## बाब ८.

### पुरवणीचे ठराव.

७३. बुकें वगैरे पाहणीसाठीं खुलीं असणें.

७४. स्टांपाचे विक्रीसंबंधी कानू करण्याचा अधिकार.

७५. हा आक्ट साधारणतः अमलांत आणण्यासाठीं कानू करण्याचा अधिकार.

७६. कानू प्रसिद्ध करणें.

७७ कोर्ट-फींचा बचाव.

७८. आक्टाचें भाषांतर करणें व स्वस्त विकणें.

७९. रद्द करणें.

परिशिष्ट १ लें.—दस्तऐवजांवरची स्टांपड्यूटी.

परिशिष्ट २ रें.—आक्ट रद्द केले ते.

## स्टांपासंबंधी कायदा एकत्रकरून सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

### बाब १.

### प्रथमारंभींचे नियम.

१. (१) या आक्टास " सन १८९८ चा हिंदुस्तानचा स्टांप आक्ट " असें ह्मणावें. लहान सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) हा आक्ट, उत्तर ब्रह्मदेश, ब्रिटिश बलुचिस्थान, संताल परगणे व स्पिटी परगणा यांसुद्धां, सगळे ब्रिटिश इंडियास लागू आहे; आणि

(३) हा आक्ट सन १८९८ चे एप्रिल महिन्याचे पहिले तारिखेस अमलांत येईल.

२. या आक्टांत विषयावरून किंवा संदर्भावरून बाध येत नसेल तर— व्याख्या.

(१) " सावकार " या शब्दांत ब्यांकेचा व सावकार ह्मणून काम करणारे कोणतेही मनुष्याचा समावेश होतो;

(२) " बिल आफ् एक्श्चेंज " या शब्दांत हुंडीचा, व कोणत्याही मनुष्यास, कोणत्याही दुसऱ्या मनुष्याकडून पैशाची कोणतीही रकम मिळण्याचा, अगर ती दुसऱ्या कोणत्याही मनुष्याकडे मागण्याचा हक्क ज्यावरून प्राप्त होतो किंवा होतो असें दिसतें त्या कोणत्याही दुसऱ्या दस्तऐवजाचा समावेश होतो: मग त्यांत सदरील पहिल्या मनुष्यानें नांव लिहिलेलें असो किंवा नसो;

(३) " मागितल्याबरोबर ऐवज द्यावयाचें बिल आफ् एक्श्चेंज" या शब्दांत —

(अ) बिल आफ् एक्श्चेंजनें किंवा प्रामिसरी नोटीनें पैशाची कोणतीही रकम देण्याबद्दल, अगर पैशाच्या कोणत्याही रकमेच्या फेडीकरितां कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा प्रामिसरी नोट स्वाधीन करण्याबद्दल, अगर कोणत्याही विशिष्ट फंडामधून, अगर कोणत्याही शर्तीवर अगर दैवघटित गोष्टीच्या अटीवर, पैशाची कोणतीही रकम देण्याबद्दल, दिलेल्या आर्डरीचा समावेश होतो : मग त्या फंडांतून ती रकम मिळण्यासारखी असो किंवा नसो, किंवा ती शर्त पाळण्यांत येवो किंवा न येवो, किंवा ती दैवघटित गोष्ट घडो किंवा न घडो, आणि

(ब) आठवड्यानें, महिन्यानें किंवा दुसऱ्या कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या मुदतींनीं, पैशाची कोणतीही रकम देण्याबद्दल दिलेल्या आर्डरीचा, व तसेंच जी आर्डर तिच्या तारखेनंतर कोणत्याही वेळीं कोणत्याही मनुष्यानें पैशाची कोणतीही रकम देण्याबद्दल दिलेली असून जी, ती देणाऱ्या मनुष्यानें, ज्यानें ती रकम द्यावयाची त्या मनुष्याला पाठविलेली किंवा दिलेली असेल, व ज्यास ती रकम द्यावयाची त्या मनुष्याला किंवा त्यांच्या वतीच्या कोणत्याही मनुष्याला पाठविलेली किंवा दिलेली नसेल त्या आर्डरीचाही समावेश होतो;

(४) " बिल आफ् लेडिंग " या शब्दांत " थेटपर्यंतचें बिल आफ् लेडिंग " याचा समावेश होतो;

(५) " बांड " (खत) या शब्दांत खालील दस्तऐवजांचा समावेश होतो:—

(अ) अमुक निर्दिष्ट केलेलें काम केलें किंवा न केलें (जसें असेल तसें) तर हा दस्तऐवज रद्द होईल असे शर्तीनें ज्या दस्तऐवजावरून कोणी

मनुष्य दुसऱ्यास पैका देण्याचें आपणास अवश्य पाडून घेतो असा कोण ाही दस्तऐवज ;

(ब) कोणतेही दस्तऐवजावर साक्षीदारानें साक्ष घातलेली असेल व अमक्यास ऐवज द्यावा किंवा आणणारास ऐवज द्यावा असे प्रकारचा तो दस्तऐवज नसेल आणि त्यावरून कोणी मनुष्य दुसरे मनुष्यास पैका देण्याचें आपणास अवश्य पाडून घेतो तसा कोणताही दस्तऐवज ; आणि

(क) सदर्हूप्रमाणें साक्षी घातलेले ज्या कोणतेही दस्तऐवजावरून एक मनुष्य दुसरे मनुष्यास धान्य किंवा शेतकीचें इतर उत्पन्न देण्याचें आपणास अवश्य पाडून घेतो तसा कोणताही दस्तऐवज :

(६) " चार्ज होण्यास पात्र " या शब्दांचा अर्थ खालीं लिहिल्याप्रमाणें समजावा, ह्मणजे ते शब्द जेव्हां या आक्टाच्या सुरुवातीनंतर सह्या करून दिलेले दस्तऐवजास किंवा पहिल्यानें (दस्तऐवज करून देणारांपैकीं कोणाची) सही झालेले दस्तऐवजास लागू केले असतील, तेव्हां या आक्टाअन्वयें चार्ज होण्यास पात्र असा त्यांचा अर्थ समजावा, आणि इतर कोणतेही दस्तऐवजास लागू केलेले असतील तेव्हां तो दस्तऐवज करून दिल्याचे वेळीं, किंवा तो दस्तऐवज अनेक मनुष्यांनीं निरनिराळे वेळीं सही करून दिलेला असेल, तर त्यावर ज्या वेळीं पहिल्यानें (दस्तऐवज करून देणारांपैकीं कोणाची) सही झाली त्या वेळीं, ब्रिटिश इंडियांत चालू असणारे कायद्याअन्वयें चार्ज होण्यास पात्र असा त्यांचा अर्थ समजावा :

(७) "चेक" या शब्दाचा अर्थ, जें बिल आफ् एक्श्चेंज निर्दिष्ट केलेल्या सावकारावर लिहिलें असेल व मागितल्याबराबर ऐवज देण्याखेरीज तो इतर रीतीनें देण्याविषयीं ज्यांत लिहिलेलें नसेल तें बिल आफ् एक्श्चेंज, असा समजावा :

(८) " निर्बंध ठेवणारा मुख्य रेव्हेन्यू अधिकारी " या शब्दांचा अर्थ,

(अ) मद्रास इलाक्यांत व ज्या मुलकाचा राज्यकारभार बंगालचे व वायव्यप्रांताचे लेफ्टेनेंट गव्हरनर व अयोध्याप्रांतांचे मुख्य कमिशनर चालवितात त्या मुलकांत, रेव्हेन्यू बोर्ड,

(ब) मुंबई इलाक्यांत सिंधच्या बाहेर व मुंबई शहराचे हद्दींबाहेर, रेव्हेन्यू कमिशनर,

(क) सिंध येथें तेथील कमिशनर,

(ड) पंजाबांत व उत्तर ब्रह्मदेशासुद्धां ब्रह्मदेशांत, फिन्यानशियल कमिशनर, आणि

(इ) इतर ठिकाणीं, स्थानिक सरकार, किंवा स्थानिक सरकार सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून ज्या अमलदारास याबाबद नेमील तो इतर अमलदार,

असा समजावा :

(९) " कलेक्टर "

(अ) या शब्दाचा अर्थ, कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांचे हद्दींत अनुक्रमें, कलकत्याचा, मद्रासचा व मुंबईचा कलेक्टर, असा समजावा, आणि त्या हद्दींचे बाहेर, जिल्ह्याचा कलेक्टर असा समजावा, आणि

(ब) त्या शब्दांत डेप्युटी कमिशनरचा व स्थानिक सरकार सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून ज्या कोणतेही इतर अमलदारास याबाबद नेमील त्या इतर अमलदारांचा समावेश होतो असे समजावें :

( १० ) " कन्वेयन्स " या शब्दाचा अर्थ " विक्री करून कन्वेयन्स " असा होतो, व त्या शब्दांत स्थावर किंवा जंगम मालमिळकत विक्रीनें ज्या कोणतेही दस्तऐवजावरून तबदील करण्यांत येते अशा हरएक दस्तऐवजाचा समावेश होतो :

( ११ ) "योग्य रीतीनें स्टांप असलेला" हे शब्द कोणतेही दस्तऐवजास लागू केले असतील तेव्हां त्या शब्दांचा अर्थ, त्या दस्तऐवजास योग्य रकमेहून कमी नसलेला चिकटणारा किंवा वठविलेला स्टांप आहे व तो स्टांप ब्रिटिश इंडियांत त्या त्या वेळीं अमलांत असेल त्या कायद्याप्रमाणें लावला अगर उपयोगांत आणला आहे, असा होतो :

( १२ ) " करून दिलेला " या शब्दांचा दस्तऐवजांच्या संबंधानें उपयोग केला असेल तेथें त्यांचा अर्थ, " सही केलेला," असा होतो :

( १३ ) " दस्तऐवज " या शब्दांत ज्या दस्तऐवजाच्या योगानें कोणताही हक्क किंवा पात्रता उत्पन्न होते किंवा होते असें दिसतें किंवा तबदील केलेली, मर्यादित केलेली, नष्ट झालेली किंवा लिहिलेली आहे, किंवा आहे असें दिसतें, अशा हरएक दस्तऐवजाचा समावेश होतो :

( १४ ) "इन्स्ट्रुमेंट आफ् पार्टिशन " या शब्दांचा अर्थ, ज्या कोणतेही दस्तऐवजावरून सामायिक मालक कोणतेही मिळकतीचे पृथक् विभाग करतात किंवा करण्याचें कबूल करतात तो दस्तऐवज, असा समजावा, आणि त्या शब्दांत, वांटणी करण्याविषयीं कोणतेही रेव्हेन्यू अधिकाऱ्यानें अगर कोणतेही दिवाणी कोर्टानें केलेले अखेरचे हुकुमाचाही समावेश होतो :

( १५ ) " लीस " या शब्दाचा अर्थ, स्थावर मिळकतीचा पटा असा समजावा, व त्या शब्दांत खालीं लिहिलेले शब्दांचाही समावेश होतो :—

(अ) पटा.

(ब) स्थावर मिळकतीची लागवड करण्याविषयीं किंवा तिचा उपभोग करण्याविषयीं किंवा तिचें भाडें अदा करण्याविषयीं किंवा देण्याविषयीं कबुलायत केली असेल किंवा इतर रीतीनें लेखी पतकरलें असेल व जी किंवा जो लीसाचा उलट लेख नसेल ती कबुलायत किंवा तो पतकरल्याचा इतर लेख.

(क) ज्या कोणतेही दस्तऐवजावरून कोणतेही प्रकारचे टोल मक्त्यानें दिले असतील तो दस्तऐवज,

(ड) ज्या दस्तऐवजावरून, अन्नाचा किंवा पिण्याचा पदार्थ उत्पन्न करण्याकरितां झाडें लीसनें दिलीं जातात तो दस्तऐवज, आणि

(इ) लीस मिळण्याविषयीं केलेले अर्जावर लिहिलेला कोणताही लेख, जो ती अर्जी मंजूर करण्यांत आली आहे असें दर्शविण्यासाठीं योजलेला असेल तो :

(१६) " गहाणखत " या शब्दांत ज्या ज्या दस्तऐवजावरून कर्जाऊ ऐवज म्हणून धिरलेला किंवा धिरावयाचा पैका किंवा विद्यमान किंवा पुढें होणारें कर्ज किंवा कोणताही करार पुरा करणें येणेंप्रमाणें निश्चित करण्यासाठीं कोणी मनुष्य निर्दिष्ट केलेले मिळकतीवर हक्क दुसरे मनुष्यास करून देतो किंवा उत्पन्न करतो त्या दस्तऐवजाचा समावेश होतो :

(१७) " कागद " या शब्दांत ज्या विलम्वर किंवा पार्चमेंटावर ( चांमड्यावर) किंवा इतर कोणतेही पदार्थावर दस्तऐवज लिहितां येतो त्याचा समावेश होतो असें समजावें.

(१८) "विम्याची पालिसी" या शब्दांत खालील लेखांचा समावेश होतोः—

(अ) सलामतीचे ऐवजीं कोणी मनुष्य अज्ञात किंवा दैवघटित गोष्टीनें होणारे तोट्यापासून किंवा नुकसानीपासून किंवा येणारे पेंचांतून दुसऱ्यास निजोखमी करण्याचें ज्या कोणतेही दस्तऐवजावरून कबूल करतो तो दस्तऐवज;

(ब) लैफ-पालिसी, व अपघात किंवा आजार याविरुद्ध कोणत्याही मनुष्याचा विमा उतरणारी कोणतीही पालिसी, व दुसरा कोणताही शरीरसंबंधी विमा, आणि

(क) ज्या आगीच्या विम्याच्या पालिसीबद्दल व ती पालिसी पूर्वी नवीन केली असल्यास त्याबद्दल, ती पालिसी मूळचीच साहा महिन्यांहून अधिक मुदतीची दिली असती तर जी स्टांपड्यूटी पडली असती ती स्टांप-ड्यूटी आर्धीच दिलेली नाहीं अशी पालिसी चालू ठेवण्यासाठीं ती नवीन केल्याबद्दलच्या पुराव्यादाखल असणारा कोणताही लेख;

(१९) "समुद्राच्या विम्याची पालिसी" किंवा "सी-पालिसी,"

(अ) याचा अर्थ, कोणत्याही तारवावर अगर जहाजावर अथवा कोणत्याही तारवाच्या अगर जहाजाच्या यंत्रावर अगर डोलकाठ्या, शिडें, इत्यादि सामानसरंजामावर, अगर कोणत्याही तारवांतल्या किंवा जहाजांतल्या कोणत्याही प्रकारच्या मालावर, व्यापारी जिन्नसांवर अगर मिळकतीवर, अगर कोणत्याही तारवाच्या किंवा जहाजाच्या नोरावर, अगर कोणत्याही तारवांतल्या अगर जहाजांतल्या अगर त्यासंबंधाच्या ज्या कोणत्याही इतर हितसंबंधाचा कायदेशीर रीतीनें विमा उतरतां येईल त्या हितसंबंधावर उतरलेला कोणताही विमा, आणि

(ब) तींत मालाच्या, व्यापारी जिन्नसांच्या अगर मिळकतीच्या कोणत्याही खेपेबद्दल उतरलेल्या विम्याचा समावेश होऊन, त्या विम्यांत केवळ समुद्राच्या धोक्याबद्दलच नव्हे, परंतु अशा खेपेच्या सुरवातीपासून तों विमा लागू असणाऱ्या शेवटच्या जागेस पोंहचण्यापर्यंतच्या अशा खेपेसंबंधाच्या इतर कोणत्याही धोक्याचाही समावेश होतो.

जेव्हां कोणताही मनुष्य, जादा नोराबद्दल अगर इतर रीतीनें दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या कोणत्याही रकमेच्यामोबदला, कोणत्याही तारवावरील अगर जहाजावरील कोणत्याही प्रकारच्या मालाची, व्यापारी जिन्नसांची अगर मिळकतीची जोखीम, तो माल, ते जिन्नस अगर ती मिळकत त्या तारवावर अगर त्या जहाजावर असे तोंपर्यंत, आपल्या शिरावर घेण्याचें कबूल करील, अगर अशा कोणत्याही मालाच्या, व्यापारी जिन्नसांच्या अगर मिळकतीच्या मालकास जी कोणतीही जोखीम, तोटा किंवा नुकसान होईल तें भरून देण्याचें पतकरील, तेव्हां असा करार किंवा कबुलायत समुद्राच्या विम्याचा करार आहे असें समजलें पाहिजे :

(२०) "मुखत्यारनामा" या शब्दांत (कोर्टफीसंबंधी ज्या वेळीं जो कायदा अमलांत असेल त्या कायद्याअन्वयें चार्ज होण्यास पात्र नसणारे दस्तऐवजाखेरीज इतर) ज्या कोणतेही दस्तऐवजावरून निर्दिष्ट केलेले मनुष्यास काम करण्याचा अधिकार तो दस्तऐवज करून देणारे मनुष्याचे बदला व त्याचे नांवें प्राप्त होतो तशा कोणत्याही दस्तऐवजाचा समावेश होतो :

(२१) "प्रामिसरी नोट" या शब्दांत, ज्या दस्तऐवजांत पैक्याची कोणतीही रकम देण्याचें वचन दिलेलें असेल अशा (ब्यांक नोट, करन्सी नोट, बाँड अगर डिबेंचर खेरीज करून) कोणत्याही दस्तऐवजाचा समावेश होतो.

ज्या नोटीमध्यें कोणत्याही विशिष्ट फंडामधून,अगर कोणत्याही शर्तीवर किंवा दैवघटित गोष्टीवर, पैक्याची कोणतीही रकम देण्याचें वचन दिलेलें असेल ती नोट पैशाच्या त्या रकमेपुरती प्रामिसरी नोट आहे, असें समजलें पाहिजे: मग त्या फंडांतून ती रकम मिळण्यासारखी असो किंवा नसो, किंवा ती शर्त पाळण्यांत येवो किंवा न येवो, किंवा ती दैवघटित गोष्ट घडो किंवा न घडो:

(२२) "पावती" या शब्दांत ज्या कोणतेही टांचणावरुन, यादीवरून, किंवा लेखावरून,—

(अ) कोणताही पैका, किंवा कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज, चेक किंवा प्रामिसरी नोट पोंहचल्याचें कबूल केलें असेल, अथवा

(ब) कर्जाचे फेडींत कोणताही इतर जंगम माल पोंहचल्याचें कबूल केलें असेल, अथवा

(क) कोणतेही कर्जाची किंवा मागणीची किंवा कर्जाचे किंवा मागणीचे कोणतेही भागाची फेड केली किंवा उलगडा झाला असें कबूल केलें असेल, अथवा

(ड) सदर्हूप्रमाणें कबूल केल्याचें दर्शविलें असेल किंवा तसें दिसत असेल तें टांचण, यादी किंवा लेख यांचा समावेश होतो, मग त्यांवर कोणा मनुष्याचे नांवाची सही केलेली असो किंवा नसो: आणि

(२३) "सेट्लमेंट" या शब्दाचा अर्थ, मालमिळकतीची मरणोत्तर व्यवस्था करण्याचा लेख नाहीं असे प्रकारचा स्थावर किंवा जंगम माल मिळकतीची व्यवस्था करण्याचा जो कोणताही लेख—

(अ) लग्नाबाबद केला असेल,

(ब) सेट्लमेंट करणाराची मालमिळकत त्याचे कुटुंबांत, किंवा ज्यांच्याकरितां कांहीं तजवीज करण्याचें तो इच्छितो त्यांस, वांटून देण्यासाठीं केला असेल, अथवा

(क) कोणत्याही धर्मसंबंधी किंवा दानधर्मसंबंधी कारणासाठीं केला असेल, तो लेख असा होतो :

आणि सेट्लमेंट या शब्दांत सदर्हू प्रकारची व्यवस्था करण्याविषयीं लेखी करार केला असेल त्याचा समावेश होतो.

---

## बाब २.

### स्टांपड्यूटी.

### अ.—ड्यूटीबाबद दस्तऐवजांची पात्रता याविषयीं.

३. खालीं लिहिलेले प्रत्येक दस्तऐवजाची योग्य ड्यूटी ह्मणून जी रकम १ ल्या परिशिष्टांत दर्शविली आहे तितके रकमेची ड्यूटी चार्ज होण्यास ते दस्तऐवज, या आक्टाच्या ठरावांस व त्या परिशिष्टांतील माफीस पात्र राहून, पात्र आहेत असें समजावें:— ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारे दस्तऐवज.

(अ) जो जो दस्तऐवज पहिले परिशिष्टांत सांगितला आहे व जो कोणतेही मनुष्यानें पूर्वीं करून दिलेला नसून सन १८९८ चे एप्रिल महिन्याचे पहिले तारिखेस किंवा त्या तारिखेनंतर ब्रिटिश इंडियांत करून देण्यांत येईल तो तो दस्तऐवज.

(ब) प्रत्येक बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट जी सदर्हू तारिखेस किंवा त्या तारखेनंतर ब्रिटिश इंडियाबाहेर लिहिली असेल किंवा केली असेल आणि जी ब्रिटिश इंडियांत सकारली असेल किंवा जिचा पैका दिला असेल किंवा सकारण्यासाठीं किंवा पैका मिळण्यासाठीं दाखविली असेल किंवा जिजवर शेरा लिहिला असेल किंवा जी दुसऱ्याचे नांवावर केली असेल किंवा इतर रीतीनें बेचन केली असेल ती; आणि

(क) (बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट याखेरीज इतर) पहिले परिशिष्टांत सांगितलेला जो जो दस्तऐवज कोणतेही मनुष्यानें पूर्वी करून दिलेला नसून सदर्हू तारिखेस किंवा त्या तारिखेनंतर ब्रिटिश इंडियाबाहेर केलेला असेल व जो ब्रिटिश इंडियांत असणारे मिळकतीसंबंधी असेल किंवा ब्रिटिश इंडियांत केलेले किंवा करावयाचे कोणतेही बाबतीसंबंधी किंवा गोष्टीसंबंधी असेल व जो ब्रिटिश इंडियांत आला असेल तो तो दस्तऐवज:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सरकारानें किंवा सरकारतर्फे किंवा सरकारास, करून दिलेल्या कोणत्याही दस्तऐवजाच्या संबंधानें पडणारी ड्यूटी देण्यास सरकार ज्या प्रसंगीं, ही माफी नसती तर, पात्र झालें असतें, त्या प्रसंगीं अशा कोणत्याही दस्तऐवजासंबंधानें कोणतीच ड्यूटी पडणार नाहीं:

एकेच कामांत उपयोग केलेले कित्येक दस्तऐवज.

४. (१) कोणतेही विक्रीचे, गहाणाचे किंवा सेट्लमेंटाचे बाबतींत, तो व्यवहार पुरा करण्यासाठीं कित्येक दस्तऐवज केलेले असतील तेव्हां कन्व्हेयन्साबदल किंवा गहाणखताबदल किंवा सेटलमेंटाबदल पहिले परिशिष्टांत सांगितलेली ड्यूटी चार्ज होण्यास मुख्य दस्तऐवज मात्र पात्र होईल आणि दुसरे दस्तऐवजांपैकीं प्रत्येक दस्तऐवजाबदल त्या परिशिष्टांत जी ड्यूटी सांगितली असेल (असल्यास) त्या ड्यूटीचे बदला एक रुपया ड्यूटी चार्ज होण्यास तो प्रत्येक दस्तऐवज पात्र होईल.

(२) सदर्हूप्रमाणें केलेले दस्तऐवजांपैकीं कोणता दस्तऐवज, पोटकलम (१) याचे कारणासाठीं, मुख्य दस्तऐवज समजावा हें आपसांत ठरविण्याचा अधिकार पक्षकारांस आहे.

याप्रमाणें ठरविलेल्या दस्तऐवजावर द्यावयाची ड्यूटी ह्मटली ह्मणजे, जी अधिकांत अधिक ड्यूटी सदरीलप्रमाणें केलेल्या दस्तऐवजांपैकीं कोणत्याही दस्तऐवजाच्या संबंधानें पडण्यासारखी असेल ती ड्यूटी होय असें समजावें.

कित्येक भिन्न भिन्न बाबतींसंबंधी दस्तऐवज.

५. कित्येक भिन्न भिन्न बाबती लिहिलेला किंवा कित्येक भिन्न भिन्न बाबतीसंबंधी कोणताही दस्तऐवज असेल तो खालीं लिहिलेलें ड्यूटीची एकंदर रकम चार्ज होण्यास पात्र होईल, ह्मणजे सदर्हू प्रकारचे बाबतींपैकीं एक एक बाबद लिहिलेला किंवा एक एक बाबतीसंबंधी प्रत्येक निरनिराळा दस्तऐवज या आक्टाअन्वयें जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल त्या ड्यूटीची एकंदर रकम चार्ज होण्यास पात्र होईल.

१ ले परिशिष्टांतील निरनिराळ्या व्याख्या लागू असणारे दस्तऐवज.

६. कोणताही दस्तऐवज पहिले परिशिष्टांतील दोन किंवा अधिक व्याख्या लागू होत असे रीतीनें तयार केला असेल तो त्या परिशिष्टाअन्वयें ज्या ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल त्या ड्यूटी निरनिराळ्या असतील तेव्हां, तो दस्तऐवज त्या ड्यूटींपैकीं जी ड्यूटी सर्वांहून अधिक असेल ती ड्यूटी, सदरलि शेवटच्या कलमांतील ठराव लागू राहून, चार्ज होण्यास पात्र होईल.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जो कोणताही दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल व ज्याबाबद योग्य ड्यूटी दिली असेल त्या दस्तऐवजाचा उलटलेख किंवा डुप्लिकेट (दुसरी प्रत) असेल तो या आक्टांतील कोणतेही ठरावावरून एका रुपयाहून अधिक ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होणार नाहीं.

७. (१) सन १८९४ चा व्यापारी लोकांच्या तारवांबाबद आक्ट ह्याच्या ५०६ व्या कलमांत उल्लेख केलेल्या विम्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही समुद्राचे विम्याबाबदचा करार, समुद्राचे पालिसींत लिहिलेला नसल्यास, कायदेशीर होणार नाहीं. समुद्राचे विमाच्या पालिसी.

(२) मुदतीकरितां केलेली कोणतीही समुद्राची पालिसी बारा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीकरितां करूं नये.

(३) समुद्राची पालिसी ज्या विवक्षित धोक्याबद्दल किंवा साहसाबद्दल, अगर मुदतीबद्दल केली असेल, तो धोका, तें साहस अगर ती मुदत, तिजवर सह्या करणारांचीं अगर विमेकऱ्यांचीं नांवें, आणि विम्याची रकम अगर रकमा हीं त्या पालिसींत निर्दिष्ट केलेलीं असल्यावांचून, ती कायदेशीर होणार नाहीं.

(४) जेव्हां कोणताही समुद्राचा विमा कोणत्याही सफरीबद्दल अगर सफरीवर केलेला असून मुदतीबद्दलही केलेला असेल, अगर तारूं नेमलेल्या ठिकाणीं पोंचून तेथें तें नांगरल्या नंतरच्या तीस दिवसांपलीकडील कोणत्याही मुदतीस लागू असणारा किंवा ज्यांत अशा कोणत्याही मुदतीचा समावेश होतो असा केलेला असेल, तेव्हां, त्या पालिसीवर सफरीबद्दलच्या अगर सफरीवरच्या पालिसीप्रमाणें ड्यूटी पडून, शिवाय, मुदतीबद्दलच्या पालिसीप्रमाणेंही ड्यूटी पडेल.

८. (१) या आक्टांत कोणताही ठराव असला तथापि, सन १८७९ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जी काढण्याबाबदचा आक्ट, किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणारा दुसरा कोणताही कायदा, याच्या ठरावांअन्वयें, बांड, डिबेंचर किंवा इतर सिक्युरिटी यांच्याद्वारें, पैका कर्जी काढणाऱ्या कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्याला, त्यानें काढलेल्या बांडांच्या, डिबेंचरांच्या किंवा इतर सिक्युरिटींच्या एकंदर रकमेवर दर शेंकडा आठ आणे ड्यूटी अशा कर्जाच्या संबंधानें द्यावी लागेल, आणि अशा बांडांस, डिबेंचरांस किंवा इतर सिक्युरिटींस स्टांप लावण्याची जरूरी नसून त्यांवर, ते नवीन करतेवेळीं, अनेकांऐवजीं एक सबंध करतेवेळीं, एकाऐवजीं अनेक करतेवेळीं, किंवा इतर प्रसंगीं कोणतीही जास्त ड्यूटी पडणार नाहीं. सन १८७९ च्या ११ व्या आक्टाअन्वयें पैका कर्जी घेण्यासंबंधीं काढलेले बांड, डिबेंचर किंवा इतर सिक्युरिटी.

(२) ज्या ठरावांवरून पोटकलम (१) यांत कित्येक बांड, डिबेंचर किंवा इतर सिक्युरिटी यांस, स्टांप लावण्याची व जास्त पडणाऱ्या कांहीं ड्यूटीची माफी दिली आहे ते ठराव, त्यांत सांगितल्या प्रकारचें जें कर्ज फेडल्यावांचून राहिलें असेल त्या सर्व कर्जाच्या बांडांस, डिबेंचरांस किंवा इतर सिक्युरिटींस लागू होतील, आणि असे सर्व बांड, डिबेंचर किंवा इतर सिक्युरिटी, त्यांस स्टांप लावलेला असो किंवा नसो, कायदेशीर होतील.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ज्या स्थानिक अधिकाऱ्यानें असे बांड, डिबेंचर किंवा इतर सिक्युरिटी काढल्या असतील त्याला, सन १८९७ च्या मार्च महिन्याच्या सव्विसाव्या तारखेपूर्वीं त्यांबाबद पडावयाची जी ड्यूटी ती अगोदर दिलेली नसेल किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं दिलेल्या हुकुमानें माफ केलेली नसेल, तेव्हां ती यांतील कोणत्याही ठरावावरून माफ होईल असें समजूं नये.

(३) या कलमांत फर्माविल्याप्रमाणें ड्यूटी देण्याची बुद्धिपूर्वक हयगय केल्यास, द्यावयाच्या ड्यूटीच्या रकमेवर दर शेंकडा दहा टक्के प्रमाणें रकम दंडादाखल सरकारांत भरण्यास, व ही हयगय चालू असेपर्यंत पहिल्या महिन्यानंतरच्या दर महिन्याबद्दल तेवढाच दंड भरण्यास, तो स्थानिक अधिकारी पात्र होईल.

९. इंडिया ग्याझेटांत कानू अगर हुकूम प्रसिद्ध करून खालीं लिहिल्याप्रमाणें करण्याचा अधिकार गव्हरनर जनरल इन् कौन्सिल यांस आहे, ह्मणजे— ड्यूटीचे दर कमी किंवा माफ करण्याचा किंवा तोडजोड करण्याचा अधिकार.

(अ) कोणतेही दस्तऐवज अथवा कोणतेही विशेष वर्गाचे दस्तऐवज अथवा त्या वर्गाचे दस्तऐवजांपैकीं कोणतेही दस्तऐवज अथवा कोणतेही विशेष वर्गाचे मनुष्यांनीं किंवा मनुष्यांस किंवा त्या वर्गांतील कोणा मनुष्यांनीं किंवा मनुष्यांस कोणतेही दस्तऐवज करून दिले असतील तेव्हां ते दस्तऐवज जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असतील ती ड्यूटी सगळे ब्रिटिश इंडियांत किंवा ब्रिटिश इंडियाचे कोणतेही भागांत पुढले कोणतेही तारिखेपासून किंवा मागले कोणतेही तारिखेपासून कमी करण्याचा किंवा माफ करण्याचा, आणि

(ब) कोणत्याही संस्थापित कंपनीनें किंवा दुसऱ्या एकव्यक्तीभूत मंडळीनें काढलेले डिबेंचर, बाँड किंवा बाजारांत विकतां येतील अशा दुसऱ्या सिक्युरिटी यांच्या बाबतींत ड्यूटींची तडजोड अगर एकीकरण करण्याची योजना करण्याचा,

अधिकार आहे.

**ब.—स्टांप व त्यांचा उपयोग करण्याची रीति यांविषयीं.**

ड्यूटी कशा द्याव्या.

१०. (१) या आक्टांत मुद्दाम इतर रीतीचा ठराव केला आहे तो खेरीज करून कोणतेही दस्तऐवज ज्या ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असतील त्या सर्व ड्यूटी दिल्या पाहिजेत, आणि त्या दिल्याचें सदहू प्रकारचे दस्तऐवजांवर स्टांपाचे योगानें खालीं लिहिल्याप्रमाणें दर्शवावें:—

(अ) या आक्टांतील ठरावांप्रमाणें, अथवा

(ब) असा कोणताही ठराव त्यांस लागू नसेल तेव्हां गव्हरनर जनरल इन् कौन्सिल कानू करून फर्मावितील त्या कानूप्रमाणें दर्शवावें.

(२) पोट-कलम (१) याअन्वयें केलेले कानूंत इतर गोष्टींचें नियमन केलेलें असेल त्यांत खालीं लिहिलेले गोष्टींचें नियमन करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे—

(अ) प्रत्येक जातीचे दस्तऐवजाचे प्रसंगीं—ज्या स्टांपांचा उपयोग करण्याचा अधिकार आहे त्या स्टांपांचा प्रकार.

(ब) वठविलेले स्टांप असलेले दस्तऐवजांचे प्रसंगीं—किती स्टांपांचा उपयोग करण्याचा अधिकार आहे त्यांची संख्या.

(क) हुंड्यांचे प्रसंगीं—ज्या कागदावर त्या लिहावयाच्या त्या कागदाची लांबी रुंदी.

चिकटणारे स्टांपांचा उपयोग.

११. खालीं लिहिलेले दस्तऐवजांवर चिकटणारे स्टांप मारण्याचा अधिकार आहे, ह्मणजे:

(अ) ज्या बिल आफ् एक्स्चेंजाचा ऐवज मागितला ह्मणजे दिला पाहिजे त्या बिलांखेरीज इतर रीतीनें ऐवज द्यावयाचीं जीं बिलें असतील व ज्यांचे *सेट लिहिलेले असतील त्या बिलांच्या प्रती खेरीज करून जे दस्तऐवज एक आणा ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असतील ते दस्तऐवज,

(ब) ब्रिटिश इंडियाबाहेर लिहिलेलीं किंवा केलेलीं बिल आफ् एक्स्चेंज व चेक व प्रामिसरी नोटी ( वायदेचिठ्या ),

(क) है कोर्टाचे रोलांत (पटांत) आडवोकेट किंवा वकील किंवा अटर्नी ह्मणून नांव दाखल करण्याचा लेख,

(ड) नोटरी पब्लिक याणें करून दिलेले लेख, आणि

(इ) कोणत्याही संस्थापित कंपनींतील अगर दुसऱ्या एकव्यक्तीभूत मंडळींतील शेर ( भाग ) शेरा लिहून दुसऱ्याचे नांवावर करून देण्याचे लेख.

---

*टीप.—एके हुंडीच्या दोन किंवा तीन प्रती मिळून एक सेट होतो.

चिकटणारे स्टांप रद्द करणें.

१२. (१) (अ) जो कोणताही दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल व जो कोणतेही मनुष्यानें करून दिला असेल त्यावर जो कोणी कोणताही चिकटणारा स्टांप लावील त्याणें तो लावते वेळीं खालीं लिहिलेले रीतीनें रद्द केला पाहिजे, ह्मणजे त्या स्टांपाचा पुनः उपयोग करतां न येई असे रीतीनें रद्द केला पाहिजे; आणि

(ब) चिकटणारा स्टांप असणारे कोणतेही कागदावर कोणी मनुष्य कोणताही दस्तऐवज करून देईल तेव्हां सदहू स्टांप वर सांगितलेले रीतीनें पूर्वीच रद्द केलेला नसेल तर त्याणें तो दस्तऐवज करून देतेवेळीं तो स्टांप त्याचा पुनः उपयोग न करतां येई असे रीतीनें रद्द केला पाहिजे.

(२) कोणतेही दस्तऐवजावर चिकटणारा स्टांप असून त्या स्टांपाचा पुनः उपयोग करतां न येई असे रीतीनें तो स्टांप रद्द केला नसेल तर तो दस्तऐवज त्या स्टांपाचे संबंधापुरता वगरस्टांपाचा आहे असें समजावें.

(३) चिकटणारे स्टांपाच्या बाबतींत, तो स्टांप रद्द करण्यास पोट-कलम (१) यांत फर्माविलेल्या मनुष्यास, त्या स्टांपावर किंवा त्या आडवें आपलें नांव किंवा आपल्या नांवाचीं आद्याक्षरें अगर आपल्या फर्मेचें नांव किंवा त्याच्या नांवाचीं आद्याक्षरें लिहून व आपण याप्रमाणें लिहिल्याची खरी तारीख घालून तो स्टांप रद्द करण्याचा अधिकार आहे.

वठविलेले स्टांप मारलेले कागदावर दस्तऐवज कसे लिहावे.

१३. जो जो दस्तऐवज वठविलेला स्टांप मारलेले कागदावर लिहावयाचा तो खालीं लिहिलेले रीतीनें लिहावा, ह्मणजे त्या दस्तऐवजाचे वरले बाजूवर तो स्टांप दिसे व दुसरे कोणतेही दस्तऐवजासाठीं त्या स्टांपाचा उपयोग करतां न येई किंवा दुसरे कोणतेही दस्तऐवजास तो लावतां न येई असे रीतीनें लिहावा.

एका स्टांपावर एकच मात्र दस्तऐवज असावा.

१४. ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारा कोणताही दस्तऐवज स्टांपाचे कागदावर लिहिलेला असेल त्या कागदावर दुसरा कोणताही दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल तो लिहूं नये.

परंतु असें ठरविलें आहे कीं ज्या कोणतेही शेऱ्यावर योग्य रीतीनें स्टांप मारला असेल किंवा जो ड्यूटी चार्ज होण्यास पात्र नसेल तो शेरा कोणताही हक्क कोणतेही दस्तऐवजावरून उत्पन्न होत असेल किंवा शाबीत होत असेल तो हक्क दुसऱ्याचे नांवावर करून देण्यासाठीं किंवा जो पैका देण्याचें किंवा माल स्वाधीन करण्याचें त्या दस्तऐवजावरून निश्चित केलें असेल तो पैका किंवा माल पोंहोचल्याचें कबूल करण्यासाठीं त्या दस्तऐवजावर लिहिण्याची या कलमांतील कोणतेही ठरावावरून मनाई आहे असें समजूं नये.

१३ चे किंवा १४ चे कलमाविरुद्ध रीतीनें लिहिलेला दस्तऐवज वगरस्टांपाचा आहे असें समजावें.

१५. कलम १३ किंवा कलम १४ याविरुद्ध लिहिलेला प्रत्येक दस्तऐवज वगरस्टांपाचा आहे असें समजावें.

ड्यूटी दर्शविणें.

१६. कोणताहि दस्तऐवज जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल ती किंवा दस्तऐवजास ड्यूटीची माफी असेल ती दुसरे दस्तऐवजाबद्दल खरोखर दिलेले ड्यूटीवर कोण तेही रीतीनें अवलंबून असेल तेव्हां दुसरे दस्तऐवजाबद्दलची ड्यूटी दिल्याची गोष्ट कलेक्टरास लेखी अर्जी केली असतां व दोन्ही दस्तऐवज हजर केले असतां त्या प्रथम सांगितलेले दस्तऐवजावर कलेक्टराच्या सहीचा शेरा लिहून किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं कानू करून दुसरी कोणतीही रीत फर्माविल्यास त्या रीतीनें दर्शवावी.

### क.—दस्तऐवजांवर स्टांप मारण्याचे वेळेबाबद.

ब्रिटिश इंडियांत करून द्यावयाचे दस्तऐवज.

१७. जे दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असतील व जे ब्रिटिश इंडियांत कोणतेही मनुष्यानें करून द्यावयाचे असतील त्यांवर, ते करून देण्यापूर्वीं किंवा ते करून देण्याचे वेळीं स्टांप मारला पाहिजे.

बिलें व चेक व नोटी यांखेरीज इतर दस्तऐवज ब्रिटिश इंडियाबाहेर करून दिलेले असतील ते.

१८. (१) ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारा जो जो दस्तऐवज ब्रिटिश इंडियाचे बाहेर केलेला मात्र असेल व जो बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट नसेल तो ब्रिटिश इंडियांत प्रथम आल्यानंतर तीन महिन्यांचे आंत त्यावर स्टांप मारण्याचा अधिकार आहे.

(२) सदहू प्रकारचे दस्तऐवजाबदल सांगितलेले स्टांपाचे प्रकाराप्रमाणें त्या दस्तऐवजावर खानगी मनुष्यास योग्य रीतीनें स्टांप मारतां येत नसेल तेव्हां तो दस्तऐवज तीन महिन्यांचे सदहू मुदतींत कलेक्टराकडे नेण्याचा अधिकार आहे. आणि सदहू प्रकारचा दस्तऐवज सदहूप्रमाणें नेणारा ज्या किंमतीचा स्टांप मागून त्याबद्दल पैका देईल त्या किंमतीचा स्टांप कलेक्टरानें त्या दस्तऐवजावर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल कानू करून फर्मावितील त्या रीतीनें मारावा.

ब्रिटिश इंडियाबाहेर लिहिलेलीं बिलें व चेक व नोटी.

१९. ब्रिटिश इंडियाबाहेर लिहिलेलें किंवा केलेलें कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट ब्रिटिश इंडियांत प्रथम धारण करणारानें ब्रिटिश इंडियांत ती सकारण्यासाठीं किंवा ऐवज मिळण्यासाठीं दाखविण्यापूर्वी किंवा तिचे पाठीवर शेरा लिहिण्यापूर्वी किंवा ती दुसऱ्याचे नांवावर करण्यापूर्वी किंवा इतर रीतीनें वेचन करण्यापूर्वी तीवर योग्य स्टांप लाविला पाहिजे व तो रद्द केला पाहिजे.

परंतु असें ठरविलें आहे कीं :—

(अ) सदहू प्रकारचें कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा नोट कोणतेहि धारण करणाराचे हातीं ती ब्रिटिश इंडियांत येईल त्या वेळीं तिजवर चिकटणारा योग्य स्टांप लावलेला असेल व बारावे कलमांत सांगितलेले रीतीनें रद्द केला असेल आणि तो स्टांप या आक्टांत ज्या मनुष्यानें ज्या वेळीं मारावा किंवा रद्द करावा ह्मणून सांगितलें आहे त्या मनुष्याखेरीज इतर मनुष्यानें व त्या वेळाखेरीज इतर वेळीं मारला किंवा रद्द केला असें वाटण्याची सदहू प्रकारचे धारण करणारास सबब नसेल तर तो स्टांप सदहू प्रकारचे धारण करणाराचे संबंधापुरता योग्य रीतीनें लावला आहे व रद्द केला आहे असें समजावें.

(ब) स्टांप लावण्यास किंवा रद्द करण्यास वर्जिल्याबद्दल कोणतेहि मनुष्यावर दंडाचा पेंच आला असेल त्यांतून तो या विशेष ठरावांतील कोणतेही गोष्टीवरून सुटतो असें समजूं नये.

### ड.—ड्यूटीसाठीं किंमत करण्याबाबद.

परकें चलनी नाण्यांत लिहिलेले रकमेचा दुसरे नाण्यांत हिशोब करणें.

२०. (१) जो कोणताही पैका ब्रिटिश इंडियाचे खेरीज इतर कोणतेही चलनी नाण्यांत लिहिला असेल त्या पैक्याबाबद किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारा दस्तऐवज असेल तेव्हां सदहू प्रकारची ड्यूटी हिशोब करून ठरविणें ती, त्या दस्तऐवजाचे तारिखेस सदहू प्रकारचे पैक्याची किंमत वटावाचे चालू दराप्रमाणें ब्रिटिश इंडियाचे चलनी नाण्यांत होत असेल त्या किंमतीअन्वयें हिशोब करून ठरवावी.

(२) स्टांप ड्यूटी आकारण्यासाठीं ब्रिटिश किंवा कोणत्याही परकी चलनी नाण्यांचा ब्रिटिश इंडियाचे चलनी नाण्यांत हिशोब करण्याकरितां, गवरनर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गॅझेटांत वेळोवेळीं जाहिरनामा देऊन, वटावाचा दर ठरविण्याचा अधिकार आहे, व अशा प्रकारचा दर, पोट-कलम (१) याच्या कारणांसाठीं चालू दर आहे असें समजावें.

स्टाकची व बाजारांत विकतां येतें असे सिक्यूरिटीची किंमत करणें.

२१. कोणतेही स्टाकाबाबद किंवा बाजारांत विकतां येते अशा किंवा दुसऱ्या सिक्यूरिटीबाबद किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारा दस्तऐवज असेल तेव्हां सदहू प्रकारची ड्यूटी हिशोब करून ठरविणें ती सदहू प्रकारचे स्टाकाचा किंवा सिक्यूरिटीचा त्या दस्तऐवजाचे तारिखेस अजमासें भाव असेल त्या भावाप्रमाणें त्या

स्टाकाची किंवा सिक्युरिटीची किंमत किंवा मोल होत असेल त्याअन्वयें हिशोब करून ठरवावी.

२२. कोणतेही दस्तऐवजांत प्रसंगाप्रमाणें वटावाचा चालू दर किंवा भावाचा अजमास लिहिला असेल व त्या लिहिल्याप्रमाणें त्या दस्तऐवजावर स्टांप मारला असेल तेव्हां त्या दस्तऐवजावर त्या लिहिण्याचे विषयापुरता योग्य रीतीनें स्टांप मारला आहे असें उलट शाबीत करण्यांत येई तोंपर्यंत सिद्धवत् समजावें.

वटावाचा दर किंवा भावाचा अजमास लिहिल्याचें फळ.

२३. दस्तऐवजाचे शर्तीवरून व्याज देण्याचें मुद्दाम ठरविलें असेल तेव्हां तो दस्तऐवज खालीं लिहिलेले ड्यूटीपेक्षां अधिक ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होणार नाहीं. ह्मणजे त्या दस्तऐवजांत व्याज लिहिलें नसतें तर तो दस्तऐवज् जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र झाला असता त्या ड्यूटीहून जास्ती ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होणार नाहीं.

व्याज मिळावयाचे दस्तऐवज.

२४. कोणा मनुष्यास कोणतेंही कर्ज येणें असेल त्या सर्व कर्जाचे किंवा त्याचे कोणतेही अंशाचे ऐवजीं कोणतीही मिळकत त्या मनुष्यास ट्रान्सफर केली (करून दिली) असेल तेव्हां अथवा त्या मिळकतीवर कोणतेही पैक्याचा किंवा स्टाकाचा चार्ज किंवा देण्याचा बोजा असेल किंवा नसेल किंवा होत असेल किंवा होत नसेल, तो पैका किंवा स्टाक खाचित किंवा दैवघटित गोष्टीवर अवलंबून देण्याचे किंवा ट्रान्सफर करण्याचे शर्तीनें ती मिळकत ट्रान्सफर केली असेल तेव्हां ज्या ऐवजाबदल तो ट्रान्सफर किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल, तो सगळा ऐवज किंवा त्याचा अंश (प्रसंगाप्रमाणें जसें असेल तसें) सदहू प्रकारचें कर्ज किंवा पैका किंवा स्टाक आहे असें समजावें:

कर्जाचे ऐवजीं ट्रान्सफर असेल त्यावर किंवा पुढें ऐवज द्यावयाचा ही गोष्ट वगैरे लागू असणारे ट्रान्सफरावर ड्यूटी कशी चार्ज करावी.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं १ ल्या परिशिष्टांतील १८ व्या कलमांत सांगितल्या प्रकारच्या कोणत्याही विक्रीच्या सर्टिफिकिटाला (दाखल्याला) या कलमांतील कोणताही ठराव लागू होत नाहीं.

खुलासा.–गहाणास किंवा दुसऱ्या बोजास पात्र असणाऱ्या मिळकतीच्या विक्रीच्या बाबतींत, कोणताही न भरलेला गहाणाचा पैका अगर चार्ज केलेला पैका, त्याजवर येणाऱ्या (कांहीं असल्यास) व्याजासह, विक्रीच्या मोबदल्याचा भाग आहे असें समजावें.

## उदाहरणें.

(१) अनें बचे १००० रुपये देणें आहेत. अ हा ५०० रुपये व मागील १००० रुपये कर्जाची फारिखत या मोबदल्यानें कांहीं मिळकत बला विकतो. स्टांप ड्यूटी १५०० रुपयांवर पडेल.

(२) अ हा कपाशीं १००० रुपयांकरितां गहाणास व न भरलेल्या २०० रुपये व्याजास पात्र असणारी मिळकत बला ५०० रुपयांला विकतो. स्टांप ड्यूटी १७०० रुपयांवर पडेल.

२५. कोणताही दस्तऐवज, आन्युइटी किंवा मुदती मुदतीनें द्यावयाची इतर रकम देण्याचें निश्चित करण्यासाठीं करून दिला असेल अथवा कन्वेयन्साचा ऐवज आन्युइटी किंवा मुदती मुदतीनें द्यावयाची इतर रकम असेल तेव्हां सदहू प्रकारचे दस्तऐवजावरून निश्चित केलेली रकम किंवा सदहू प्रकारचे कन्वेयन्साचा ऐवज (प्रसंगाप्रमाणें जसें असेल तसें) या आक्टाचे कारणासाठीं खालीं लिहिल्याप्रमाणें आहे असें समजावें, ह्मणजे:

आन्यूइटी वगैरेचे प्रसंगीं किंमत करणें.

(अ) रकम नियमित मुदतीपर्यंत द्यावयाची असेल व त्यामुळें द्यावयाचे रकमेची एकंदर बेरीज पूर्वी ठरवितां येत असेल तेव्हां ती एकंदर बेरीज समजावी.

(ब) रक्कम निरंतर द्यावयाची असेल अथवा सदर्हू प्रकारचा दस्तऐवज किंवा कन्वेयन्स करून दिल्याचे तारखेस हयातींत असणारे कोणतेही जीवाबरोबर संपणारी नाहीं असे अनियमित मुदतीपर्यंत द्यावयाची असेल तेव्हां, पहिला भरणा भरावयाचे तारखेपासून आकारलेल्या वीस वर्षांचे मुदतीपर्यंत सदर्हू प्रकारचे दस्तऐवजाचे किंवा कन्वेयन्साचे शर्तीप्रमाणें जी एकंदर बेरीज देणें होईल किंवा देण्याची होऊं शकेल ती एकंदर बेरीज समजावी.

(क) सदर्हू प्रकारचे दस्तऐवजाचे किंवा कन्वेयन्साचे तारखेस हयातींत असणारे कोणतेही जीवाबरोबर संपणारे अनियमित मुदतीपर्यंत द्यावयाची सदर्हू प्रकारची रक्कम असेल तेव्हां, पहिला भरणा भरावयाचे तारखेपासून आकारलेल्या बारा वर्षांचे मुदतीपर्यंत जी एकंदर बेरीज सदर्हूप्रमाणें देणें होईल किंवा देण्याची होऊं शकेल ती एकंदर बेरीज समजावी.

विषयाची किंमत, ठरवितां येत नसेल तेव्हां स्टांप.

२६. किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारे कोणतेही दस्तऐवजाचे विषयाची रक्कम किंवा किंमत तो करून देण्याचे तारखेस किंवा त्यावर पहिल्यानें (दस्तऐवज करून देणारांपैकीं कोणाची) सही झाली त्या तारखेस ठरवितां येत नसेल किंवा (ह्या आक्टाचे सुरवातीपूर्वी करून दिलेले दस्तऐवजाचे प्रसंगीं) ठरविता आली नसेल तेव्हां, त्या दस्तऐवजावरून खालीं लिहिलेले मोठ्यांत मोठे रक्कमेहून किंवा किंमतीहून अधिक दावा करतां येणार नाहीं; ह्मणजे ज्या स्टांपाचा वास्तविक उपयोग केला असेल तो स्टांप त्याच जातीचे दस्तऐवजांत जी मोठ्यांत मोठी रक्कम किंवा किंमत लिहिली असती तर त्या रक्कमेविषयीं किंवा किंमतीविषयीं दस्तऐवज सदर्हूप्रमाणें करून देण्याचे तारखेस पुरता होता त्या रक्कमेहून किंवा किंमतीहून अधिक रक्कमेचा किंवा किंमतीचा सदर्हू प्रकारचे दस्तऐवजावरून दावा करतां येणार नाहीं.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ज्या खाणीच्या उत्पन्नाचा कांहीं हिसा भाड्यादाखल अगर भाड्याच्या भागादाखल घेण्यांत येतो अशा खाणीच्या लीसाच्या बाबतींत त्या हिशाची किंमत स्टांप ड्यूटीच्या कारणाकरितां सालिना २०,००० रुपये आकारली ह्मणजे बस होईल, व अशा हिशाची सर्व रक्कम, मग ती कितीहि असो, सदर्हू लीसाअन्वयें मागतां येईल.

ड्यूटी कमज्यास्त करणाऱ्या गोष्टी दस्तऐवजांत लिहिणें.

२७. ज्या ऐवजावरून (असल्यास) आणि ज्या गोष्टींवरून व हकीकतींवरून कोणतेही दस्तऐवजाची ड्यूटी चार्ज होण्याची पात्रता कमज्यास्त होत असेल तो ऐवज व त्या सर्व गोष्टी व हकीकती किंवा जी ड्यूटी चार्ज होण्यास दस्तऐवज पात्र असेल त्या ड्यूटीची रक्कम दस्तऐवजांत संपूर्ण व खरेपणानें लिहिली पाहिजे.

कित्येक कन्वेयन्सांचे प्रसंगीं ड्यूटीबाबद हुकुम.

२८. (१) कोणतेही सगळे मिळकतीविषयीं एकच खरेदीचे ऐवजाबदल ती विकण्याचा करार केला असेल व निरनिराळे दस्तऐवज करून ती मिळकत निरनिराळे भागांनीं खरीद करणारास कन्वे करून दिली असेल तेव्हां पक्षकारास योग्य वाटेल त्या रीतीनें खरेदीचे ऐवजाचे विभाग करावे; ते असे कीं दरएक निरनिराळे भागाचे कन्वेयन्सांत त्या त्या भागाचा निरनिराळा खरेदीचा ऐवज लिहिण्यांत येई असे विभाग करावे, आणि सदर्हू प्रकारचें कन्वेयन्स सदर्हू प्रकारचे खरेदीचे पृथक् ऐवजाबाबद किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल.

(२) सगळे मिळकतीविषयीं एकच खरेदीचे ऐवजाबदल ती विकत घेण्याचा दोन किंवा अधिक मनुष्यांनीं सामायिक करार केला असेल किंवा कोणतेही मनुष्यानें आपले स्वतःबदल व इतर मनुष्यांबदल करार केला असेल किंवा सर्वांशीं इतर मनुष्यांबदल करार केला असेल ती मिळकत ज्या मनुष्यांनीं किंवा ज्या मनुष्यांकरितां खरेदीचे ऐवजाचे निरनिराळे भागांनीं विकत घेतली त्या मनुष्यांस ती मिळकत निरनिराळे दस्त-

ऐवजांनीं भागांभागांनीं कन्वे करून दिली असेल तेव्हां, प्रत्येक निरनिराळे भागाचा कन्वेयन्स त्यांत खरेदीचे ऐवजाचे निर्दिष्ट केलेले पृथक् भागाबाबद किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल.

(३) कोणतीही मिळकत खरीद करण्याचा कोणी मनुष्यानें करार केला असेल परंतु तिचा कन्वेयन्स त्यास मिळाला नसून तो मनुष्य ती मिळकत इतर कोणतेही मनुष्यास विकण्याचा करार करील आणि त्यामुळें ती मिळकत लागलीच त्या पोट-खरीददारास कन्वे करून देण्यांत येईल तेव्हां मूळचे खरीद करणारानें पोट-खरीददारास केलेले विक्रीचे ऐवजाबाबद कन्वेयन्स किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल.

(४) कोणतीही मिळकत खरीद करण्याचा कोणी मनुष्यानें करार केला असेल परंतु तिचा कन्वेयन्स त्यास मिळाला नसून तो ती सगळी किंवा तिचा कोणताही भाग कोणतेही इतर मनुष्यास किंवा मनुष्यांस विकण्याचा करार करील आणि त्यामुळें ती मिळकत मूळचा विकणारा भागांभागांनीं निरनिराळे मनुष्यांस कन्वे करून देईल तेव्हां पोट-खरीददारास विकलेले प्रत्येक भागाचा कन्वेयन्स खालीं लिहिल्याप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल, ह्मणजे मूळचे खरेदीचे ऐवजाचे रकमेकडे किंवा किंमतीकडे लक्ष्य न देतां सदहू प्रकारचे पोट-खरीददारानें दिलेले खरेदीचे ऐवजाबाबद मात्र किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल. आणि सदहू प्रकारचे मिळकतीचे शेषाबदल ( राहिला असल्यास ) व मूळचे खरीददारास कन्वेयन्स करून द्यावयाचा तो पोट-खरीददारांनीं दिलेले खरेदीचे ऐवजाचे एकंदरीहून मूळचा खरेदीचा ऐवज जितका जास्ती असेल तितके जास्ती ऐवजाबाबद मात्र किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल:

परंतु असें ठरविलें आहे कीं सदरीं शेवटीं सांगितलेले कन्वेयन्सावरील ड्यूटी कोणतेही प्रसंगीं एक रुपयाहून कमी असूं नये.

(५) कोणी पोट खरीददार आपणास साक्षात् विकणारे मनुष्याचे हक्कसंबंधाचा कन्वेयन्स वास्तविक घेईल आणि तो कन्वेयन्स त्याणें खरेदीचा ऐवज दिला असेल त्याबाबद किंमतीप्रमाणें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल व त्याप्रमाणें त्यावर योग्य रीतीनें स्टांप मारला असेल तेव्हां त्याच मिळकतीचा पुढें कोणताही कन्वेयन्स त्यास मूळचे विकणारानें करून द्यावयाचा तो खालीं लिहिलेली ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल, ह्मणजे सदहू प्रकारचे मूळचे विकणारास जो खरेदीचा ऐवज मिळाला असेल त्या ऐवजाबदलचा कन्वेयन्स जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होता त्या ड्यूटीइतकी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल किंवा सदहू प्रकारची ड्यूटी पांच रुपयांहून अधिक असेल तेव्हां पांच रुपये ड्यूटी चार्ज होण्यास पात्र होईल.

## ई.—ड्यूटी कोणी द्यावी.

२९. उलट कबुलायत नसेल तेव्हां योग्य स्टांप पुरविण्याचा खर्च— ड्यूटी कोणी द्यावी.

(अ) १ ले परिशिष्टाचे खालील कलमांमध्यें सांगितलेल्या कोणतेही दस्तऐवजाचे बाबतींत, तो तो दस्तऐवज लिहिणारे, करणारे किंवा सही करणारे मनुष्यानें दिला पाहिजे:—

नंबर २. ( आडमिनिस्ट्रेशन बांड ).

नंबर ६. ( गहाणाबद्दलचा करार ).

नंबर १३. ( बिल आफ् एक्श्चेंज ).

नंबर १५. ( बांड ).

नंबर १६.( बाटमरी बांड ).

नंबर २६. ( कस्टम बांड ).

नंबर २७. ( डिबेंचर ).

नंबर ३२. ( आणखी चार्ज ).

नंबर ३४. ( इंडेम्निटी बांड ).

नंबर ४०. ( गहाणखत ).

नंबर ४९. ( प्रामिसरी नोट ).

नंबर ५४. ( गहाण मिळकतीचें री-कन्वेयन्स ).

नंबर ५९. ( फारिखत ).

नंबर ९६. ( रेस्पांडेन्सिया बांड ).

नंबर ९७. ( सिक्युरिटी बांड, किंवा गहाणखत ).

नंबर ९८. ( सेटल्मेंट ).

नंबर ६२. (अ) ( संस्थापित कंपनींतील अगर दुसऱ्या एकव्यक्तीभूत मंडळींतील शेर ट्रान्सफर [ तबदील ] करणें ),

नंबर ६२. (ब) कलम ८ यांत सांगितलेले डिबेंचर खेरीज करून, बाजारांत विकतां येण्याजोग्या सिक्युरिटी असणारे डिबेंचर ट्रान्सफर करणें, मग ते ड्यूटीस पात्र असोत अगर नसोत,

(क) बांडामुळें, गहाणखतामुळें अगर विम्याच्या पालिसीमुळें मिळालेला कोणताही हितसंबंध ट्रान्सफर करणें.

(ब) ज्या मनुष्यास कायद्यावरून पावती देणें जरूर नसेल त्यानें सही केलेल्या किंवा साक्ष घातलेल्या पावतीच्या नकलेचे बाबतींत—नकल मागणाऱ्या मनुष्यानें दिला पाहिजेः

(क) विम्याचे पालिसीचे प्रसंगीं--विमा उतरणाऱ्या मनुष्यानें दिला पाहिजेः

(ड) कन्वेयन्साचे प्रसंगीं—तो ज्यास करून दिला असेल त्यानें दिला पाहिजेः लीसाचे किंवा लीस करून देण्याचे कराराचे प्रसंगीं—लीस घेणारानें किंवा पुढें घेणार असेल त्यानें दिला पाहिजेः

(इ) लीसाचे उलट लेखाचे प्रसंगीं—लीस देणारानें दिला पाहिजेः

(फ) मोबदल्याचे दस्तऐवजाचे प्रसंगीं–पक्षकारांनीं सारखे हिशांनीं, दिला पाहिजेः

(ग) विकरीचे सर्टिफिकिटाचे (दाखल्याचे) प्रसंगीं—तें सर्टिफिकीट ज्या मिळकतीसंबंधी असेल त्या मिळकतीचे खरीददारानें दिला पाहिजेः आणि

(ह) वांटणीपत्राचे [ इन्स्ट्रुमेंट आफ् पार्टिशनचे ] प्रसंगीं—त्या दस्तऐवजाचे पक्षकारांनीं त्या दस्तऐवजांतील मिळकतींतले आपापले हिशाचे प्रमाणानें, अथवा रेव्हेन्यू अधिकाऱ्यानें अगर दिवाणी कोर्टानें केलेला हुकुम बजावून वांटणी केली असेल तेव्हां, तो अधिकारी फर्मावील त्या प्रमाणानें दिला पाहिजेः

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, कांहीं हिसेदारांनीं एस्टेट किंवा धारण केलेली मिळकत समायिक रीतीनें धारण करण्याचें चालू ठेवल्यामुळें, तिचा जो भाग विभागला गेला नसेल त्या भागावर पडणारी ड्यूटी, सदहू अधिकाऱ्याचे अगर कोर्टाचे नजरेस आल्यास, माफ करण्याचा त्यास अधिकार आहे.

## उदाहरण.

अ, ब, क व ड यांनीं धारण केलेली १००० रुपये किंमतीची मिळकत रेव्हेन्यू अधिकाऱ्याचे हुकुमानें विभागली आहे. किंमत रुपये ६०० चे आपापलें हिसे अ व ब हे सामायिक कबज्यांत ठेवतात, आणि क व ड प्रत्येकीं २०० रुपये किंमतीचे निराळे हिसे घेतात. अ व ब यांचे संबंधानें ड्यूटी माफ करण्याचा रेव्हेन्यू अधिका-

त्यास अख़्त्यार आहे, आणि क व ड यांच्या वांट्यास आलेले हिशांचे किंमतीच्या हिस्सेरसीप्रमाणें, ह्मणजे प्रत्येकीं २०० रुपयांवर, ड्यूटी देण्याविषयीं त्यांस फर्माविण्याचा त्यास अख़्त्यार आहे.

३०. कोणतेहि मनुष्यास वीस रुपयांहून अधिक पैक्याची रकम पोंचेल किंवा वीस रुपयांहून अधिक रकमेचें कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट पोहोंचेल, किंवा कर्जाचे किंवा कर्जाचे कांहीं भागाचे फेडींत वीस रुपयांहून अधिक किंमतीचा जंगम माल पोहोंचेल त्यानें, सदर्हू प्रकारचा पैका किंवा बिल किंवा चेक किंवा नोट किंवा माल देणारे किंवा स्वाधीन करणारे मनुष्यानें मागितली असतां, योग्य रीतीनें स्टांप असलेली पावती त्याबद्दल दिली पाहिजे. — कांहीं प्रसंगीं पावती देण्याची आवश्यकता.

---

## बाब ३.

### स्टांपांबाबद ठराव करणें.

३१. (१) कोणताही दस्तऐवज करून दिलेला असो किंवा नसो व त्यावर पूर्वी स्टांप मारलेला असो किंवा नसो तो दस्तऐवज कलेक्टराजवळ आणून तो दस्तऐवज किती ड्यूटी चार्ज होण्यास पात्र आहे (असल्यास) याबाबद तो दस्तऐवज आणणारा त्या अमलदाराचें मत मिळण्याविषयीं अर्ज करील व ( पराकाष्ठा पांच रुपयांहून अधिक नाहीं व आठ आण्यांहून कमी नाहीं इतके रकमेची ) कलेक्टर फर्मावील तितकी फी देईल तेव्हां जी ड्यूटी चार्ज होण्यास तो दस्तऐवज पात्र आहे ( असल्यास ) असें त्या कलेक्टराचें मत असेल ती ड्यूटी त्यानें ठरवावी. — योग्य स्टांप कोणता याबाबद ठराव करणें.

(२) त्या कारणासाठीं खालीं लिहिल्याप्रमाणें फरमाविण्याचा त्या कलेक्टरास अधिकार आहे, ह्मणजे त्या दस्तऐवजाचा सारांश आणि ड्यूटी चार्ज होण्याचे दस्तऐवजाचें पात्रतेस किंवा तो दस्तऐवज जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र आहे त्या ड्यूटीचे रकमेस लागू असणाऱ्या सर्व गोष्टी व हकीकती त्या दस्तऐवजांत पूर्णपणें व खरेपणानें लिहिल्या आहेत हें शाबित करण्यासाठीं आपणास जरूर वाटेल तसा शपथपूर्वक किंवा प्रतिज्ञापूर्वक लेख किंवा इतर पुरावाहि मागण्याचा अधिकार आहे, आणि त्याप्रमाणें सदर्हू प्रकारचा सारांश व पुरावा आणून देण्यांत येई तोंपर्यंत सदर्हू प्रकारचे अर्जावर काम चालविण्यास नाहीं ह्मणण्याचा अधिकार आहेः

परंतु असें ठरविलें आहे कीं—

(अ) या कलमाअन्वयें दिलेले पुराव्याचा उपयोग त्या दस्तऐवजासंबंधीं जी चौकशी त्या दस्तऐवजाचे ड्यूटीबाबदचे पात्रतेविषयींची असेल त्या चौकशीखेरीज कोणतेही मनुष्यावरील कोणतेही इतर ठिकाणीं कामांत करूं नये; आणि — विशेष ठराव.

(ब) ज्या ज्या मनुष्यानें सदर्हू प्रकारचा कोणताही पुरावा दिला असेल त्यानें तो पुरावा ज्या दस्तऐवजासंबंधीं असेल तो दस्तऐवज जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल ती संपूर्ण ड्यूटी दिली असतां सदर्हू प्रकारचे गोष्टींपैकीं किंवा हकीकतींपैकीं कोणत्याही गोष्टी किंवा हकीकती त्या दस्तऐवजांत खरेपणानें लिहिण्याचें वर्जिल्याबदल या आक्टाअन्वयें कोणताही दंडाचा त्यावर पेंच आला असेल त्यांतून तो मोकळा होईल.

३२. (१) ३१वे कलमाअन्वयें कलेक्टराकडे आणलेला कोणताही दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारे प्रकारचा दस्तऐवज आहे असें त्याचें मत असेल, आणि — कलेक्टरानें देण्याचें सर्टिफिकेट.

(अ) त्या दस्तऐवजावर पूर्णपणें स्टांप मारलाच आहे असें कलेक्टर ठरवील, अथवा

(ब) एकतिसावे कलमाअन्वयें कलेक्टरानें ठरविलेली ड्यूटी दिली असेल किंवा जी रकम दस्तऐवजाबद्दल देऊन चुकलेले ड्यूटींत मिळविली असतां सदहूप्रमाणें ठरविलेले ड्युटीइतकी होते ती रकम दिली असेल,

तेव्हां, जी संपूर्ण ड्यूटी (रकम लिहावी) चार्ज होण्यास सदहू प्रकारचा दस्तऐवज पात्र आहे ती दिली आहे असा त्या दस्तऐवजावर शेरा करून कलेक्टरानें दाखला लिहावा.

(२) सदहू प्रकारचा दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र नाहीं असें आपलें मत असेल तेव्हां तो दस्तऐवज सदहूप्रमाणें पात्र नाहीं असा दाखला वर सांगितलेले रीतीनें कलेक्टरानें लिहावा.

(३) या कलमाअन्वयें कोणताही शेरा कोणतेही दस्तऐवजावर लिहिला असेल त्या दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारला आहे किंवा तो ड्यूटी चार्ज होण्यास पात्र नाहीं असें प्रसंगाप्रमाणें जसें असेल तसें समजावें. आणि ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल तर तो पुराव्यास किंवा इतर कारणास घेण्यास अधिकार आहे. आणि त्या दस्तऐवजावर प्रथमच योग्य रीतीनें स्टांप मारल्याप्रमाणें त्यावरून काम चालविण्याचा व तो नोंदण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, खालीं लिहिलेले कोणतेही दस्तऐवजावर शेरा लिहिण्याचा अधिकार या कलमांतील कोणतेही ठरावावरून कलेक्टरास प्राप्त होत नाहीं:—

(अ) ब्रिटिश इंडियांत जो कोणताही दस्तऐवज करून दिलेला असेल किंवा त्यावर पहिल्यानें (दस्तऐवज करून देणारांपैकीं कोणाची) सही झाली असेल व जो करून दिल्याचे किंवा त्यावर पहिल्यानें सही झाल्याचे तारखेपासून प्रसंगाप्रमाणें जसें असेल तसें एक महिना झाल्यावर आपणाकडे आणला असेल तो दस्तऐवज ;

(ब) ब्रिटिश इंडियाबाहेर जो कोणताही दस्तऐवज करून दिलेला असेल किंवा त्यावर पहिल्यानें (दस्तऐवज करून देणारापैकीं कोणाची) सही झाली असेल व जो ब्रिटिश इंडियांत प्रथम आल्यापासून तीन महिने झाल्यानंतर आपणाकडे आणला असेल तो दस्तऐवज; अथवा

(क) एक आणा ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारा कोणताही दस्तऐवज अथवा कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा प्रामिसरी नोट योग्य रीतीनें स्टांप न मारलेले कागदावर लिहिल्यानंतर किंवा करून दिल्यानंतर आपणाकडे आणली असेल तो दस्तऐवज किंवा बिल आफ् एक्श्चेंज किंवा प्रामिसरी नोट.

---

## बाब ४.

### योग्य रीतीनें स्टांप न मारलेले दस्तऐवज.

दस्तऐवज तपासणें व अटकवून ठेवणें.

३३. (१) कायद्यावरून किंवा पक्षकारांचे संमतीनें पुरावा घेण्याचा अधिकार असणारे ज्या ज्या मनुष्याकडे, आणि पोलीसचा आफिसर खेरीज करून सरकारी हुद्दा स्वाधीन असणारे ज्या ज्या मनुष्याकडे, त्याचे मतें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारा कोणताहि दस्तऐवज तो आपलें काम करीत असतां हजर करण्यांत येईल किंवा येईल त्या दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारलेला नाहीं असें त्या मनुष्याचे नजरेस येईल तर त्याणें तो अटकवून ठेवावा.

(२) सदहू कारणासाठीं सदहू प्रकारचे प्रत्येक मनुष्यानें सदहूप्रमाणें चार्ज होण्यास पात्र असणारा व आपणापुढें सदहूप्रमाणें हजर केलेला किंवा आलेला प्रत्येक

दस्तऐवज खालीं लिहिलेले कारणासाठीं तपासावा, म्हणजे तो दस्तऐवज करून दिला किंवा त्यावर पहिल्यानें ( सद्या करणारांपैकीं कोणाची ) सही झाली त्या वेळीं ब्रिटिश इंडियांत अमलांत असणारे कायद्याअन्वयें ज्या किंमतीचा व प्रकारचा स्टांप जरूर असेल त्या किंमतीचा व प्रकारचा स्टांप त्यावर मारला आहे किंवा नाहीं हें ठरविण्यासाठीं तपासावा :

परंतु असें ठरविलें आहे कीं—

(अ) सन १८८२ चे फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याचे बारावे किंवा छत्तिसावे बाबीअन्वयें चाललेले कामाखेरीज कोणतेंही इतर काम चालत असतां आपणापुढें आलेला कोणताहि दस्तऐवज तपासणें किंवा अटकावून ठेवणें हें कोणतेही माजिस्ट्रेटास किंवा फौजदारी कोर्टाचे जज्जास, असें करणें त्यास योग्य न वाटल्यास, अवश्य आहे असें या कलमांतील कोणतेही ठरावावरून समजूं नये;

(ब) आणखी असें ठरविलें आहे कीं हे कोर्टाचे जज्जाचे प्रसंगीं या कलमाअन्वयें कोणताही दस्तऐवज तपासण्याचें व अटकावून ठेवण्याचें काम याबाबद तें कोर्ट ज्या अमलदारास नेमील त्याकडे देण्याचा अधिकार आहे.

(३) या कलमाचे कारणांसाठीं, संशयाचे प्रसंगीं,—

(अ) कोणते हुद्दे सरकारी समजावे हें ठरविण्याचा अधिकार गवर्नर जनरल इन् कौन्सिल यांस आहे, व

(ब) सरकारी हुद्दे स्वाधीन असणारीं मनुष्यें कोणास समजावें हें ठरविण्याचा अधिकार स्थानिक सरकारास आहे.

स्टांप नसलेल्या पावत्यासंबंधीं विशेष ठराव.

३४. एक आणा ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असलेली व कोणताही सरकारी हिशोब तपासण्याचे वेळीं वगर स्टांपाची अशी कोणतीही पावती जेव्हां कोणत्याही अंमलदाराला दिली जाईल किंवा त्याजपुढें हजर केली जाईल, त्या प्रसंगीं त्या अंमलदारास, त्याचे नजरेस आल्यास, तो दस्तऐवज अटकावून न ठेवतां, त्याचेबदला योग्य स्टांप असलेली पावती दाखल करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

योग्य रीतीनें स्टांप न मारलेला दस्तऐवज पुरावा वगैरेंत घेण्याचा अधिकार नाहीं.

३५. कोणताही दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल त्या दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारलेला असल्यावांचून तो दस्तऐवज ज्या कोणतेही मनुष्यास पुरावा घेण्याचा अधिकार कायद्यावरून किंवा पक्षकारांचे संमतीनें असेल त्याणें कोणतेही कारणासाठीं पुराव्यास घेऊं नये अथवा सदहू प्रकारचे कोणतेही मनुष्यानें किंवा कोणतेही सरकारी अमलदारानें त्या दस्तऐवजाप्रमाणें करूं नये किंवा तो नोंदूं नये किंवा तो खरा म्हणून त्यावर सही करूं नये:

परंतु असें ठरविलें आहे कीं—

ड्यूटी व दंड दिला असता दस्तऐवज माह्य होतील ;

(अ) एक आणा मात्र ड्यूटी चार्ज होण्यास पात्र आहे असा दस्तऐवज नसणारा किंवा बिल आफ् एक्श्चेंज किंवा प्रामिसरी नोट नसणारा सदहू प्रकारचा कोणताही दस्तऐवज जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल ती ड्यूटी दिली असतां अथवा ( अपुरता स्टांप मारलेले दस्तऐवजाचे प्रसंगीं ) सदहू प्रकारचे ड्यूटीची रकम पुरती होण्यास जितकी रकम पाहिजे असेल तितकी रकम व पांच रुपये दंड दिला असतां अथवा योग्य ड्यूटीचे रकमेचे किंवा तिचे कमी असलेले भागाचे दसपट रकम पांच रुपयांहून अधिक असेल तेव्हां त्या ड्यूटीचे किंवा भागाचे दसपटी इतकी रकम दिली असतां तो दस्तऐवज पुराव्यास घेण्याचा अधिकार आहे, परंतु त्यास सर्व वाजवी अपवाद लागू होतील;

(ब) ज्या मनुष्याकडून स्टांप असलेली पावती मागतां आली असती अशा कोणत्याही मनुष्यानें जर स्टांप नसलेली पावती दिली, व ज्या फिर्यादींत सदर्हू पावतीस स्टांप असता तर त्याच्या विरुद्ध पुराव्यास घेतां आली असती अशी फिर्याद आणली, तर अशी पावती, ती देणारानें एक रुपया दंड भरला असतां पुराव्यास घेतली पाहिजे;

आणि फौजदारी चालविलेले कित्येक कामांत;

(क) सन १८८२ चे फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याचे बारावे किंवा छत्तिसावे बाबीअन्वयें चाललेले कामाखेरीज इतर कोणतेंही काम फौजदारी कोर्टांत चालेल त्यांत कोणताही दस्तऐवज पुराव्यास घेण्याची या कलमांतील कोणतेंही ठरावावरून मनाई आहे असें समजूं नये;

आणि सरकारानें किंवा सरकारच्या वतीनें केले असतील तेव्हां.

(ड) सरकारानें किंवा सरकारच्या वतीनें करून दिलेला कोणताही दस्तऐवज कोणत्याही कोर्टांत घेण्यास या कलमांतील कोणत्याही ठरावावरून मनाई आहे असें समजूं नये.

दस्तऐवज घेतल्याबाबद तकरार केव्हां काढूं नये.

३६. कोणताही दस्तऐवज पुराव्यास घेतला असेल तेव्हां तो घेतल्याबाबद त्याच मुकदम्याचे किंवा चाललेले कामाचे कोणतेही पर्यायांत एकसष्टावे कलमांत ठराव केला आहे तो खेरीज करून त्या दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारलेला नाहीं या सबबेवरून तकरार काढूं नये.

अयोग्य स्टांप असलेले दस्तऐवज घेणें.

३७. याबाबद जे नियम करण्यांत येतील ते लागू राहून, ज्या दस्तऐवजास योग्य रकमेचा परंतु अयोग्य प्रकारचा स्टांप आहे असा दस्तऐवज, तो जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल ती दिली असतां योग्य स्टांप असलेला दस्तऐवज ह्मणून दाखला देण्याचा अधिकार आहे व त्याला, तो करून दिलेल्या तारखेपासून, योग्य स्टांप आहे असें समजलें पाहिजे.

अटकवून ठेवलेले दस्तऐवजाबद्दल कशी व्यवस्था करावी.

३८. (१) ३३ वे कलमाअन्वयें दस्तऐवज अटकवून ठेवणारे कोणतेही मनुष्यास पुरावा घेण्याचा अधिकार कायद्यावरून किंवा पक्षकारांचे संमतीनें असेल व ३५ वे कलमांत ठरविल्याप्रमाणें दंड किंवा ३७ व्या कलमांत ठरविल्याप्रमाणें ड्यूटी दिल्यावर सदर्हू प्रकारचा दस्तऐवज तो मनुष्य पुराव्यास घेईल तेव्हां त्याणें त्या त्या दस्तऐवजाची नकल खरी ह्मणून तिजवर सही करून ती व त्या दस्तऐवजाबाबद घेतलेले ड्यूटीची व दंडाची रकम लिहून सर्टिफिकेट कलेक्टराकडे पाठवावें, आणि सदर्हू प्रकारची रकम कलेक्टराकडे किंवा ज्या मनुष्यास तो याबाबद नेमील त्याकडे पाठवावी.

(२) इतर सर्व प्रसंगीं दस्तऐवज सदर्हूप्रमाणें अटकवून ठेवणारे मनुष्यानें असल दस्तऐवज कलेक्टराकडे पाठवावा.

कलम ३८, पोटकलम (१), याअन्वयें दिलेला दंड परत देण्याचा कलेक्टराचा अधिकार.

३९. (१) कलम ३८, पोटकलम (१), याअन्वयें कोणतेही दस्तऐवजाची नकल कलेक्टराकडे पांठविली असेल तेव्हां सदर्हू दस्तऐवजाबाबद दंड पांच रुपयांहून अधिक दिला असेल त्या अधिक रकमेचा कोणताही भाग याबाबद आपणास अर्जी करण्यांत आली असतां, किंवा अर्जी केली नसल्यास, निर्बंध ठेवणारे मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्याचे संमतीनें, आपणास योग्य वाटेल तर परत देण्याचा अधिकार त्यास आहे; किंवा

(२) सदर्हू प्रकारचा दस्तऐवज तेरावें किंवा चौदावें कलम तोडून लिहिला आहे एवढ्याच मात्र सबबेनें तो अटकवून ठेविला असेल तेव्हां सदर्हूप्रमाणें दिलेला सर्व दंड परत देण्याचा अधिकार त्यास आहे.

अटकवून ठेवलेले दस्तऐवजावर स्टांप मारण्याचा कलेक्टराचा अधिकार.

४० (१) जेव्हां कलेक्टर ( फक्त एक आणा ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असलेला दस्तऐवज किंवा बिल आफ् एक्स्चेंज किंवा प्रामिसरी नोट नसलेला ) कोणताही दस्तऐवज ३३ वे कलमाअन्वयें अटकवून ठेवील किंवा कलम ३८, पोटकलम (२),

याअन्वयें त्याकडे पाठविलेला तसा दस्तऐवज त्याकडे येईल तेव्हां त्याणें खालीं लिहिल्या-प्रमाणें काम चालवावें:—

(अ) सदहू प्रकारचे दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारला आहे किंवा ड्यूटी चार्ज होण्यास तो पात्र नाहीं असें त्याचें मत असेल तर योग्य रीतीनें स्टांप मारला आहे किंवा तो सदहूप्रमाणें चार्ज होण्यास पात्र नाहीं ह्मणून ( प्रसंगाप्रमाणें जसें असेल तसें ) शेरा त्याणें त्यावर लिहावा आणि याबाबद आपणास अर्जी करण्यांत आली असतां तो दस्तऐवज त्याणें दस्तऐवज अटकवून ठेवणारे अमलदाराचे हातीं ज्या मनुष्याचे कबज्यांतून आला असेल त्या मनुष्यास द्यावा किंवा तो मनुष्य सांगेल त्यास द्यावा;

(ब) सदहू प्रकारचा दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र आहे व त्यावर योग्य रीतीनें स्टांप मारलेला नाहीं असें कलेक्टराचें मत असेल तर योग्य ड्यूटी किंवा ती पुरती होण्यास जितकी रकम जरूर असेल तितकी रकम व पांच रुपये दंड देण्यास फर्मावावें, अथवा योग्य ड्यूटीचे रकमेची किंवा ती जितकी कमी असेल तितके भागाची दसपट रकम पांच रुपयांहून अधिक असेल तर आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणें पांच रुपयांहून कमी नाहीं व सदहू ड्यूटीचे किंवा भागाचे रकमेचे दसपटी-हून अधिक नाहीं इतका दंड देण्यास फर्मावावें:

परंतु असें ठरविलें आहे कीं सदहू प्रकारचा दस्तऐवज तेरावें कलम किंवा चौदावें कलम तोडून लिहिला आहे एवढ्याच मात्र सबबेनें तो अटकवून ठेवला असेल तेव्हां या कलमांत सांगितलेला सगळा दंड आपणास योग्य वाटेल तर माफ करण्याचा अधिकार कलेक्टरास आहे.

(२) पोटकलम (१), रकम (अ), याअन्वयें दिलेले प्रत्येक सर्टिफिकेटांत ( दाखल्यांत ) लिहिलेले गोष्टींबाबद तें सर्टिफिकेट या आक्टाचे कारणासाठीं निश्चयकारक पुरावा आहे असें समजावें.

अपायामुळें योग्य रीतीनें स्टांप न मारलेले दस्तऐवज.

४१. फक्त एक आणा ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारा दस्तऐवज, किंवा बिल आफ् एक्श्चेंज किंवा प्राम्सिरी नोट नसणारा जो कोणताही दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल व ज्याला योग्य स्टांप नसेल तो दस्तऐवज कोणताहि मनुष्य, तो करून दिल्याचे तारिखेपासून किंवा त्यावर पहिल्यानें (दस्तऐवज करून देणारांपैकीं कोणाची) सही झाल्याचे तारिखेपासून एक वर्षाचे आंत आपण स्वतः कलेक्टरासमक्ष हजर करील आणि त्या दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारला नाहीं ही गोष्ट तो मनुष्य कलेक्टरास कळवील व योग्य ड्यूटीची रकम किंवा ती पुरी होण्यास जितकी रकम जरूर असेल तितकी रकम कलेक्टरास तो मनुष्य देण्यास काढील आणि त्या दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारण्याचें वर्जिलें तें अपायाचे किंवा चुकीचे किंवा मोठे निकडीचे कारणानें झालें अशी कलेक्टराची खातरी होईल तर तेहतिसावें व चाळिसावें कलमाप्रमाणें काम चालविण्याचे बदला ती रकम घेण्याचा व या आक्टांत पुढें सांगितल्याप्रमाणें काम चालविण्याचा अधिकार कलेक्टरास आहे.

ज्या दस्तऐवजाची ३५ वे किंवा ४० वे किंवा ४१ वे कलमाअन्वयें ड्यूटी दिली असेल त्या दस्तऐवजावर शेरा.

४२. (१) कोणतेही दस्तऐवजाबाबद पडावयाची ड्यूटी व दंड ( असल्यास ) पसतिसावे कलमाअन्वयें किंवा चाळिसावे किंवा एकेचाळिसावे कलमाअन्वयें दिला असेल तेव्हां तो दस्तऐवज पुराव्यास घेणारे मनुष्यानें किंवा कलेक्टरानें ( प्रसंगाप्रमाणें जसें असेल तसें ) खालीं लिहिलेले मजकुराचा त्यावर शेरा लिहावा, ह्मणजे त्या दस्तऐवजाबाबद योग्य ड्यूटी किंवा ( प्रसंगाप्रमाणें जसें असेल तसें ) योग्य ड्यूटी व दंड ( प्रत्येकाची रकम लिहावी ) घेतला आहे हें व ती ड्यूटी व दंड देणारे मनुष्याचें नांव व राहण्याचें ठिकाण येणेंप्रमाणें मजकुराचा शेरा लिहावा.

(२) सदर्हूप्रमाणें ज्या ज्या दस्तऐवजावर शेरा लिहिला असेल तो मग पुराव्यास घेण्याचा अधिकार आहे, आणि त्यावर योग्य रीतीनें स्टांप मारला असल्याप्रमाणें तो नोंदण्याचा व त्याप्रमाणें काम चालविण्याचा व तो खरा ह्मणून त्यावर सही करण्याचा अधिकार आहे आणि तो दस्तऐवज अटकवून ठेवणारे अमलदाराचे हातीं ज्या मनुष्याचे कबज्यांतून आला असेल त्याणें त्याबाबद अर्ज केला असतां तो त्यास द्यावा किंवा तो मनुष्य सांगेल त्यास द्यावाः

परंतु असें ठरविलें आहे कीं—

(अ) ३९ वे कलमाअन्वयें ड्यूटी व दंड दिल्यावर कोणताही दस्तऐवज पुराव्यास घेतला असेल तो सदर्हूप्रमाणें अटकवून ठेवल्यापासून एक महिना झाल्यावांचून किंवा तो आणखी अटकवून ठेवणें अवश्य आहे अशा दाखला कलेक्टरानें लिहिला असेल व त्याणें तो दाखला रद्द केला नसेल तर तो दस्तऐवज सदर्हूप्रमाणें देऊं नये;

(ब) दिवाणी काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याचे १४४ वे कलमाचे ३ रे रकमेस या कलमांतील कोणतेही ठरावावरून व्यत्यय येतो असें समजूं नये.

स्टांपाचे कायद्याविरुद्ध केलेले अपराधाबद्दल खटला करणें.

४३. कोणतेही दस्तऐवजाविषयीं स्टांपाचे कायद्याविरूद्ध कोणतेही मनुष्यानें अपराध केला आहे असें वाटेल त्या मनुष्यावर या बाबीअन्वयें त्या दस्तऐवजाबाबद काम चालविल्यामुळें किंवा दंड दिला असल्यामुळें खटला करण्यास हरकत आहे असें समजूं नयेः

परंतु असें ठरविलें आहे कीं ज्या कोणतेही दस्तऐवजाबाबद सदर्हू प्रकारचा दंड दिला असेल त्या दस्तऐवजाचे प्रसंगीं योग्य ड्यूटी देण्याचें चुकविण्याचे इराद्यानें तो अपराध केला असें कलेक्टरास वाटल्यावांचून सदर्हूप्रमाणें खटला करूं नये.

ड्यूटी किंवा दंड देणारे मनुष्यांस तो किंवा तो कांहीं प्रसंगीं वसूल करण्याचा अधिकार आहे.

४४. (१) कोणतेही दस्तऐवजाबाबद कोणतेही मनुष्यानें पसतिसावे कलमाअन्वयें किंवा चाळिसावे कलमाअन्वयें किंवा एकेचाळिसावे कलमाअन्वयें कोणतीही ड्यूटी किंवा दंड दिला असेल आणि त्या दस्तऐवजासाठीं योग्य स्टांप पुरविण्याचा खर्च देण्याचें इतर कोणतेही मनुष्यास कबुलायतीवरून किंवा एकूणतिसावे कलमांतील ठरावाअन्वयें किंवा तो दस्तऐवज करून दिला त्या वेळीं अमलांत असणारे इतर कोणतेही कायद्यांतील ठरावाअन्वयें अवश्य असेल तेव्हां ज्या मनुष्यानें ड्यूटी किंवा दंड दिला असेल त्यास त्या दिलेले ड्यूटीची किंवा दंडाची रकम सदर्हू प्रकारचे इतर मनुष्याजवळून वसूल करून घेण्याचा हक्क आहे.

(२) सदर्हूप्रमाणें वसूल करण्याचे कारणासाठीं खालीं लिहिलेलें सर्टिफिकेट (दाखला) ह्मणजे त्या दस्तऐवजाबाबद बेचाळिसावे कलमाअन्वयें दिलेलें सर्टिफिकेट त्यांत लिहिलेले गोष्टीविषयीं निश्चयकारक पुरावा आहे.

(३) ज्या दाव्यांत सदर्हू प्रकारचीं मनुष्यें पक्षकार आहेत व ज्यांत सदर्हू प्रकारचा दस्तऐवज पुराव्यांत दिलेला आहे, अशा कोणत्याही दाव्यांतील खर्चाबाबद केलेल्या कोणत्याही हुकुमांत सदर्हू रकमेचा समावेश करतां येईल.

कित्येक प्रसंगीं दंड माफ करण्याचा किंवा परत देण्याचा अगर फाजील ड्यूटी परत देण्याचा रेव्हेन्यू अधिकाऱ्यास अधिकार.

४५. (१) पसतिसावे किंवा चाळिसावे कलमाअन्वयें कोणताही दंड द्यावयाचा असेल तेव्हां, निर्बंध ठेवणारे मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्यास, लेखी अर्जी करण्यांत आली असतां, सदर्हू प्रकारचा दंड सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं माफ करण्याचा अधिकार आहे.

३५ वे किंवा ४० वे कलमाअन्वयें दिलेले दंडाची माफी.

(२) कोणताही दंड पसतिसावे किंवा चाळिसावे कलमाअन्वयें दिला असेल तेव्हां तो दंड ज्या तारिखेस दिला त्या तारिखेपासून एका वर्षाचे आंत लेखी अर्जी केली असतां तो दंड सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं परत देण्याचा अधिकार निर्बंध ठेवणारे मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्यास आहे.

(३) कायदेशीर रीतीनें चार्ज होण्यास पात्र असणारे स्टांप-ड्यूटीपेक्षां जास्त ड्यूटी निबंध ठेवणारे मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्याचे मतें चार्ज केली असून पसतिसावे किंवा चाळिसावे कलमाअन्वयें ती भरली असेल तेव्हां त्यास, ती ड्यूटी चार्ज करण्याचा हुकूम झाल्यापासून तीन महिन्यांच्या आंत लेखी अर्जी आली असतां, ती जास्त ड्यूटी परत देण्याचा अधिकार आहे.

४६. (१) कोणताही दस्तऐवज अडतिसावे कलमाचे दुसरे पोटकलमाअन्वयें कलेक्टराकडे रवाना केला असेल तो रस्त्यांत हरवला किंवा त्याचा नाश झाला किंवा बिघडला तर तो हरवल्याबदलची किंवा त्याचा नाश झाल्याबदलची किंवा तो बिघडल्याबदलची जबाबदारी तो दस्तऐवज पाठविणारे मनुष्याकडे नाहीं.

३८ वे कलमाअन्वयें पाठविलेले दस्तऐवज हरवल्याबद्दल जबाबदारी नाहीं.

(२) कोणताही दस्तऐवज सदर्हूप्रमाणें पाठवावयाचा असेल तेव्हां तो अटकवून ठेवणारे मनुष्याचे हातीं ज्या मनुष्याचे कबज्यांतून आला असेल त्या मनुष्यास खालीं लिहिल्याप्रमाणें सांगण्याचा अधिकार आहे. म्हणजे माझे खर्चानें त्याची नकल करावी व ती खरी आहे म्हणून त्यावर तो दस्तऐवज अटकवून ठेवणारे मनुष्यानें सही करावी असें सांगण्याचा अधिकार आहे.

सदर्हूप्रमाणें पाठवावयाचे दस्तऐवजाची नकल करण्याचा अधिकार आहे.

४७. कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक जो एक आणा ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल तो स्टांप मारल्यावांचून पैका मिळण्यासाठीं आणून देण्यांत येईल तेव्हां ज्या मनुष्याकडे तो सदर्हूप्रमाणें आणून दिला असेल त्यास जरूर असणारा चिकटणारा स्टांप त्यावर लावण्याचा अधिकार आहे. आणि सदर्हू प्रकारचे बिलावरून किंवा चेकावरून द्यावयाची रकम तो स्टांप या आक्टांत मागें सांगितलेले रीतीनें रद्द केल्यावर देण्याचा अधिकार आहे आणि ज्या मनुष्यानें ती ड्यूटी देणें अवश्य होती त्या मनुष्यावर ती चार्ज करण्याचा किंवा सदर्हूप्रमाणें द्यावयाचे रकमेंतून ती बाद करण्याचा अधिकार आहे. आणि सदर्हू प्रकारचें बिल किंवा चेक ड्यूटीच्या संबंधापुरता खरा व व्यवहारोपयोगी आहे असें समजावें:

ऐवज देणारास वगरस्टांपाचीं बिलें व चेक पोंहचतील त्यांवर स्टांप लावण्याचा त्याचा अधिकार.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, सदर्हू प्रकारचे बिलाचे किंवा चेकाचे संबंधानें कोणताही मनुष्य कोणतेंही दंडास किंवा काम चालविलें जाण्यास पात्र होईल, तर त्यांतून तो या कलमांतील कोणतेंही ठरावावरून सुटतो असें समजूं नये.

४८. या बाबींत ठरविल्याप्रमाणें द्यावयाच्या सर्व ड्यूटी, दंड व दुसऱ्या रकमा, ज्या मनुष्याकडून त्या येणें असतील त्या मनुष्याची जंगम मिळकत जप्त करून व विकून, किंवा जमीनमहसुलाची बाकी वसूल करण्याबद्दल त्या त्या वेळीं अमलांत असणारे दुसऱ्या कोणत्याही रीतीनें वसूल करण्याचा अधिकार कलेक्टरास आहे.

ड्यूटी व दंड वसूल करणें.

---

## बाब ५.

### कित्येक प्रसंगीं स्टांपांबद्दल मोबदला.

४९. जरूर असणाऱ्या पुराव्याबाबद किंवा करावयाच्या चवकशीबाबद, ज्या कानू गवरनर जनरल इन् कौन्सिल करतील त्या कानूंस पात्र राहून, कलेक्टरास, पन्नासावे कलमांत ठरविलेले मुदतीचे आंत अर्जी आली असतां, व त्यांतील गोष्टींविषयीं त्याची खात्री झाल्यास, वठविलेले स्टांप पुढें लिहिलेले प्रसंगीं बिघडले असतील त्यांचा मोबदला देण्याचा अधिकार आहे, म्हणजे :

बिघडलेले स्टांपांबद्दल मोबदला.

(अ) कोणतेंही कागदावर लिहिलेला कोणताही दस्तऐवज कोणतेंही मनुष्यानें करून देण्यापूर्वी त्या कागदावरील स्टांप चुकीनें व उद्देशावांचून खराब झाला असेल, किंवा दिसत नाहींसा झाला असेल किंवा ज्या कारणासाठीं तो योजलेला असेल त्या कारणास लिहिण्याच्या चुकीमुळें किंवा दुसरे कोणतेही गोष्टीनें निरुपयोगी झाला असेल तो स्टांप:

[ ]

(ब) सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं लिहिलेले परंतु कोणतेही पक्षकारानें सही न केलेले किंवा करून न दिलेले कोणतेही दस्तऐवजावरचा स्टांपः

(क) बिल् आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट यांच्या प्रसंगीं—

(१) जें बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक करणारानें किंवा करणाराच्या वतीनें सही केलेलें आहे, किंवा जें सकारलें किंवा कोणत्याही रीतीनें वापरलें नाहीं किंवा जें सकारण्यासाठीं देऊं करण्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही कारणाकरितां त्याच्या हाताबाहेर गेलेलें नाहीं, अशा कोणतेही बिल आफ् एक्श्चेंजवरचा किंवा चेकवरचा स्टांप; परंतु ज्या कागदावर सदर्हू प्रकारचा कोणताही स्टांप वठविला असेल त्या कागदावर पुढें लिहावयाचें कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक सकारला ह्मणून किंवा सकारण्यासाठीं ह्मणून योजलेली कोणतीही सही त्या कागदावर नसावी,

(२) करणारानें किंवा करणाराच्या वतीनें सही केलेली व कोणतेही रीतीनें न वापरलेली, किंवा त्याचे हाताबाहेर न गेलेली, अशा कोणत्याही प्रामिसरी नोटीवरचा स्टांपः

(३) कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट लिहिणारानें किंवा त्याचे तर्फे सही केलेली असेल परंतु कोणतीही गोष्ट वर्जिल्यामुळें किंवा चुकीमुळें जी विघडली असेल किंवा निरुपयोगी झाली असेल आणि ती बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक असल्यामुळें तो सकारण्यासाठीं नेऊन दाखवितां आला असेल किंवा सकारला असेल किंवा त्यावर शेरा लिहिला असेल किंवा ती प्रामिसरी नोट असल्यामुळें ज्यास ऐवज द्यावयाचा त्यास देण्यांत आली असेल तथापि त्या बिल आफ् एक्श्चेंजासाठीं किंवा चेकासाठीं किंवा प्रामिसरी नोटीसाठीं उपयोग केलेला किंवा उपयोग करण्याचा इरादा असलेला स्टांपः परंतु विघडलेले बिलाशीं किंवा चेकाशीं किंवा नोटीशीं, सदर्हू प्रकारचें वर्जन किंवा चूक नीट करण्याचें खेरीज करून इतर सर्व गोष्टींत अगदीं सारिखें पुरें केलेलें व योग्य रीतीनें स्टांप मारलेलें दुसरें बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट हजर केलेली असावी.

(ड) कोणतेही पक्षकारानें करून दिलेल्या खालील प्रकारच्या दस्तऐवजावरील स्टांप; ह्मणजे जो दस्तऐवज—

(१) पहिल्यापासून कायद्याच्या दृष्टीनें अगदीं रद्दबातल आहे, असें पुढें ठरेल तो दस्तऐवजः

(२) मूळचा ज्या कारणासाठीं योजला होता त्या कारणास त्यांत कोणतीही चूक किंवा हस्तदोष असल्यामुळें निरुपयोगी आहे असें पुढें ठरेल तो दस्तऐवज :

(३) ज्या मनुष्यानें करून देणें अवश्य होता त्या मनुष्यानें तो करून दिल्यावांचून तो मनुष्य मरण पावल्यामुळें, किंवा सदर्हू प्रकारचे कोणतेही मनुष्यानें तो करून देण्यास नाहीं ह्मटल्यामुळें तो दस्तऐवज योजलेले नमुन्याप्रमाणें योजलेला व्यवहार होण्याजोगा पुरा करतां येत नसेल तो दस्तऐवज :

(४) कोणी प्रधान पक्षकारानें करून दिलेला नसल्यामुळें व त्यावर तो सही करण्यास शक्तिमान नसल्यामुळें किंवा त्यावर सही करण्यास

त्यानें नाहीं ह्मटल्यामुळें योजलेले कामासाठीं खरोखर अपूर्ण व अपुरता असेल तो दस्तऐवज :

(५) त्याअन्वयें काम करण्यास कोणतेंही मनुष्यानें नाहीं ह्मटल्यामुळें किंवा त्यावरून जो पैसा मिळावा असा इरादा असेल तो धिरण्यास नाहीं ह्मटल्यामुळें किंवा त्या दस्तऐवजावरून दिलेला कोणताही हुद्दा घेण्यास नाहीं ह्मटल्यामुळें किंवा न स्वीकारल्यामुळें, योजलेल्या कारणाकरितां बिलकूल उपयोगीं पडत नसेल तो दस्तऐवज :

(६) त्या दस्तऐवजावरून जो व्यवहार करण्याचें योजिलें होतें तो व्यवहार त्याच पक्षकारांमध्यें केलेले व कमी किंमतीचा नव्हे असा स्टांप असलेले इतर कोणतेंही दस्तऐवजावरून झाल्यामुळें निरुपयोगी झाला असेल तो दस्तऐवज :

(७) चुकीनें व उद्देशावांचून बिघडला असेल व ज्याचेबदला, त्याच पक्षकारांचे दरमियान व त्याच कारणासाठीं झालेला दुसरा दस्तऐवज करून दिला असेल व त्यावर योग्य रीतीनें स्टांप मारला असेल तो दस्तऐवज :

परंतु असें ठरविलें आहे कीं करून दिलेले दस्तऐवजाचे प्रसंगीं, ज्या कामामध्यें तो दस्तऐवज पुराव्यांत देतां किंवा देण्यास काढतां आला असता किंवा दिला अगर देण्यास काढला असतां, असें कोणतेंही कायदेशीर काम चालण्यास सुरुवात झालेली असतां कामा नये, व तो दस्तऐवज रद्द करण्यासाठीं दिला असला पाहिजे.

**खुलासा.**—बत्तिसावे कलमाअन्वयें कलेक्टरनें घेतलेली व दाखला दिलेली स्टांप-ड्यूटी, या कलमाचे अर्थाप्रमाणें, वठवलेला स्टांप ह्मणून समजावी.

**दाद मिळण्यासाठीं अर्जी केव्हां केली पाहिजे.**

५०. एकुणपन्नासावे कलमाअन्वयें दाद मिळविण्यासाठीं अर्जी खालीं दिदेल्या मुदतींत केली पाहिजे, ह्मणजे--

(१) (ड) (५) या रकमेंत सांगितलेल्या प्रसंगीं, दस्तऐवजाचे तारखेपासून दोन महिन्यांचे आंत:

(२) ज्या स्टांपाचे कागदावर कोणत्याहि पक्षकारांनीं दस्तऐवज करून दिला नसेल त्या स्टांपाचे कागदाचे प्रसंगीं, तो स्टांप बिघडल्यानंतर साहा महिन्यांचे आंत :

(३) ज्या स्टांपाचे कागदावर कोणत्याही पक्षकारानें दस्तऐवज करून दिला असेल त्या स्टांपाचे कागदाचे प्रसंगीं, त्या दस्तऐवजाचे तारखेनंतर साहा महिन्यांचे आंत, अथवा जर त्याजवर तारीख नसेल तर, ज्या मनुष्यानें प्रथम किंवा एकट्यानेंच तो दस्तऐवज करून दिला त्या मनुष्यानें तो करून दिल्यानंतर सहा महिन्यांचे आंत :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं—

(अ) जर बिघडलेला दस्तऐवज पुरत्या कारणांसाठीं ब्रिटिश इंडियाबाहेर पाठविला असेल, तर तो ब्रिटिश इंडियांत परत मिळाल्यावर साहा महिन्यांचे आंत सदरहू अर्जी करतां येईल:

(ब) ज्या कोणतेंही दस्तऐवजाबद्दल दुसरा दस्तऐवज केला असेल तो रद्द करण्यासाठीं अनिवार्य गोष्टींमुळें देतां येत नसेल, तेव्हां असा दुसरा दस्तऐवज करून दिल्याचे तारखेनंतर साहा महिन्यांचे आंत सदरहू अर्जी करतां येईल.

[ ]

मंडळ्यांस पुढें जरूर नसलेले छापील नमुन्यांचे प्रसंगीं मोबदला.

९१. निर्बंध ठेवणारे मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्यास, कोणतेही संस्थापित कंपनीनें किंवा दुसऱ्या एकव्यक्तीभूत मंडळीनें दस्तऐवजांचे छापील नमुन्यांसाठीं उपयोग केलेल्या स्टांपाचे कागदांबदल मोबदला, कोणत्याही पुरत्या कारणासाठीं अशा नमुन्यांची सदहू कंपनीस अगर एकव्यक्तीभूत मंडळीस जरूर राहिली नाहीं असें असल्यास, मुदतीच्या यत्तेवांचून, देण्याचा अधिकार आहेः मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा स्टांपाचे कागदांबाबदची ड्यूटी योग्य रीतीनें दिलेली असल्याबदल सदहू अधिकाऱ्याची खात्री खाली पाहिजे.

करावयाचा तो उपयोग न केलेले स्टांपाबदल मोबदला.

९२. (अ) ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारे दस्तऐवजासाठीं कोणतेही मनुष्यानें चुकीनें खालीं लिहिलेले प्रकारचे स्टांपाचा उपयोग केला असेल तेव्हां, म्हणजे या आक्टाअन्वयें केलेले कानूवरून सदहू प्रकारचे दस्तऐवजाबदल ज्या प्रकारचा स्टांप ठरविलेला असेल त्याहून इतर प्रकारचे स्टांपाचा उपयोग केला असेल तेव्हां किंवा ज्या किंमतीचा स्टांप जरूर होता त्याहून अधिक किंमतीचे स्टांपाचा उपयोग केला असेल तेव्हां किंवा जो दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र नसेल त्या दस्तऐवजाबदल कोणतेही स्टांपाचा उपयोग चुकीनें केला असेल तेव्हां, किंवा

(ब) कोणतेही दस्तऐवजासाठीं उपयोग केलेला कोणताही स्टांप तो दस्तऐवज तेरावे कलमांतील ठराव तोडून लिहिला असल्यामुळें, पंधरावे कलमाअन्वयें चुकीनें निरुपयोगी झाला असेल तेव्हां,

त्या दस्तऐवजाचे तारिखेनंतर सहा महिन्यांचे आंत किंवा दस्तऐवजावर तारीख नसेल तर त्यावर ज्या मनुष्यानें प्रथम किंवा एकव्यानें सही केली त्या मनुष्यानें त्यावर सही केल्यानंतर सहा महिन्यांचे आंत अर्जी करण्यांत आली असतां आणि दस्तऐवज कोणतीही ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल तर त्यावर योग्य ड्यूटीचा पुनः स्टांप मारल्यावर कलेक्टर, करावयाचा तसा उपयोग न केलेला किंवा सदहूप्रमाणें निरुपयोगी झालेला स्टांप विघडला म्हणून तो रद्द करण्यास व ती गोष्ट कबूल करण्यास मुख़त्यार आहे.

विघडलेले व करावयाचा तसा उपयोग न केलेले स्टांपांबदल मोबदला कसा द्यावा.

९३. विघडलेले किंवा करावयाचा तसा उपयोग न केलेले स्टांपाबदल मोबदला द्यावयाचा असेल त्या प्रसंगीं त्या स्टांपाचेबदला,

(अ) त्याच प्रकारचे व किंमतीचे दुसरे स्टांप, अथवा

(ब) मागितले व आपणास योग्य वाटलें तर तितकेच किंमतीचे रकमेचे इतर कोणतेही प्रकारचे स्टांप, अथवा

(क) दर रुपयास किंवा रुपयाचे कोणतेही भागास एक आणा वजा करून आपले नजरेस येईल तर तितके किंमतीचा पैसा,

देण्याचा अधिकार कलेक्टरास आहे.

उपयोग करण्यासाठीं ज्या स्टांपाची जरूर नसेल त्या स्टांपाबदल मोबदला.

९४. जो कोणताही स्टांप विघडला नाहीं किंवा ज्या कारणासाठीं तो योजला होता त्या कारणास तो अयोग्य किंवा निरुपयोगी झाला नाहीं तो स्टांप कोणतेही मनुष्याचे कबज्यांत असेल परंतु त्यास त्याचा लागलाच उपयोग नसेल तेव्हां त्या मनुष्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें केलें असतां म्हणजे त्या मनुष्यानें तो स्टांप रद्द करण्यासाठीं दिला असतां व

(अ तो उपयोग करण्यासाठीं सत्यबुद्धीचे हेतूनें तो त्या मनुष्यानें विकत घेतला होता, व

(ब) त्याची त्यानें संपूर्ण किंमत दिली आहे, व

(क) तो सदहूप्रमाणें ज्या तारखेस दिला त्या तारिखेचे लगत आदले सहा महिन्यांचे मुदतीचे आंत सदहूप्रमाणें विकत घेतला होता,

असें कलेक्टराचे खातरीनिशीं शाबित केलें असतां त्या स्टांपाचे किंमतीचा पैका दर रुपयास किंवा रुपयाचे भागास एक आणा वजा करून त्या मनुष्यास कलेक्टरानें परत द्यावा:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जर तो मनुष्य लैसेन्सदार स्टांप विकणारा असेल, तर कलेक्टरास योग्य वाटल्यास, पूर्वी सांगितल्या प्रकारची वजावाट मुळींच न करितां तो मोबदला परत देण्याचा अख़्यार आहे.

कित्येक डिबेंचर नवे केल्यावर मोबदला.

९९. योग्य रीतीनें स्टांप मारलेले कोणतेही डिबेंचराबद्दल त्याच मजकुराचा दुसरा नवा डिबेंचर काढला असेल तेव्हां कलेक्टरास, एक महिन्याचे आंत अर्जी केली असतां, सदर्हू प्रकारचा डिबेंचर काढणारे मनुष्यास मूळचे अगर नवे डिबेंचरावरील स्टांपाची किंमत, ह्मणजे जी कमी असेल ती किंमत, परत देण्याचा अखत्यार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं तो मूळचा डिबेंचर कलेक्टरापुढें हजर केला पाहिजे व त्यानें तो गवर्नर जनरल इन् कौन्सिल हे फर्मावितील त्या रीतीनें रद्द केला पाहिजे.

खुलासा.—खालील फेरफार असले तरी या कलमाच्या अर्थाप्रमाणें नवीन केलेला डिबेंचर मूळच्या मजकुराचाच आहे, असें समजलें पाहिजे. ते फेरफार येणेंप्रमाणें:—

(अ) मूळचे एका डिबेंचराऐवजीं तेवढ्याच एकंदर रकमेचे दोन किंवा अधिक डिबेंचर काढणें.

(ब) मूळचे दोन किंवा अधिक डिबेंचराऐवजीं तेवढ्याच एकंदर रकमेचा एक डिबेंचर काढणें.

(क) कोणताही डिबेंचर नवीन करावयाचे वेळीं, मूळचे धारण करणाराचे नांवाऐवजीं त्या वेळीं धारण करणाराचें नांव घालणें.

(ड) व्याजाचे दरांत अगर तें देण्याचे तारखांत फेरफार करणें.

---

## बाब ६.

### लिहून पाठविणें व तपासणी.

मुख्य रेव्हिन्यू अधिकाऱ्याचा निर्बंध.

९६. (१) बाब ४ व बाब ५ यांअन्वयें कलेक्टरानें चालवावयाचे अधिकार सर्व प्रसंगीं, निर्बंध ठेवणारे मुख्य रेवेन्यू अधिकाऱ्याचे निर्बंधास पात्र राहतील.

चार्ज होण्यास पात्र असणारे ड्यूटीविषयीं कलेक्टरास संशय येईल तेव्हां काम चालविण्याची रीति.

(२) एकतिसावे कलमाअन्वयें किंवा चाळिसावे कलमाअन्वयें किंवा एकेचाळिसावे कलमाअन्वयें काम चालवीत असतां कोणतेही कलेक्टरास कोणताहि दस्तऐवज जो ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल त्या ड्यूटीचे रकमेविषयीं संशय येईल तर त्याणें त्या प्रकरणाची कैफियत लिहून काढावी व आपले अभिप्रायासुद्धां ती निर्बंध ठेवणारे मुख्य रेवेन्यू अधिकाऱ्याकडे फैसला करण्यासाठीं पाठवावी.

(३) सदर्हू प्रकारचे अधिकाऱ्यानें त्या प्रकरणाचा विचार करावा व आपले फैसल्याची नकल कलेक्टराकडे पाठवावी, आणि कलेक्टरानें त्या फैसल्यास अनुसरून ड्यूटी आकारून चार्ज करण्यास ( चार्ज होत असल्यास ) लागावें.

रेव्हेन्यू अधिकाऱ्यानें हे कोर्टास लिहून पाठविणें.

९७. (१) कोणतेंही प्रकरण कलम ९६ पोटकलम (२) याअन्वयें आपणाकडे पाठविलें असेल किंवा इतर रीतीनें आपणास जाहीर झालें असेल त्याची कैफियत लिहून काढण्याचा व तें प्रकरण आपले अनुमतासहित खालीं लिहिलेले कोर्टाकडे पाठविण्याचा अधिकार निर्बंध ठेवणारे मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्यास आहे, म्हणजे तें प्रकरण —

(अ) मद्रासचे गवरनर इन् कौन्सिल किंवा मुंबईचे गवरनर इन् कौन्सिल ज्या वेळीं ज्या मुलकाचा राज्यकारभार चालवीत असतील त्या वेळीं त्या मुलकांत उत्पन्न झालें असेल तर प्रसंगाप्रमाणें मद्रासचे किंवा मुंबईचे इन्साफाचे हे कोर्टाकडे :

(ब) वायव्य प्रांतांत किंवा अयोध्येंत किंवा अजमीरांत उत्पन्न झालें असेल तर वायव्य प्रांताचे इनसाफाचे हे कोर्टाकडे :

(क) पंजाबचे लेफ्टेनेंट गंवर्नर ज्या वेळीं ज्या मुलकाचे राज्यकारभार चालवीत असतील त्या वेळीं त्या मुलकांत उत्पन्न झालें असेल तर पंजाबचे चीफ कोर्टाकडे :

(ड) सेंट्रल प्राविन्सांत उत्पन्न झालें असेल तर मुंबई येथील इन्साफाचे हे कोर्टाकडे : आणि

(इ) ब्रिटिश इंडियाचे इतर कोणतेंही भागांत उत्पन्न झालें असेल तर कलकत्ता येथील इन्साफाचे हे कोर्टाकडे :

पाठविण्याचा अधिकार आहे.

(२) सदहू प्रकारचें प्रत्येक प्रकरण ज्या हे कोर्टाकडे किंवा चीफ कोर्टाकडे पाठविलें असेल त्या कोर्टाचे निदान तीन जज्जांनीं त्या प्रकरणाचा फैसल्ला करावा आणि भिन्न मत पडेल त्या प्रसंगीं बहुमताप्रमाणें करावें.

आगखी तपशील मागविण्याचा कोर्टाचा अधिकार.

९८. निघालेल्या तकरारीचा निकाल करतां येण्यास प्रकरणाच्या कैफियती पुरत्या आहेत अशी त्या हे कोर्टाची किंवा चीफ कोर्टाची खातरी न होईल तर ज्या रेव्हेन्यू अधिकाऱ्यानें त्या प्रकरणाची कैफियत लिहून पाठविली असेल त्या अधिकाऱ्याकडे आपण फर्माविल्याप्रमाणें आणखी मजकूर वाढविण्यासाठीं किंवा त्यांत फेरफार करण्यासाठीं तें प्रकरण परत पाठविण्याचा अधिकार त्या कोर्टास आहे.

लिहून आलेल्याचा निकाल करण्यांत काम चालविण्याची रीति.

९९ (१) सदहू प्रकारचे कोणतेही प्रकरणाची चौकशी केल्यावर हे कोर्टानें किंवा चीफ कोर्टानें त्या प्रकरणांत निघालेले तकरारीचा निकाल करावा आणि त्याबाबद आपला फैसल्ला द्यावा. तो फैसल्ला ज्या सबबींवरून केला असेल त्या सबबी त्या फैसल्यांत असाव्या.

(२) त्या प्रकरणाची कैफियत ज्या रेव्हेन्यू अधिकाऱ्यानें लिहून पाठविली असेल त्या अधिकाऱ्याकडे त्या फैसल्याची नकल त्या कोर्टानें आपले शिक्यानिशीं व रजिस्ट्राराचे सहीनिशीं पाठवावी. आणि रेव्हेन्यू अधिकाऱ्यानें ती फैसल्याची नकल पोंचल्यावर त्या फैसल्याप्रमाणें त्या प्रकरणाचा निकाल करावा.

दुसरे कोर्टांनीं हे कोर्टास लिहून पाठविणें.

६०. (१) कोणतेही दस्तऐवजाबाबद ड्यूटी द्यावयाची तिचे रकमेविषयीं एसतिसावे कलमाचे (अ) या विशेष ठरावावरून सत्तावन्नावे कलमांत सांगितलेले कोर्टाखेरीज इतर कोणतेही कोर्टास संशय येईल तर त्या कोर्टाचा जज्ज त्या प्रकरणाची कैफियत लिहून काढून ती आपले अभिप्रायासुद्धां फैसल्ला होण्यासाठीं खालीं लिहिलेले हे कोर्टाकडे किंवा चीफ कोर्टाकडे पाठविण्यास मुखत्यार आहे, म्हणजे आपण निर्बंध ठेवणारा मुख्य रेव्हेन्यू अधिकारी असता तर आपण तें प्रकरण सत्तावन्नावे कलमाअन्वयें ज्या हे कोर्टाकडे

किंवा चीफ कोर्टाकडे पाठविता त्या हे कोर्टाकडे किंवा चीफ कोर्टाकडे पाठविण्यास मुखत्यार आहे.

(२) सदर्हू प्रकारचे कोर्टानें त्या प्रकरणाची तजवीज तें प्रकरण सत्तावनावे कलमाअन्वयें पाठविलें असल्याप्रमाणें करावी व आपले फैसल्याची नकल कोर्टाचे शिक्यानिशीं व रजिस्ट्राराचे सहीनिशीं निर्बंध ठेवणारे मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्याकडे पाठवावी, व दुसरी तशीच नक्कल तें प्रकरण पाठविणारे जज्जाकडे पाठवावी. त्या जज्जानें ती फैसल्याची नकल पोंहचल्यावर त्या प्रकरणाचा निकाल सदर्हू फैसल्याप्रमाणें करावा.

(३) डिस्ट्रिक्ट कोर्टाचे ताब्यांतील कोर्टानें पोट कलम (१) याअन्वयें लिहून पाठवणें तें डिस्ट्रिक्ट कोर्टाचे मार्फत पाठवावें आणि ताब्यांतील कोणतेंही रेव्हेन्यू कोर्टानें लिहून पाठविणें तें प्रत्यक्ष वरिष्ठ कोर्टाचे मार्फत पाठवावें.

स्टांपाचे पुरतेपणाबाबद कोर्टाचे कित्येक फैसल्यांची तपासणी.

६१. (१) कोणतेंही कोर्ट दिवाणी किंवा रेव्हेन्यू हुकुमत चालवून, किंवा कोणतेंही फौजदारी कोर्ट सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचा कायदा यांतील बाराचे किंवा छत्तिसावे बाबीअन्वयें चालविलेल्या कोणत्याही कामांत, खालीं लिहिल्याप्रमाणें हुकूम करील तेव्हां, ह्मणजे कोणतेंही दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारलेला आहे ह्मणून किंवा त्या स्टांपाची जरूर नाहीं ह्मणून अथवा पसतिसावे कलमाअन्वयें ड्यूटी व दंड दिल्यावरून तो दस्तऐवज पुराव्यास कबूल करण्याचा हुकूम करील तेव्हां त्या कोर्टाचे फैसल्यावर ज्या ( दुसरे ) कोर्टाकडे अपील चालत असेल किंवा त्या कोर्टाकडून ज्या ( दुसरे ) कोर्टास लिहून पाठविण्यांत येत असेल त्या दुसरे कोर्टास आपण स्वतःच किंवा कलेक्टरानें दरखास्त केली असतां सदर्हू प्रकारचे हुकुमाचा विचार करण्याचा अधिकार आहे.

(२) पसतिसावे कलमाअन्वयें ड्यूटी व दंड दिल्यावांचून किंवा जी ड्यूटी व दंड दिला असेल त्यापेक्षां अधिक ड्यूटी व दंड दिल्यावांचून सदर्हू प्रकारचा दस्तऐवज पुराव्यास कबूल करावयाचा नव्हता असें सदर्हू कोर्टाचे सदर्हू विचार केल्यानंतर मत असेल तर त्या मजकुराचें ज्ञापन दफतरांत लिहून ठेवण्याचा व तो दस्तऐवज जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल तिची रकम ठरविण्याचा अधिकार आणि ज्या कोणतेंही मनुष्याचे कबज्यांत किंवा अखत्यारांत तो दस्तऐवज त्या वेळीं असेल त्यास तो दस्तऐवज हजर करण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार व तो हजर करण्यांत येईल तेव्हां तो अटकावून ठेवण्याचा अधिकार त्या कोर्टास आहे.

(३) पोटकलम (२) अन्वयें कोणतेंही ज्ञापन दफतरांत लिहून ठेविलें असेल तेव्हां तें लिहून ठेवणारे कोर्टानें त्या ज्ञापनाची नकल कलेक्टराकडे पाठवावी. आणि ज्या दस्तऐवजाविषयीं तें ज्ञापन असेल तो दस्तऐवज अटकावून ठेवलेला असेल किंवा सदर्हू कोर्टाचे कबज्यांत इतर रीतीनें असेल तेव्हां तो दस्तऐवजही कलेक्टराकडे पाठवावा.

(४) मग सदर्हू दस्तऐवज पुराव्यास कबूल करण्याविषयींचे हुकुमांत किंवा बेचाळिसावे कलमाअन्वयें दिलेले कोणतेंही सर्टिफिकेटांत किंवा त्रेचाळिसावे कलमांत कोणतीही गोष्ट असली तथापि कलेक्टरास खालीं लिहिल्याप्रमाणें करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे त्या दस्तऐवजाबाबद, कोणतेंही मनुष्यानें स्टांपाचे कायद्याविरुद्ध कोणताही अपराध केला आहे असें आपणास वाटेल त्या अपराधाबद्दल त्या मनुष्यावर काम चालविण्याचा अधिकार आहे :

परंतु असें ठरविलें आहे कीं—

(अ) सदर्हूप्रमाणें काम चालविणें तें, सदर्हू कोर्टाचे ठरावाप्रमाणें ( ड्यूटी व दंड मिळून ) जी रकम पसतिसावे कलमाअन्वयें त्या दस्तऐवजाबाबद

देणें होत असेल ती कलेक्टरास दिली असेल व योग्य ड्यूटी देण्याचें चुकविण्याचे इरादानें अपराध केला आहे असें कलेक्टरास वाटत नसेल तेव्हां चालवूं नये :

(ब) कोणताही दस्तऐवज पुराव्यास देण्याचे कोणतेही हुकुमाचे किंवा बेचाळिसावे कलमाअन्वयें दिलेले कोणतेही सर्टिफिकेटाचे व्यवहारोपयोगीपणास, या कलमाअन्वयें केलेले कोणतेही ज्ञापनावरून, सदहूप्रमाणें काम चालविण्याचे कारणांखेरीज, व्यत्यय येतो असें समजूं नयें.

---

## बाब ७.

### फौजदारी गुन्हे व काम चालविण्याची रीति

योग्य रीतीनें स्टांप न मारलेला दस्तऐवज करून दिल्याबद्दल दंड.

६२. (१) (अ) योग्य रीतीनें स्टांप मारल्यावांचून असलेलें कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा चेक किंवा प्रामिसरी नोट जो कोणताही मनुष्य लिहील किंवा करील किंवा देईल किंवा तिचे पाठीवर शेरा लिहील किंवा ती दुसऱ्याचे नांवावर करील किंवा साक्षीदार या नात्याखेरीज इतर रीतीनें तिजवर सही करील किंवा सकारण्यासाठीं किंवा पैका मिळण्यासाठीं दाखवील किंवा सकारील किंवा तिचा ऐवज देईल किंवा घेईल किंवा कोणतेही रीतीनें बेचन करील तो मनुष्य,

(ब) जो कोणताही मनुष्य ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारा इतर कोणताही दस्तऐवज योग्य रीतीनें स्टांप मारल्यावांचून करून देईल किंवा साक्षीदार या नात्याखेरीज इतर रीतीनें त्यावर सही करील, आणि

(क) जो कोणताही मनुष्य योग्य रीतीनें स्टांप मारलेले नाहीं असे कोणतेही प्राक्सीवरून (सभेंत मत देण्याविषयींचे अधिकारपत्रावरून) मत देईल किंवा मत देण्याचा यत्न करील तो,

सदहू प्रकारचे प्रत्येक अपराधाबद्दल पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंड होण्यास पात्र होईल:

परंतु असें ठरविलें आहे कीं, पसतिसावे कलमाअन्वयें किंवा चाळिसावे कलमाअन्वयें किंवा एकसष्टावे कलमाअन्वयें कोणतेही दस्तऐवजाबाबद कोणताही दंड दिला असेल तेव्हां त्या दंडाची रकम तो दंड ज्या मनुष्यानें दिला असेल त्या मनुष्यास त्याच दस्तऐवजाबाबद या कलमाअन्वयें पुढें कोणताही दंड झाला असल्यास त्या दंडांत मजुरा द्यावी.

(२) योग्य रीतीनें स्टांप लावल्यावांचून जर शेर-वारंट दिलें तर तें देणाऱ्या कंपनीस, व त्याप्रमाणेंच तें दिलें असेल त्यावेळीं जो मनुष्य त्या कंपनीचा म्यानेजिंग डरेक्टर अगर सेक्रेटरी अगर इतर मुख्य अमलदार असेल असा प्रत्येक मनुष्य पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

चिकटणारा स्टांप रद्द करण्यास चुकल्याबद्दल दंड.

६३. ज्या कोणतेही मनुष्यास कोणताहि चिकटणारा स्टांप बारावे कलमाअन्वयें रद्द करणें अवश्य असेल व जो त्या कलमांत सांगितलेले रीतीनें तो स्टांप रद्द करण्यास चुकेल तो पराकाष्ठा शंभर रुपयेपर्यंत दंड होण्यास पात्र होईल.

६४. जो कोणताही मनुष्य सरकाराशीं कपट करण्याचे इरादानें,--

२७ वे कलमांतील ठरावांप्रमाणें करण्याचें वर्जिलें असतां दंड.

(अ) सत्ताविसावे कलमाअन्वयें ज्या गोष्टी व हकीकती कोणतेही दस्तऐवजांत लिहिणें जरूर असतील त्या त्या दस्तऐवजांत संपूर्ण व खरे रीतीनें लिहिलेल्या नसून तो दस्तऐवज करून देईल, अथवा

(ब) ज्या कोणतेही मनुष्यास कोणताही दस्तऐवज तयार करण्यास किंवा तयार करण्याबाबद लावला असेल किंवा ज्याचा तयार करण्यांत संबंध असेल व जो सदर्हू प्रकारच्या सर्व गोष्टी व हकीकती त्यांत पूर्णपणें व खरे रीतीनें लिहिण्याची हयगय करील किंवा वर्जील, अथवा

(क) या आक्टाखालील कोणतीही ड्यूटी अगर दंड सरकारास न मिळण्यासारखें दुसरें कोणतेंही कृत्य करील,

तो पराकाष्ठा पांच हजार रुपयेपर्यंत दंड होण्यास पात्र होईल.

६५. ज्या कोणतेही मनुष्याजवळ,

पावती देण्यास नाहीं म्हटल्याबद्दल व पावत्यांबद्दलची ड्यूटी टाळण्याची युक्ति केल्याबद्दल दंड.

(अ) तिसावे कलमाअन्वयें पावती मागितली असतां तो ती देण्यास नाहीं ह्मणेल किंवा हयगय करील, अथवा

(ब) ज्यास वीस रुपयांहून अधिक रुपयांचे रकमेचा किंवा किंमतीचा पैका किंवा माल दिला असतां तो सरकारची कोणतीही ड्यूटी बुडविण्याचे इरादानें वीस रुपयांहून अधिक नाहीं असे रकमेची किंवा किंमतीची पावती देईल किंवा दिलेला पैका किंवा माल वेगळा वेगळा करील किंवा त्याचे विभाग करील,

तो पराकाष्ठा शंभर रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

६६. जो जो मनुष्य—

(अ) विम्याचे कराराबद्दल कोणतीही सलामती किंवा ऐवज पोंहचेल किंवा जो सलामती किंवा ऐवज ( खात्यांत ) जमा करील व जो सदर्हू प्रकारची सलामती किंवा ऐवज पोंहचल्यापासून किंवा जमा केल्यापासून एका महिन्याचे आंत सदर्हू विम्याची पालिसी ( खत ) योग्य रीतीनें स्टांप मारून करणार नाहीं व सही करून देणार नाहीं तो, अथवा

पालिसी न करण्याबद्दल दंड.

(ब) ज्या कोणतेही पालिसीवर ( विम्याचे खतावर ) योग्य रीतीनें स्टांप मारलेला नाहीं अशी पालिसी करील किंवा करून देईल किंवा देईल अथवा सदर्हू प्रकारचे कोणतेही पालिसीवर किंवा त्या पालिसीबाबद कोणताही पैका देईल किंवा हिशोबांत मजुरा देईल किंवा पैका देण्याचें किंवा हिशोबांत मजुरा देण्याचें कबूल करील तो,

किंवा जी कोणतीही पालिसी योग्य रीतीनें स्टांप मारलेली नसेल ती करणें वगैरेबद्दल.

पराकाष्ठा दोनशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

६७. दोन किंवा अधिक प्रती मिळून एक सेट होतो असे मजकुराचें बिल आफ् एक्श्चेंज किंवा मरीन इन्शुरन्सची पालिसी (समुद्राचे विम्याची पालिसी) जो

ज्या बिलांचे किंवा मरीन पालिसींचे सेट म्हणून असतील

त्या बिलांच्या किंवा मरीन पालिसींच्या संपूर्ण प्रती न लिहिल्याबद्दल दंड.

कोणताही मनुष्य लिहील किंवा करून देईल आणि त्या बिलाचे किंवा पालिसीचे मजकुरावरून सेटांत जितक्या प्रती असाव्या तितक्या सर्व बिलाच्या किंवा पालिसीच्या प्रती त्याच वेळीं योग्य रीतीनें स्टांप मारलेले कागदावर न लिहील किंवा करून न देईल तो मनुष्य पराकाष्ठा एक हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र होईल.

बिलावर पुढली तारीख घालणें वगैरेबदल दंड.

६८. (अ) जो कोणी सरकारची ड्यूटी बुडविण्याचे इराद्यानें खालीं लिहिलेले प्रकारचें कोणतेंही बिल आफ् एक्श्चेंज किंवा प्रामिसरी नोट लिहील किंवा करील किंवा देईल ह्मणजे तें बिल किंवा नोट ज्या तारखेस वास्तविक लिहिली असेल किंवा केली असेल त्या तारिखेचे पुढली तारिख घातलेलें लिहील किंवा करील किंवा देईल तो, आणि

(ब) सदहू प्रकारचे ज्या बिलावर किंवा नोटीवर सदहू प्रमाणें पुढली तारीख घातलेली आहे असें माहीत असून तिचे पाठीवर शेरा लिहील किंवा ती दुसऱ्याचे नांवावर करील किंवा सकारण्यासाठीं किंवा पैका मिळण्यासाठीं दाखवील किंवा सकारील किंवा तिचा ऐवज देईल किंवा घेईल किंवा कोणतेही रीतीनें बेचन करील तो, आणि

महसूल बुडण्याची इतर युक्ति केल्याबद्दल.

(क) ज्या कोणतेंही कृत्याविषयीं किंवा योजनेविषयीं किंवा युक्तीविषयीं या आक्टांत किंवा ज्या वेळीं जो कायदा अमलांत असेल त्यांत मुद्दाम ठराव केलेला नसेल तसें कोणतेंही कृत्य किंवा योजना किंवा युक्ति तसेंच इराद्यानें करील किंवा त्यांत संबंध ठेवील तो,

पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

स्टांपाचे विकरीसंबंधी कानू तोडल्याबद्दल व हुकुमावांचून विकरी केल्याबदल शिक्षा.

६९. (अ) स्टांप विकण्यासाठीं नेमलेला जो कोणताही मनुष्य चवऱ्याहत्तरावे कलमाअन्वयें केलेली कोणतीही कानू अमान्य करील तो, आणि

(ब) सदहूप्रमाणें नेमलेला नाहीं असा जो कोणी मनुष्य कोणताही स्टांप (एक आण्याचा चिकटणारा स्टांप खेरीज करून) विकील किंवा विकण्यास काढील तो,

पराकाष्ठा सहा महिनेपर्यंत कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंड किंवा या दोन्ही शिक्षा होण्यास पात्र होईल.

फिर्याद करणें व चालविणें.

७०. (१) या आक्टाअन्वयें किंवा यावरून रद्द केलेले कोणतेंही आक्टाअन्वयें शिक्षेस पात्र असणारे कोणतेंही अपराधाबदल फिर्याद करणें ती कलेक्टराचे किंवा याबाबत स्थानिक सरकार ज्या इतर अमलदारास सामान्य रीतीनें अधिकार देईल किंवा कलेक्टर विशेष रीतीनें अधिकार देईल त्या इतर अमलदाराचे मंजुरीवांचून करूं नये.

(२) निर्बंध ठेवणारे मुख्य रेव्हेन्यु अधिकाऱ्यास किंवा याबाबद त्याणें ज्या इतर अमलदारास अधिकार दिला असेल त्यास सदहू प्रकारचा चालविलेला कोणताही खटला तहकूब ठेवण्याचा किंवा सदहू प्रकारचे कोणतेही अपराधाची तोडजोड करण्याचा अधिकार आहे.

माजिस्ट्रेटांची हुकुमत.

७१. प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटाखेरीज आणि ज्या माजिस्ट्रेटाचे अधिकार दुसरे वर्गाचे माजिस्ट्रेटाचे अधिकाराहून कमी नसतील त्या माजिस्ट्रेटाखेरीज इतर कोणतेंही माजिस्ट्रेटानें या आक्टाअन्वयें कोणतेंही अपराधाचा इनुसाफ करूं नये.

इनुसाफाची जागा.

७२. कोणतेंही दस्तऐवजाबाबद केलेले सदहू प्रकारचे प्रत्येक अपराधाचा इनुसाफ करणें तो, तो दस्तऐवज ज्या कोणतेंही डिस्ट्रिक्टांत किंवा इलाक्याचे ज्या मुख्य शहरांत सांपडला असेल त्या डिस्ट्रिक्टांत किंवा इलाक्याचे त्या मुख्य शहरांत आणि त्याचप्रमाणें फौजदारी काम चालविण्याचे रीतीसंबंधी कायदा ज्या वेळीं जो अमलांत असेल त्या कायद्याअन्वयें सदहू प्रकारचे अपराधाचा इनुसाफ ज्या कोणतेंही डिस्ट्रिक्टांत किंवा इलाक्याचे ज्या मुख्य शहरांत करण्याचा अधिकार असेल त्या डिस्ट्रिक्टांत किंवा इलाक्याचे मुख्य शहरांत इनुसाफ करावा.

[ ]

## बाब ८.

### पुरवणीचे ठराव.

७३. ज्यांच्या पाहणीमुळें कोणतीहि ड्यूटी मिळण्यासारखी असेल, अगर कोणतेही ड्यूटीसंबंधानें कपट किंवा वर्जन शाबित होण्यासारखें असेल किंवा उघडकीस येण्यासारखें असेल अशीं कोणतींही रजिस्टरें, बुकें, दफ्तरें, कागद, दस्तऐवज, किंवा चालविलेले कामांचे कागदपत्र, हीं ज्याच्या हवालीं असतील त्या प्रत्येक सरकारी अमलदारानें, कलेक्टरानें याबाबद अखत्यार दिलेले कोणतेही मनुष्यास, तीं रजिस्टरें, बुकें, कागद, दस्तऐवज, व चालविलेले कामाचे कागदपत्र हीं पाहण्यास आणि त्यास जरूर वाटतील अशीं टांचणें व उतारे घेण्यास, फी किंवा खर्च घेतल्यावांचून, परवानगी दिली पाहिजे. बुकें वगैरे पाहणीसाठीं खुलीं असणें.

७४. स्थानिक सरकारास, गवर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे निर्बंधांस पात्र राहून, खालीं दिलेले गोष्टींचें नियमन करण्यासाठीं कानू करण्याचा अधिकार आहे :— स्टांपाचे विक्रीसंबंधीं कानू करण्याचा अधिकार.

(अ) स्टांप व स्टांपाचे कागद पुरविणें व विकणें,

(ब) सदहू विक्री फक्त ज्या मनुष्यांनीं करावयाची तीं मनुष्यें, आणि

(क) सदहू मनुष्यांचीं कामें व मेहनताना:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, एक आण्याचे चिकटणारे स्टांपांची विक्री सदहू कानूवरून संकुचित करतां कामा नये.

७५. या आक्टाचे हेतू साधारणतः अमलांत आणण्यासाठीं कानू करण्याचा व अशा कानूंमध्यें त्या मोडल्याबद्दल कोणते दंड द्यावे लागतील हेंही ठरविण्याचा अधिकार गवर्नर जनरल इन् कौन्सिल यांस आहे. हा आक्ट साधारणतः अमलांत आणण्यासाठीं कानू करण्याचा अधिकार.

७६. (१) ७४ वे कलमाअन्वयें केलेल्या कानूंखेरीज या आक्टाअन्वयें केलेल्या इतर सर्व कानू इंडिया ग्याझटांत प्रसिद्ध केल्या पाहिजेत, आणि ७४ वे कलमाअन्वयें केलेल्या सर्व कानू स्थानिक ग्याझेटांत प्रसिद्ध केल्या पाहिजेत. कानू प्रसिद्ध करणें.

(२) या कलमांत फर्माविल्याप्रमाणें प्रसिद्ध करावयाच्या सर्व कानू, त्या सदहूप्रमाणें प्रसिद्ध झाल्यावर, या आक्टांत ठरविल्या असल्याप्रमाणें चालतील.

७७. कोर्ट-फीसंबंधीं त्या त्या वेळीं जो कोणताही कायदा अमलांत असेल त्याअन्वयें पडणाऱ्या ड्यूटीस, या आक्टांतील कोणतेही ठरावावरून बाध येतो असें समजूं नये. कोर्ट फींचा बचाव.

७८. प्रत्येक स्थानिक सरकारानें आपल्या वहिवाटींतील मुलुखांच्या मुख्य देशभाषांमध्यें या आक्टाचीं भाषांतरें, दर प्रतीस चार आण्यांहून अधिक नाहीं असे किंमतीनें विकण्याबद्दल तजवीज केली पाहिजे. आक्टाचें भाषांतर करणें व स्वस्त विकणें.

७९. दुसऱ्या परिशिष्टांत सांगितलेले आक्ट, त्याच्या चवथ्या कोष्टकांत निर्दिष्ट केलें आहे तेथवर, रद्द केले आहेत. रद्द करणें.

---

[ ]

## परिशिष्ट १ लें.

### दस्तऐवजांवरची स्टांप ड्यूटी.

( कलम ३ पहा. )

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| १. **वीस रुपयांहून अधिक रकमेच्या किंवा किंमतीच्या कर्जाची पावती** त्या कर्जाचे पुराव्यासाठीं ( व्यांकराचे ( सराफाचे ) पासबुकाखेरीज इतर ) कोणतेही बुकांत किंवा निराळे कागदावर रिणकोनें किंवा रिणकोचे तर्फें लिहिलेली किंवा सही केलेली असेल ती, जेव्हां तें बुक किंवा कागद धनकोंचे कबज्यांत ठेवला असेल तेव्हां. | |
| (अ) कोणत्याही साक्षीदारानें तिजवर साक्ष घातली नसेल तर .. | एक आणा |
| (ब) कोणत्याही साक्षीदारानें तिजवर साक्ष घातली असेल तर ... | अशा रकमेबद्दल अगर किंमतीबद्दल बांडावर ( नं. १९ ) जी ड्यूटी पडते तेवढीच. |
| २. **आड्मिनिस्ट्रेशन बांड** ( मालमिळकतीची वहिवाट करण्याविषयींचें खत ): यांत, सन १८६९ चा हिंदुस्थानचा वारसावाबदचा आक्ट, कलम २९६, याअन्वयें, सन १८७३ चा सरकारी सेविंगस् व्यांकांसंबंधी आक्ट, कलम ६, याअन्वयें, सन १८८१ चा वारसावाबद व वहिवाटीवाबद आक्ट, कलम ७८, याअन्वयें, अगर सन १८८९ चा वारसावाबद सर्टिफिकेट आक्ट, कलम ९ किंवा १० याअन्वयें दिलेल्या बांडाचा समावेश होतो ; | |
| (अ) बांडाची रकम रु० १,००० यांहून अधिक नसेल तेव्हां .. ... | अशा रकमेवर बांडाप्रमाणें ( नं. १५ ) ड्यूटी पडते ती. |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं .. ... ... ... ... | पांच रुपये. |
| ३. **अडापशन डीड** ( दत्तकपत्र ), ह्मणजे दत्तविधान नोंदणारा अगर दत्तक घेण्याचा अधिकार देणारा किंवा देण्याचा आशय आणणारा कोणताही (मृत्युपत्र खेरीज करून इतर) दस्तऐवज. | दहा रुपये. |
| **आडवोकेट.** आडवोकेट ह्मणून नोंद आहे ती पहा ( नं ३० ). | |
| ४. **आफिडेविट** ( शपथपूर्वक किंवा प्रतिज्ञापूर्वक लेख ), यांत शपथ घेण्याऐवजीं, कायद्याअन्वयें प्रतिज्ञा अगर इकरार करण्याचा अधिकार असलेल्या मनुष्यानें केलेल्या प्रतिज्ञेचा अगर इकराराचा समावेश होतो. | एक रुपया. |
| **माफी.** | |
| आफिडेविट किंवा इकरार खालीं लिहिलेल्या कारणांसाठीं, ह्मणजे— | |
| (अ) १८६९ चे हिंदुस्थानचे लष्करी आइनांअन्वयें पटांत नांव दाखल होण्याची शर्त ह्मणून केला असेल तेव्हां; | |
| (ब) कोणतेही कोर्टांत किंवा कोणतेही कोर्टाचे अमलदारापुढें फैल करण्याचेच किंवा उपयोग करण्याचेच प्रत्यक्ष कारणासाठीं केला असेल तेव्हां; अगर | |
| (क) कोणतेंही पेनशन किंवा धर्मादाय नेमणूक कोणतेही मनुष्यांस केवळ घेतां येण्याचेच कारणासाठीं केला असेल तेव्हां. | |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| ५. **करार किंवा कराराची यादी**— | |
| (अ) कोणतेही सरकारी सिक्यूरिटीचे, किंवा कोणतेही संस्थापित कंपन्यांतील किंवा इतर एकव्यक्तिभूत मंडळींतील शेराचे, किंवा बिल आफ् एक्स्चेंजाचे विक्रीसंबंधी असेल तर. | एक आणा. |
| (ब) त्याविषयीं इतर रीतीचा ठराव केला नसेल तर ... ... .. | आठ आणे. |
| **माफी.** | |
| करार किंवा कराराची यादी— | |
| (अ) माल किंवा व्यापाराचा जिन्नस यांच्या फक्त विकरीच्याच बाबद किंवा संबंधी असेल, व ती ४३ वे नंबराअन्वयें चार्ज होण्यास पात्र असणारें टांचग किंवा यादी नसेल अशी; | |
| (ब) कोणतेही लोनासाठीं किंवा लोनासंबंधी हिंदुस्थान सरकारास टेंडरच्या नमुन्याप्रमाणें केली असेल अशी; | |
| (क) सन १८७४ च्या युरोपियन वेग्रन्सी आक्टाच्या १७ वे कलमाअन्वयें केलेली. | |
| **लीस करण्याविषयींची कबुलायत.** लीस पहा ( नं. ३९ ). | |
| ६. **गहाणाबाबद करार**, यांत रास्त गहाणखताचा, अगर खतेंपत्रें किंवा इतर किमतदार दस्तऐवज अनामत घेऊन किंवा जंगम माल ठेवून घेऊन कर्जाऊ पैका दिला असेल तो परत मिळण्याचें निश्चित करण्यासाठीं केलेला कोणताही करार दर्शविणाऱ्या कोणत्याही दस्तऐवजाचा समावेश होतो,— | |
| रु० १,००० याहून जास्त नाहीं अशा निश्चित केलेल्या प्रत्येक रकमेवर ... | एक रुपया. |
| आणि रु० १,००० याहून अधिक निश्चित केलेल्या दर १,००० रुपयांवर अगर त्यांच्या भागावर. | एक रुपया. |
| **माफी.** | |
| गहाणखताच्या सदरांत दिलेल्या माफी पहा ( नंबर ४० ). | |
| ७. **अधिकार चालवून केलेलें अपायन्टमेन्ट**, तें मग ट्रस्टीचें असो, अगर स्थावर किंवा जंगम मालमिळकतीचें असो, तें मृत्युपत्र नाहीं अशा कोणत्याही लेखानें केलें असेल तेव्हां. | पंधरा रुपये. |
| ८. **मुकदमा** चालत असतां कोर्टाचे हुकुमावरून केल्याखेरीज इतर रीतीनें केलेला किमतीचे आकारणीचा दस्तऐवज; | |
| (अ) रु० १,००० याहून अधिक रकम नसेल तेव्हां ... ... | अशा रकमेच्या बांडास (नं. १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं... ... ... ... ... | पांच रुपये. |
| **माफी.** | |
| (अ) किमतीचे आकारणीचा दस्तऐवज जो एकाच पक्षकाराचे मात्र माहितीसाठीं केला असेल व करारामुळें किंवा कायद्याचे अमलामुळें पक्षकारांस त्याप्रमाणें चालणें कोणत्याही रीतीनें अवश्य नसेल. | |

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
| --- | --- |
| (ब) भाडें ह्मणून, जमीनदारास द्यावयाची रकम ठरविण्यासाठीं पिकाच्या किंमतीच्या आकारणीचा दस्तऐवज. | |
| ९. आप्रेंटिसशिप् डीड (शिकण्यासाठीं राहण्याचे कराराबद्दलचें खत), यांत, कोणताही आप्रेंटीस (शिकण्यासाठीं राहाणारा) किंवा क्लार्क किंवा नोकर यास कोणताही पेशा, धंदा किंवा काम शिकण्यासाठीं कोणत्याही धन्याजवळ ठेवला असेल त्याचे चाकरीसंबंधाचा किंवा शिकविण्याचे संबंधाचा, आर्टिकल्स आफ् क्लार्कशिप् (नंबर ११) नाहीं असा, प्रत्येक लेख, याचा समावेश होतो. | पांच रुपये. |
| **माफी.** | |
| आप्रेंटिसशिप्चे दस्तऐवज, जे, सन १८५० च्या आप्रेंटीस् आक्टाअन्वयें माजिस्ट्रेटानें करून दिले असतील, किंवा ज्यांवरून कोणी मनुष्य कोणतेही सार्वजनिक दानधर्माच्या पैशाच्या खर्चानें आप्रेंटिस होत असेल ते दस्तऐवज. | |
| १०. कोणत्याही कंपनीचे आर्टिकल्स् आफ् असोशियशन ... ... | पंचवीस रुपये. |
| **माफी.** | |
| नफ्याकरितां न स्थापलेल्या व सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयींचा आक्ट, कलम २६, याअन्वयें नोंदलेल्या कोणत्याही असोशिएशनाचे आर्टिकल्स कोणत्याहि कंपनीचें मेमोरंडम आफ् असोशिएशन (नं. ३९) हेंही पहा. | |
| ११. आर्टिकल्स आफ् क्लार्कशिप्, किंवा करारनामा, ज्यावरून कोणी मनुष्य कोणत्याही हैकोर्टांत अटर्नी ह्मणून मंजूर होण्यासाठीं क्लार्काचें काम करीन ह्मणून आपण प्रथम बद्ध होतो. | दोनशें पन्नास रुपये. |
| **असैनमेंट.** प्रसंगाप्रमाणें कन्वेयन्स (दुसऱ्यास सोंपून देण्याचा लेख) (नंबर २३), ट्रान्सफर (दुसऱ्यास तबदील करून देण्याचा लेख) (नंबर ६२), व ट्रान्सफर आफ् लीस (नंबर ६३) पहा. | |
| **अटर्नी.** अटर्नी (नंबर ३०) व अटर्नीचा अधिकार (नंबर ४८) या सदरांखालीं पहा. | |
| **दत्तक घेण्याविषयींचें अधिकारपत्र.** (नंबर ३) पहा. | |
| १२. आवार्ड, ह्मणजे, मुकदमा चालत असतां कोर्टाचे हुकुमानें रेफरन्स होतो तसा रेफरन्स न होतां इतर रीतीनें रेफरन्स झाला असतां पंचानें किंवा सरपंचानें केलेला लेखी फैसला— | |
| (अ) ज्या मालमिळकतीसंबंधीं आवार्ड असेल त्या मालमिळकतीची जो रकम किंवा किंमत त्या आवार्डांत लिहिली असेल ती १,००० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां. | तितक्या रकमेच्या बांडास (नंबर १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... ... | पांच रुपये. |
| **माफी.** | |
| सन १८७३ च्या मुंबईच्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टाच्या ८१ व्या कलमाअन्वयें, किंवा सन १८७४ च्या मुंबईच्या वंशपरंपरेच्या हुद्यांविषयींच्या आक्टाच्या १८ व्या कलमाअन्वयेंचा आवार्ड. | |

## परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| १३. बांड किंवा व्यांकनोट किंवा करन्सीनोट नाहीं असें बिल आफ् एक्श्चेंज [ कलम २, (२) व (३) यांत व्याख्या केल्याप्रमाणें ]— | |
| (अ) मागितला ह्मणजे ऐवज द्यावयाचा असेल तेव्हां ... ... | एक आणा. |
| (ब) मागितल्याखेरीज इतर रीतीनें ऐवज द्यावयाचा असेल, परंतु तारिखेनंतर किंवा दाखविल्यानंतर एका वर्षाहून अधिक नाहीं असे मुदतीनें ऐवज द्यावयाचा असेल तेव्हां— | |

| | एकच प्रत लिहिली असेल तर. | | | दोहोंचा सेट लिहिला असेल तर त्या सेटाचे प्रत्येक प्रतीस. | | | तिहींचा सेट लिहिला असेल तर त्या सेटाचे प्रत्येक प्रतीस. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. |
| बिलाची किंवा नोटीची रकम २०० रुपयांहून अधिक नसेल तर. | ० | २ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० |
| २०० रुपयांहून अधिक असेल व ४०० रुपयांहून अधिक नसेल तर. | ० | ४ | ० | ० | २ | ० | ० | २ | ० |
| ४०० ,, ६०० ... | ० | ६ | ० | ० | ३ | ० | ० | २ | ० |
| ६०० ,, १,००० ... | ० | १० | ० | ० | ५ | ० | ० | ४ | ० |
| १,००० ,, १,२०० ... | ० | १२ | ० | ० | ६ | ० | ० | ४ | ० |
| १,२०० ,, १,६०० ... | १ | ० | ० | ० | ८ | ० | ० | ६ | ० |
| १,६०० ,, २,५०० ... | १ | ८ | ० | ० | १२ | ० | ० | ८ | ० |
| २,५०० ,, ५,००० ... | ३ | ० | ० | १ | ८ | ० | १ | ० | ० |
| ५,००० ,, ७,५०० ... | ४ | ८ | ० | २ | ४ | ० | १ | ८ | ० |
| ७,५०० ,, १०,००० ... | ६ | ० | ० | ३ | ० | ० | २ | ० | ० |
| १०,००० ,, १५,००० ... | ९ | ० | ० | ४ | ८ | ० | ३ | ० | ० |
| १५,००० ,, २०,००० ... | १२ | ० | ० | ६ | ० | ० | ४ | ० | ० |
| २०,००० ,, २५,००० ... | १५ | ० | ० | ७ | ८ | ० | ५ | ० | ० |
| २५,००० ,, ३०,००० ... | १८ | ० | ० | ९ | ० | ७ | ६ | ० | ० |
| आणि ३०,००० रुपयांवरील प्रत्येक १०,००० रुपयांस किंवा १०,००० रुपयांच्या कोणत्याही भागास. | ६ | ० | ० | ३ | ० | ० | २ | ० | ० |

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| (क) तारिखेनंतर किंवा दाखविल्यानंतर एका वर्षाहून अधिक मुदतीनें ऐवज द्यावयाचा असेल तेव्हां. | त्या रकमेबद्दल बांडास (नं. १५) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| १४. **बिल आफ् लेडिंग** ( यांत पुऱ्या बिल आफ् लेडिंगचा समावेश होतो) ... | चार आणे. |
| टीप.—बिल आफ् लेडिंग जर भागाभागांनीं लिहिलें असेल तर त्याबद्दलचा योग्य स्टांप सेटांतील प्रत्येक भागावर असला पाहिजे. | |
| **माफी.** | |
| (अ) बिल आफ् लेडिंग: जेव्हां त्यांत लिहिलेला माल, सन १८८९ चा हिंदुस्थानचा बंदरांबाबदचा आक्ट आहे त्यांत बंदराची व्याख्या लिहिली आहे तशा कोणत्याही बंदराचे हद्दींतील कोणतेही जागीं पोहोंचला असेल व त्याच बंदराचे हद्दींतील कोणतेही इतर जागीं तो द्यावयाचा असेल तेव्हां. | |
| (ब) बिल आफ् लेडिंग: जेव्हां तें ब्रिटिश इंडियाचे बाहेर केलें असेल व ब्रिटिश इंडियांत स्वाधीन करावयाचे मालासंबंधी असेल तेव्हां. | |
| १५. बांड—[ कलम २ (५) यांत व्याख्या केल्याप्रकारच्या ] डिबेंचर ( नंबर २७ ) नव्हे असा, व ज्याविषयीं या आक्टांत किंवा सन १८७०च्या कोर्टाच्या फीच्या आक्टांत इतर रीतीनें ठराव केला नसेल असा— | |
| निश्चित केलेली रकम १० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां... ... ... | दोण आणे. |
| ती रकम १० रुपयांहून अधिक असून ५० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां ... | चार आणे. |
| किता ५० किता १०० किता | आठ आणे. |
| " १०० " २०० " | एक रुपया. |
| " २०० " ३०० " | एक रुपया आठ आणे. |
| " ३०० " ४०० " | दोन रुपये. |
| " ४०० " ५०० " | दोन रुपये आठ आणे. |
| " ५०० " ६०० " | तीन रुपये. |
| " ६०० " ७०० " | तीन रुपये आठ आणे. |
| " ७०० " ८०० " | चार रुपये. |
| " ८०० " ९०० " | चार रुपये आठ आणे. |
| " ९०० " १००० " | पांच रुपये. |
| आणि १००० रुपयांवरील प्रत्येक ५०० रुपयांबद्दल किंवा ५०० रुपयांचे भागाबद्दल. | दोन रुपये आठ आणे. |
| आडमिनिस्ट्रेशन बांड (नं. २), बाटमरी बांड (नंबर १६ ), कस्टम्स बांड (नं. २६ ), इंडेमनिटी बांड (नं. ३४ ), रिस्पांडेन्शिया बांड (नं. ५६ ), जामीन कतबा ( नं. ५७ ) पाहा. | |
| **नं. १५ च्या माफी.** | |
| बांड खालीं लिहिलेले मनुष्यानें किंवा मनुष्यांनीं करून दिला असेल तेव्हां— | |

36

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| (अ) सन १८७६ च्या बंगालच्या इरिगेशनाबाबदच्या आक्टाचे ९९ वे कलमाअन्वयें केलेल्या कानूअन्वयें नेमलेल्या मुख्यांनीं, त्या आक्टा-अन्वयें आपलीं कर्तव्यकर्में योग्य रीतीनें करण्यासाठीं. | |
| (ब) धर्मार्थ दवाखाना किंवा हास्पिटल किंवा लोकोपयोगी इतर कोणतेंही काम याबद्दलच्या खानगी वर्गणीचें स्थानिक उत्पन्न दरमहा निर्दिष्ट केलेल्या रकमेपेक्षां कमी होणार नाहीं अशी जामीनकी देण्यासाठीं कोणत्याही मनुष्यानें. | |
| १६. **बाटमूरी बांड** ह्मणजे समुद्रांत जाणारे तारवाचा मास्तर तारवाचा आपणास सांभाळ करतां यावा किंवा तें सफरीवर नेतां यावें ह्मणून तारवाचे तारणावर ज्या कोणत्याही दस्तऐवजावरून पैका कर्जी घेतो, तो दस्तऐवज. | तितक्याच रकमेबद्दल बांडास (नं. १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| १७. **रद्द करण्याचा दस्तऐवज,** (यांत ज्या दस्तऐवजाच्या योगानें पूर्वीं करून दिलेला कोणताही दस्तऐवज रद्द केला जातो त्या दस्तऐवजाचा समावेश होतो) त्यावर साक्ष घातली असेल व त्याविषयीं इतर रीतीनें ठराव केला नसेल तर ... | पांच रुपये. |
| फारिखत (नं. ९९); सेटलमेंट रद्द करण्याचा दस्तऐवज (नं. ९८); सोडून देण्याचा लेख नं. (६१); ट्रस्ट रद्द करण्याचा लेख (नं. ६४), हींही पाहा. | |
| १८. **विकरीचें सर्टिफिकेट** दिवाणी किंवा रेव्हेन्यू कोर्टानें किंवा कलेक्टरानें किंवा इतर रेव्हेन्यू आफिसरानें जाहीर लिलांव करून विकलेले कोणतेही मालमिळकतीचे खरीददारास दिलेलें— | |
| (अ) विकलेल्या मालमिळकतीची किंमत १० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां. | दोन आणे. |
| (ब) विकलेल्या मालमिळकतीची किंमत १० रुपयांहून अधिक असेल परंतु २९ रुपयांहून अधिक नसेल तेव्हां. ... ... ... | चार आणे. |
| (क) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... ... | खरेदीच्या पैक्याचे रकमेइतक्याच ऐवजाबद्दलचे कन्वेयन्सास (नं. २१) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| १९. **सर्टिफिकेट किंवा इतर दस्तऐवज,** जो त्याचें धारण करणाराचा किंवा कोणत्याही इतर मनुष्याचा कोणत्याही संस्थापित कंपनींतील किंवा कोणत्याही संस्थापित कंपनीचे किंवा दुसऱ्या एकव्यक्तिभूत मंडळीचे शेराविषयीं किंवा स्क्रिपाविषयीं (भांडवलाच्या भागाचे दाखल्यांविषयीं) किंवा स्टाकाविषयीं (भांडवलाविषयीं) हक्क आहे असें दर्शविणारा असेल, अथवा सदई प्रकारच्या कंपनींतील अगर मंडळींतील किंवा तशा कंपनीचे किंवा मंडळीचे शेरांचा किंवा स्क्रिपाचा किंवा स्टाकाचा मालक होण्याचा हक्क आहे असें दर्शविणारा असेल तो. | एक आणा. |
| लेटर आफ् अलाटमेंटही (नं. ३६) पहा. | |
| २०. **चार्टरपार्टी,** ह्मणजे, तारूं किंवा तारवाचा कोणताही निर्दिष्ट केलेला मुख्य भाग, नोरी करणाराचे निर्दिष्ट केलेले कारणांसाठीं ज्या दस्तऐवजावरून नोरी दिला असेल तसा कोणताहि दस्तऐवज (टगस्टीमरचे (पागड बांधणारी आगबोट) भाड्याविषयींचा करारनामा खेरीज करून), मग त्यांत गुन्हेगारीबदल एकादी रकम घातलेली असो किंवा नसो. | एक रुपया. |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| २१. **चेक** [ कलम २ (७) यांत व्याख्या केल्या प्रकारचा ] ... ... ... | एक आणा. |
| २२. **तोडजोडीचें खत** ह्मणजे ज्या दस्तऐवजावरून रिणको आपली मालमिळकत आपल्या धनकोच्या फायद्याकरितां कन्वे करून देतो अथवा ज्या दस्तऐवजावरून धनकोचे कर्जाचे तोडजोडीचा ऐवज किंवा वेंहचणी त्यांस मिळण्याचें निश्चित करण्यांत येतें अथवा रिणकोचें काम इन्स्पेक्टराचे देखरेखीखालीं किंवा लेटर्स आफ् लैसेन्साअन्वयें त्याचे धनकोच्या फायद्याकरितां चालविण्याविषयीं ज्या दस्तऐवजावरून ठरविलेलें असतें तसा रिणकोनें करून दिलेला दस्तऐवज ... | दहा रुपये. |
| २३. **कन्वेयन्स** [ कलम २ (१०) यांत व्याख्या केल्याप्रकारचा ], जो ६० नंबरांत सांगितल्याप्रमाणें चार्ज केलेला किंवा माफ केलेला ट्रान्सफर ( दुसऱ्याचे नांवावर करण्याचा दस्तऐवज ) नसेल— | |
| अशा कन्वेयन्साचे ऐवजाची जी रकम अगर किंमत त्यांत लिहिली असेल ती ५० रुपयांहून अधिक नसेल तर ... ... ... ... ... | आठ आणे. |
| ५० रुपयांहून अधिक असून १०० रुपयांहून अधिक नसेल तर ... | एक रुपया. |
| १०० " २०० " ... | दोन रुपये. |
| २०० " ३०० " ... | तीन रुपये. |
| ३०० " ४०० " ... | चार रुपये. |
| ४०० " ५०० " ... | पांच रुपये. |
| ५०० " ६०० " ... | साहा रुपये. |
| ६०० " ७०० " ... | सात रुपये. |
| ७०० " ८०० " ... | आठ रुपये. |
| ८०० " ९०० " ... | नऊ रुपये. |
| ९०० " १००० " .. | दहा रुपये. |
| व १००० रुपयांवरील प्रत्येक ५०० रुपयांबद्दल किंवा ५०० रुपयांचे कोणतेही भागाबद्दल. | पांच रुपये. |
| **माफी.** | |
| सन १८४७ चे हिंदुस्थानचे कापीरैट आक्टाचे ५ व्या कलमाअन्वयें मजकूर दाखल करून ग्रंथस्वामित्व दुसऱ्यास सोंपून देण्याचा लेख. | |
| **सरकतीचा दस्तऐवज. नं. ४६ पाहा.** | |
| २४. **नकल किंवा उतारा—** | |
| (अ) जो खरी नकल किंवा उतारा आहे ह्मणून सरकारी नोकरानें किंवा सरकारी नोकराचे हुकुमावरून सही केलेला असेल व जो कोर्ट फी संबंधी विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें ड्यूटी चार्ज होण्यास पात्र नसेल तो— | |
| (१) असल दस्तऐवज ड्यूटी चार्ज होण्यास पात्र नव्हता तर किंवा जी ड्यूटी चार्ज होण्यास तो पात्र होता ती ड्यूटी एक रुपयाहून अधिक नसेल तर | आठ आणे. |
| (२) इतर कोणतेही प्रसंगीं ... ... ... ... ... | एक रुपया. |

## परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| (ब) जी पावती ज्या मनुष्यानें द्यावी असें कायद्यानें ठरविलें असेल त्या मनुष्यानें सही करून दिलेल्या किंवा साक्ष घातलेल्या पावतीची. ... | एक आणा. |
| **माफी.** | |
| (अ) कोणत्याही कागदाची नकल, जी कोणत्याही सरकारी कचेरींत दफ्तरांत ठेवण्यासाठीं किंवा कोणत्याही सरकारी कारणासाठीं कोणत्याही सरकारी अमलदारानें करणें किंवा देणें कायद्याअन्वयें मुद्दाम अवश्य असेल ती. | |
| (ब) खालीं दिलेल्या बाबतींत दाखल केलेल्या मजकुरांच्या नकला— | |
| (१) सन १८८६ चा जन्म, मृत्यु व लग्नें नोंदण्याबाबत आक्ट ह्याच्या ८ व्या कलमाअन्वयें रेजिस्टरांच्या दाखले-नकलांतील दिलेल्या; | |
| (२) सदहू आक्टाच्या २९ व्या कलमाअन्वयें जन्म व मृत्यु ह्यांच्या कोणत्याही रेजिस्ट्रारानें रजिस्टरबुकांतील दिलेल्या; किंवा | |
| (३) एखाद्या सोजरानें, सेलरानें, बिनसनदी किंवा किरकोळ अमलदारानें मागितल्यावरून रेजिस्टरांतील व कागदपत्रांतील सदहू आक्टाच्या ३९ व्या कलमाअन्वयें दिलेल्या. | |
| (क) सरकारी चाल्लेन, पैशाची मदत ज्यांस पोहोंचते अगर ज्यांस पोहोंचत नाहीं असे पाद्री, आणि डायोसेसन किंवा लग्नांचे रेजिस्ट्रार यांच्या दाखल्याच्या, सोजर, सेलर अगर बिनसनदी किंवा किरकोळ अमलदार यांस दिल्या जातील त्या बाप्तिस्म्यासंबंधी, विवाहसंबंधी अगर दफनसंबंधी रजिष्टरांच्या नकला अगर उतारे. | |
| २५. **जो दस्तऐवज ड्यूटी** चार्ज होण्यास पात्र असेल व ज्याबाबद योग्य ड्यूटी दिली असेल तशा दस्तऐवजाचा उलट लेख किंवा डुप्लिकेट (दुसरी प्रत)— | |
| (अ) असल दस्तऐवज जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल ती ड्यूटी एक रुपयाहून अधिक नसेल तर. | असल दस्तऐवजाबद्दल जितकी ड्यूटी द्यावयाची तितकी ड्यूटी. |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... ... | एक रुपया. |
| **माफी.** | |
| लागवड करणारांस दिलेल्या कोणत्याही लीसाचा उलट लेख. | |
| २६. **कस्टम्स बांड.** | |
| (अ) रु. १००० यांहून अधिक रकम नसेल तेव्हां .. ... ... | तेवढ्याच रकमेबद्दल बांडास (नं. १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... ... | पांच रुपये. |
| २७. **डिबेंचर,** (गहाणाबाबद असलेला किंवा नसलेला) डिलिबरी करून, किंवा शेरा लिहून, किंवा वेगळा ट्रान्सफराचा दस्तऐवज करून ट्रान्सफर होण्यास पात्र अशा बाजारांत विकण्यालायक सिक्यूरिटीदाखल असलेला. | तेवढ्याच रकमेबद्दल बांडास (नं. १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| खुलासा—डिबेंचर ह्या शब्दांत डिबेंचरास जोडलेल्या कोणत्याही व्याजाच्या कूपनांचा समावेश होतो. | |
| **माफी.** | |
| ज्याअन्वयें काढावयाच्या डिबेंचरांच्या पुऱ्या रकमेच्या संबंधानें ज्यावर योग्य रीतीनें स्टांप लावलेला असेल व ज्याच्या योगानें एकादी संस्थापित कंपनी अगर एकव्यक्तिभूत मंडळी डिबेंचर धारण करणारांच्या फायद्यासाठीं आपली मालमिळकत सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं ट्रस्टींच्या स्वाधीन करते अशा रेजिस्टर केलेल्या गहाणखताच्या मजकुराचा त्या कर्ज काढणाऱ्या कंपनीनें अगर दुसऱ्या एकव्यक्तिभूत मंडळीनें काढलेला डिबेंचरः मात्र इतकेंच कीं अशा प्रकारें काढलेले डिबेंचर सदरहू गहाणखताच्या मजकुराचे काढले आहेत असा उल्लेख केलेला असला पाहिजे. | |
| आणखी, बांड ( नं. १९ ), व कलम ८ पाहा. | |
| **कोणत्याही ट्रस्टाबाबद ठराव**—ट्रस्ट ( नं. ६४ ) पाहा. | |
| २८. **मालाबाबदची डिलिवरी आर्डर,** ह्मणजे, कोणत्याही गोदींत किंवा बंदरांत असणारा किंवा ज्या कोणत्याही वखारींत माल भाड्यानें भरून ठेवितात किंवा त्या वखारींत असणारा किंवा कोणत्याही धक्यावर असणारा कोणताही माल ज्या दस्तऐवजावरून स्वाधीन घेण्याचा हक्क त्या दस्तऐवजांत लिहिलेले मनुष्यास, किंवा त्याचे आसैनास किंवा तो दस्तऐवज धारण करणारास प्राप्त होत असेल व त्या दस्तऐवजावर सदरहू प्रकारचे मालावरील स्वामित्व विकल्यानंतर किंवा दुसऱ्याचे नांवावर केल्यानंतर त्या मालाचे मालकानें किंवा त्याचे तर्फे सही केलेली असेल तो दस्तऐवज, सदरहू प्रकारच्या मालाची किंमत वीस रुपयांहून अधिक असेल तेव्हां. | एक आणा. |
| **खतें पत्रें अनामत ठेवण्याचा लेख**—गाहाणाबाबद करार ( नं. ६ ), पाहा. | |
| **सरकत मोडण्याचा दस्तऐवज**—सरकत ( नं. ४६ ), पाहा. | |
| २९. **विवाहसंबंध तोडण्याचा दस्तऐवज,** ह्मणजे ज्या दस्तऐवजावरून कोणी मनुष्य आपला विवाहसंबंध तोडतो तो दस्तऐवज. | एक रुपया. |
| **स्त्रीधनाबाबद दस्तऐवज,** सेटलमेंट ( नं. ५८. ) पाहा. | |
| **डुप्लिकेट.** उलट लेख ( नं. २१ ), पाहा. | |
| ३०. **लेटर्सपेटंटावरून** ( सनदेवरून ) किंवा सन १८८४ चा लीगल प्राक्टिशनर्स आक्ट यावरून कोणत्याही हे कोर्टास दिलेले अधिकार त्या कोर्टानें चालवून त्या कोर्टाचे रोलांत ( पटांत ) आडवोकेट ह्मणून किंवा वकील ह्मणून किंवा अटर्नी ह्मणून नांव दाखल करण्याचा लेख— | एक रुपया. |
| (अ) आडवोकेटाचे किंवा वकिलाचे बाबतींत. | पांचशें रुपये. |
| (ब) अटर्नीचे बाबतींत ... ... ... ... ... | दोनशें पन्नास रुपये. |
| **माफी.** | |
| एकाद्या हे कोर्टांत एकाद्याचें नांव पूर्वी रोलांत दाखल केलें असून कोणत्याही हे कोर्टाचे रोलांत आडवोकेट ह्मणून किंवा वकील ह्मणून किंवा अटर्नी ह्मणून त्याचें नांव दाखल केल्याचा लेख. | |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| रास्त गहाणखत. गहाणाबाबद करार (नं. ६) पाहा. | |
| ३१. मालमिळकतीचे मोबदल्याविषयींचा दस्तऐवज. ... ... ... | त्या दस्तऐवजांत सर्वांत अधिक किंमतीची म्हणून जी मिळकत लिहिली असेल तिचे किंमतीइतक्या ऐवजाचे कन्वेयन्सास (नं. २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| उतारा. नकल (नंबर २४), पाहा. | |
| ३२. आणखी चार्ज बसविल्याविषयींचा दस्तऐवज, म्हणजे गहाण ठेवलेल्या मिळकतीवर आणखी चार्ज बसविल्याविषयींचा, म्हणजे, बसविणारा, कोणताही दस्तऐवज— | |
| (अ) असल, गहाणखत ४० व्या नंबराचे (अ) रकमेंत सांगितलेल्या प्रकारचें (म्हणजे कबजासह) असेल तेव्हां. | त्या दस्तऐवजांत निश्चित केलेल्या रकमेइतक्या ऐवजाच्या कन्वेयन्सास (नंबर २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) सदहू प्रकारचें गहाणखत ४० व्या नंबराच्या (ब) रकमेंत सांगितलेल्या प्रकारचें (म्हणजे कबजाशिवाय) असेल तेव्हां— | |
| (१) आणखी चार्ज बसविल्याविषयींचा दस्तऐवज करून देतेवेळीं मालमिळकतीचा कबजा त्या दस्तऐवजाअन्वयें दिला असेल किंवा देण्याचा करार केला असेल तेव्हां. | असल गहाणावर व आणखी चार्जावर आधींच दिलेली ड्यूटी वजा करून, चार्जाचे (असल गहाण व आणखी चार्ज धरून) एकंदर रकमेइतक्या ऐवजाचे कन्वेयन्सास (नं. २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (२) कबजा वर सांगितल्याप्रमाणें दिला नसेल तेव्हां ... ... | त्या दस्तऐवजांत निश्चित केलेल्या रकमेबद्दलचे बांडास (नं. १५) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| ३३. बक्षीसपत्र, सेटलमेंट, किंवा मृत्युपत्र, किंवा शेरांचें ट्रान्सफर नाहीं असें. ... | त्या दस्तऐवजांत मालमिळकतीची किंमत लिहिली असेल त्या किंमतीइतक्या ऐवजाचे कन्वेयन्सास (नंबर २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| ३४. इंडेम्निटी बांड (दुसऱ्यास निजोखमी ठेवण्याविषयीं लिहून दिलेलें खत) ... | तितक्याच रकमेबद्दल जामीन खतास (नं. ५७) जितकी ड्यूटी पडते तितकी. |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| **इन्स्पेक्टरशिप डीड** (इन्स्पेक्टरपणाचें खत). तोडजोडीचें खत (नं. २२), पाहा. | |
| **विमा.** विम्याची पालिसी (नं. ४७), पाहा. | |
| ३९. **लीस** (पट्टा). यांत अंडरलीसाचा किंवा पोट-लीसाचा व भाड्यानें किंवा पोट-भाड्यानें देण्याच्या कोणत्याही कराराचा समावेश होतो— | |
| (अ) त्या लीसावरून भाडें ठरविलें असेल व प्रीमियम दिलें नसेल तेव्हां— | |
| (१) तें लीस एका वर्षाहून कमी मुदतीचें असल्यास. ... ... | त्या लीसाअन्वयें जी रकम द्यावयाची त्या सगळ्या रकमेबद्दलचे धांडास (नं. १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (२) तें लीस एका वर्षाहून कमी मुदतीचें नसेल व तीन वर्षांपेक्षां अधिक मुदतीचें नसेल असें असल्यास. | जें अजमासें वार्षिक भाडें लिहिलें असेल त्या भाड्याचे रकमेबद्दलचे बांडास (नंबर १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (३) तें लीस तीन वर्षांहून अधिक मुदतीचें असल्यास. ... ... | जें अजमासें वार्षिक भाडें लिहिलें असेल त्या भाड्याच्या रकमेइतक्या किंवा किंमतीइतक्या ऐवजाबद्दलच्या कन्वेयन्सास (नंबर २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (४) तें लीस कोणत्याही नियमित मुदतीचें नसल्यास ... ... | दहा वर्षेंपर्यंत लीस चाललें तर पहिल्या दहा वर्षांबद्दल जें अजमासें वार्षिक भाडें देण्यांत येईल त्याच्या रकमेइतक्या किंवा किंमतीइतक्या ऐवजाबद्दलच्या कन्वेयन्सास (नंबर २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (५) तें लीस निरंतरचें असल्यास. ... ... ... ... | त्या लीसाच्या पहिल्या पन्नास वर्षांबद्दल जें भाडें देण्यांत येईल त्या भाड्याच्या एकंदर रकमेच्या एक पंचमांशाइतक्या ऐवजाबद्दलचे कन्वेयन्सास (नंबर २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) फैन किंवा प्रीमियम घेऊन लीस दिलें असेल व भाडें लिहिलें नसल्यास. | लीसांत फैन किंवा प्रिमियम लिहिलें असेल त्या फैनचे |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
| --- | --- |
| | किंवा प्रीमियमचे रकमेइतक्या किंवा किंमतीइतक्या ऐवजाबद्दलचे कन्वेयन्सास (नं. २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (क) भाडें लिहिलें असेल त्याखेरीज आणखी फैन किंवा प्रीमियम घेऊन लीस दिलें असल्यास. | फैन किंवा प्रीमियम दिलें नसतें तर तसे लीसास जी ड्यूटी पडती त्या ड्यूटीखेरीज आणखी लीसांत लिहिलेल्या फैनाचे किंवा प्रीमियमचे रकमेइतक्या किंवा किंमतीइतक्या ऐवजाबद्दलचे कन्वेयन्सास (नं. २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| परंतु असें ठरविलें आहे कीं, किंमतीप्रमाणें लीसास जो स्टांप जरूर आहे तितका स्टांप लीस करून देण्याविषयींचे करारास लावलेला असेल व त्या कराराप्रमाणें लीस पुढें करून देण्यांत येईल तेव्हां त्या लीसाची ड्यूटी आठ आण्यांहून अधिक पडणार नाहीं. | |
| **माफी.** | |
| (अ) कोणत्याही लागवड करणाराचे प्रसंगीं व लागवड करण्याच्या कारणांसाठीं (यांत अन्न व पेय पदार्थ यांचें उत्पन्न करण्यासाठींच्या झाडांचे लीसाचा समावेश होतो) कोणताही फैन किंवा प्रीमियम दिल्यावांचून करून दिलेलें लीस, जेव्हां नियमित मुदत लिहिली असेल व ती मुदत एका वर्षाहून अधिक नसेल तेव्हां, अथवा जेव्हां (लीसांत) लिहिलेलें वार्षिक भाडें शंभर रुपयांहून अधिक नसेल तेव्हां ; | |
| (ब) सन १८७५ चा बर्मा फिशरी आक्ट याअन्वयें किंवा सन १८८९ चा उत्तर ब्रह्मदेशांतील जमीन व महसूल यांचें नियमन करण्याबाबदचा आक्ट याअन्वयें दिलेले मासळी मारण्याच्या जागांचे लीस. | |
| ३६. **कोणत्याही कंपनींतील** किंवा करण्याचें योजलेल्या कंपनींतील शेरांचें अथवा कोणत्याही कंपनीनें किंवा करण्याचें योजलेल्या कंपनीनें कर्जाऊ पैका काढावयाचा त्याबाबद शेरांचें लेटर आफ् अलाटमेंट (शेर वांटून देण्याचें पत्र). | एक आणा. |
| सर्टिफिकेट किंवा इतर दस्तऐवज (नं. १९) हेंही सदर पाहा. | |
| ३७. **लेटर आफ् क्रेडिट** (भलावण पत्र), ह्मणजे, ज्या कोणत्याही दस्तऐवजावरून एक मनुष्य दुसऱ्या मनुष्यास खालीं लिहिलेला अधिकार देतो तो दस्तऐवज, ह्मणजे ज्या मनुष्याविषयीं तो दस्तऐवज लिहिला असेल त्यास पैका भिरावा असा अधिकार देतो तो दस्तऐवज. | एक आणा. |
| ३८. **लेटर आफ् लैसेन्स,** ह्मणजे धनकोंनीं आपले दावे निर्दिष्ट केलेल्या मुदतीपर्यंत तहकूब करावे व रिणकोचे नजरेस येईल त्याप्रमाणें त्यास आपलें काम चालवूं द्यावें ह्मणून रिणकोच्या व त्याचे धनकोंच्या दरमियान झालेला कोणताही करार. | दहा रुपये. |

[ ]

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| ३९. **कोणत्याही कंपनीचें मेमोरांडम आफ् असोसिएशन—** | |
| (अ) सन १८८२ च्या हिंदुस्थानच्या कंपन्यांविषयींच्या आक्टाच्या ३७ व्या कलमाअन्वयें दिलेलीं आर्टिकल्स आफ् असोसिएशन सोबत असतील तेव्हां. | पंधरा रुपये. |
| (ब) सदर्हूप्रमाणें सोबत नसतील तेव्हां ... ... ... ... | चाळीस रुपये. |
| **माफी.** | |
| जी असोसिएशन फायद्यासाठीं स्थापिलेली नसून सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट, कलम २६, ह्याअन्वयें रेजिस्टर केली असेल अशा कोणत्याही असोसिएशनाचें मेमोरांडम. | |
| ४०. **गहाणखत,** जें, गहाणाबाबद करार (नं. ६), बाटमूरी बांड (नं. १६), पिकाचें गहाणखत (नं. ४१), रिस्पांडेन्शियाबांड (नं. ९६), किंवा जामीन कतवा (नं. ९७), नसेल तें— | |
| (अ) त्या खतांत लिहिलेल्या मिळकतीचा किंवा त्या मिळकतीच्या कोणत्याही भागाचा कबजा गहाण ठेवणारानें दिला असेल किंवा देण्याचा करार केला असेल तव्हां. | त्या खतांत निश्चित केलेल्या रकमेइतक्या ऐवजाचे कन्वेयन्सास (नं. २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) सही करून देतेवेळीं सदर्हू प्रमाणें कबजा दिला नसेल किंवा देण्याचा करार केला नसेल तेव्हां. | त्या खतांत निश्चित केलेल्या रकमेच्या बांडास (नं. १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| खुलासा—जो कोणी गहाण ठेवणारा भाडीं वसूल करण्याकरितां मुख्त्यारनामा किंवा गहाण ठेवलेल्या मिळकतीचें किंवा त्याच्या भागाचें लीस देतो त्यानें ह्या रकमेच्या अर्थाअन्वयें कबजा दिला असें समजावें. | |
| (क) तें खत पोट-तारण किंवा साह्यकारी तारण किंवा जादा तारण किंवा मोबदला तारण असेल तेव्हां, अगर मुख्य किंवा मूळ तारण खतास योग्य रीतीनें स्टांप लावलेला असेल त्या बाबतींत वर सांगितलेल्या कारणासाठीं आणखी खातर लेख ह्मणून असेल तेव्हां— | |
| रु. १००० यांहून अधिक नाहीं अशा निश्चित केलेल्या प्रत्येक रकमेस ... | आठ आणे. |
| आणि रु. १००० यांहून अधिक अशा निश्चित केलेल्या प्रत्येक १००० रुपयांस किंवा त्यांचे भागास. | आठ आणे. |
| **माफी.** | |
| (१) सन १८८३ चा जमीन सुधारणा कर्ज आक्ट याअन्वयें तगाई घेणारे मनुष्यांनीं करून दिलेले किंवा त्या मनुष्यांचे जामिनांनीं सदर्हू प्रकारचे तगाईचे ऐवजाचा परत भरणा करण्यासाठीं जामिनकीबद्दल करून दिलेले दस्तऐवज. | |
| (२) बिल् आफ् एक्श्चेंज (हुंडीपत्री) बरोबर असणारें लेंटर आफ् हैपाथिकेशन (जंगम माल गहाण लावून देण्याचें खत). | |
| (३) मालाचें गहाणखत, त्यावर साक्ष घातलेली नसेल तर. | |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| ४१. **पिकाचें गहाणखत,** यांत, एकादें पीक गहाण लावून घेऊन, मग तें पीक असें गहाण लावून घेतेवेळीं विद्यमान असो अगर नसो, अशा गहाणावर दिलेल्या कर्जाच्या फेडीसाठीं कबुलायतीच्या स्वरूपाचा केलेल्या कोणत्याही दस्तऐवजाचा समावेश होतो— | |
| (अ) असा कर्जाऊ दिलेला पैका त्या दस्तऐवजाचे तारखेपासून तीन महिन्यांहून जास्त नसणाऱ्या मुदतींत परत देण्याचा असेल तेव्हां— | |
| रु. २०० याहून अधिक नाहीं अशा प्रत्येक निश्चित केलेले रकमेवर ... | एक आणा. |
| आणि रु. २०० याहून अधिक अशा प्रत्येक निश्चित केलेल्या २०० रुपयांवर किंवा त्यांचे भागावर. | एक आणा. |
| (ब) असा कर्जाऊ दिलेला पैका त्या दस्तऐवजाचे तारखेपासून तीन महिन्यांनंतर परंतु एका वर्षाहून अधिक नसणाऱ्या मुदतींत परत देण्याचा असेल तेव्हां— | |
| रु. १०० याहून अधिक नाहीं अशा निश्चित केलेल्या प्रत्येक रकमेवर. ... | चार आणे. |
| आणि रु. १०० यांहून अधिक अशा निश्चित केलेल्या प्रत्येक १०० रुपयांवर किंवा त्यांचे भागावर. | चार आणे. |
| ४२. **नोटोरियल आक्ट,** ह्मणजे नोटरी पब्लिक हा आपलीं हुद्द्याचीं कर्तव्यकर्में करतांना त्याणें, अथवा नोटरी पब्लिक ह्मणून कायदेशीर रीतीनें काम करणाऱ्या इतर मनुष्यानें केलेला किंवा सही केलेला कोणताही दस्तऐवज किंवा शेरा किंवा टांचण किंवा साक्षीघालणें किंवा सर्टिफिकेट किंवा मजकूर लिहिणें (प्रोटेस्ट नं. ५० नसलेला). | एक रुपया. |
| बिलाचें किंवा नोटीचें प्रोटेस्ट (नं. ५०) हेंही पहा. | |
| ४३. **टांचण किंवा यादी,** आपले मुख्याचे खातीं वीस रुपयांहून अधिक किंमतीचा कोणताही माल किंवा स्टाक किंवा बाजारांत विकण्याजोगी सिक्यूरिटी (पैक्याचा दस्तऐवज) विकत घेतल्याचें किंवा विकल्याचें कळविण्याविषयीं त्या मुख्यास दलालानें किंवा आडत्यानें पाठविलेली. | एक आणा. |
| ४४. **नोट आफ् प्रोटेस्ट** तारवाच्या मास्तरानें करावयाची ... ... ... | आठ आणे. |
| **पैका धिरण्याविषयींचा हुकुम**—बिल् आफ् एक्श्चेंज (नं. १३), पाहा. | |
| ४५. **वांटणीपत्र,** [कलम २ (१४) यांत व्याख्या केल्याप्रकारचें] ... ... | वांटून दिलेल्या मालमिळकतीची किंमत त्या दस्तऐवजांत लिहिली असेल त्या किंमतीच्या रकमेचे बांडास (नंबर १५) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| मात्र असें ठरविलें आहे कीं, तीस वर्षांहून जास्त नसणाऱ्या मुदतीच्या रेव्हेन्यू ठरावाखालीं [सेटलमेंटाखालीं] धारण केलेल्या व सरकारास भर सारा भरणाऱ्या जमिनीच्या बाबतींत, ड्यूटीची रकम अशा जमिनीच्या वार्षिक महसुलाच्या पांचपट रकमेवर पडणाऱ्या ड्यूटीहून जास्त असूं नये. कलम २९ (ह) हेंही पाहा. | |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| ४६. **सरकत.** | |
| **अ.— सरकतीचा दस्तऐवज—** | |
| (अ) सरकतीचें भांडवल ५०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हां ... | दोन रुपये आठ आणे. |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... .. | दाहा रुपये. |
| **ब.—सरकत मोडण्याचा दस्तऐवज** ... ... ... ... | पांच रुपये. |
| ४७. **विम्याची पालिसी —** | |
| अ.—समुद्राच्या विम्याची — | |
| (१) कोणत्याही सफरीबद्दल अगर सफरीवर केलेल्या समुद्राच्या विम्याच्या बावतींत— | |
| (१) प्रीमियम अगर मोबदल्याचीं रकम पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेवर दर शेंकडा दोन आणे ह्मणजे एक अष्टमांश टक्का ह्यापेक्षां जास्त नसेल तेव्हां. | एक आणा. |
| (२) इतर कोणत्याही बावतींत, पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेच्या दर हजार रुपयांच्या पुऱ्या रकमेबद्दल आणि तसेंच हजार रुपयांच्या कोणत्याही अंशाबद्दल. | दोन आणे. |
| (२) कांहीं मुदतीपर्यंतच्या समुद्राच्या विम्याच्या बावतींत— | |
| (३) पालिसींत ठरलेल्या विम्याच्या रकमेच्या दर हजार रुपयांच्या पुऱ्या रकमेबद्दल आणि तसेंच हजार रुपयांच्या कोणत्याही अंशाबद्दल— | |
| विमा साहा महिन्यांपेक्षा जास्त मुदतीचा उतरला नसेल तेव्हां.... .. | दोन आणे. |
| विमा साहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीचा असून बारा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीचा उतरला नसेल तेव्हां. | चार आणे. |
| ब.—आगीच्या विम्याची— | |
| (१) अवल पालिसीच्या बावतींत— | |
| रु. १००० याहून अधिक अशा विमा उतरलेल्या प्रत्येक रकमेस, आणि तसेंच १००० रुपयांवरील विमा उतरलेल्या प्रत्येक १००० रुपयांवर किंवा त्यांच्या अंशावर कांहीं मुदतीपर्यंत— | |
| (१) ती मुदत एक महिन्याहून अधिक नसेल तेव्हां ... ... ... | दोन आणे. |
| (२) ती मुदत एक महिन्याहून अधिक परंतु तीन महिन्यांहून अधिक नसेल तेव्हां | तीन आणे. |
| (३) तीन महिन्यांहून अधिक परंतु सहा महिन्यांहून अधिक नसेल तेव्हां ... | चार आणे. |
| (४) सहा महिन्यांहून अधिक असेल तेव्हां ... ... ... ... | सहा आणे. |
| (२) जी पालिसी साहा महिन्यांची किंवा त्याहून कोणत्याही कमी मुदतीची दिली असून तिच्याबद्दल व ती पूर्वी नवीन केली असल्यास त्याबद्दल, ती पालिसी मूळचीच सहा महिन्यांहून अधिक मुदतीची दिली असती तर, जी ड्यूटी पडली असती ती ड्यूटी आधींच दिलेली नाहीं अशी पालिसी चालू ठेवण्यासाठीं ती नवीन केल्याबाबद. | अशी नवीन केलेली पालिसी जेवढ्या रकमेची व मुदतीची असेल तेवढ्या रकमेच्या व मुदतीच्या अवल पालिसीबाबद द्यावयाच्या ड्यूटीइतकीच ड्यूटी; किंवा |

## परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| | अशी पालिसी मुळचीच साहा महिन्यांहून अधिक मुदतीची दिली असती तर जी ड्यूटी पडली असती ती ड्यूटी, आणि अशा पालिसीबद्दल व अशी पालिसी नवी केली असल्यास त्याबद्दल जी ड्यूटी आधींच दिली असेल ती ड्यूटी यांच्या मधील तफावत; या दोहोंतून जी कोणतीही रकम कमी असेल तेवढी ड्यूटी पडेल. |
| क—रेलवेवरील अपायांबाबदच्या विम्याची—फक्त एकेरी प्रवासाकरितां चालणारी रेलवेवरील अपायांबाबदची कोणत्याही रेलवेवरून प्रवास करणाऱ्या उतारूस दिली असेल तेव्हां– | एक आणा. |
| **माफी.** | |
| कोणत्याही रेलवेवर इंटरमीजिएट किंवा तिसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या उतारूस दिली असेल तेव्हां कोणतीच ड्यूटी पडणार नाहीं. | |
| ड—जीविताच्या अगर दुसऱ्या विम्याची, ह्या नंबरांच्या इ भागांत सांगितला आहे तसा पुन्हा उतरलेला विमा खेरीज करून— | |
| रु. १००० याहून अधिक नाहीं अशा विम्याच्या प्रत्येक रकमेवर, आणि तसेंच १००० रुपयांवरील विम्याच्या प्रत्येक १००० रुपयांवर किंवा त्यांच्या अंशावर— | |
| (१) एकेरी उतरला असेल तेव्हां ... ... ... ... ... | सहा आणे. |
| (२) दुहेरी उतरला असल्यास प्रत्येक भागास ... ... ... .. | तीन आणे. |
| **माफी.** | |
| पोस्टखात्याकडील जिवाचा विमा याबाबद हिंदुस्थान सरकारच्या अधिकारानें केलेल्या कानूंबरहुकूम हिंदुस्थानच्या पोस्टखात्याचे डिरेक्टर जनरल यांनीं दिलेल्या जिवाच्या विम्याच्या पालिसी. | |
| इ.—समुद्राच्या विम्याची पालिसी अगर आगीच्या विम्याची पालिसी ज्या कोणत्याही विम्याच्या कंपनीनें दिलेली असेल अशा कोणत्याही विम्याचे कंपनीनें, असल पालिसींवरून उतरलेल्या विम्याच्या रकमेचा विवक्षित भाग भरून देण्याच्या हमीदाखल अगर जिम्म्यादाखल दुसऱ्या कोणत्याही कंपनीबरोबर पुनः विमा उतरणें. | एक रुपया. |
| **साधारण माफी.** | |
| विम्याची पालिसी करून देण्याविषयींचें लेटर आफ् कवर किंवा लेटर आफ् एंगेजमेंट ( विम्याचा कवाला ); | |
| परंतु असें ठरविलें आहे कीं, सदर्हू प्रकारचे (विम्याचे) पालिसीकरितां या आक्टांत जितका स्टांप सांगितला आहे तितका स्टांप सदर्हू प्रकारचे लेटरावर किंवा | |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| एंगेजमेंटावर असल्यावांचून त्यावरून कशाबद्दलही दावा करतां येणार नाहीं अथवा त्यांत लिहिलेली (विम्याची) पालिसी देणें अवश्य पाडण्याचे कारणाखेरीज इतर कोणतेही कारणासाठीं तो चालणार नाहीं. | |
| ४८. **पावर आफ् अटर्नी** ( मुखत्यारनामा ), [ कलम २ (२०) यांत व्याख्या केल्याप्रकारचा ], प्राक्सी, नंबर ५२, नाहीं असा— | |
| (अ) एकाच व्यवहाराचे संबंधानें एक किंवा अधिक दस्तऐवज नोंदण्या-करितां केवळ हजर करविण्याच्याच कारणासाठीं, अगर असे एक किंवा अधिक दस्तऐवज करून देण्याचें मान्य करण्याचे कारणासाठीं, केला असेल तेव्हां. | आठ आणे. |
| (ब) सन १८८२ चा इलाक्यांतील स्मालकाज कोर्टासंबंधीं आक्ट या अन्वयें दाव्यांत अगर चालविलेल्या कामांत लागेल तेव्हां. | आठ आणे. |
| (क) रकम (अ) यांत सांगितलेल्या प्रसंगाखेरीज इतर कोणत्याही एकाच व्यवहारांत काम करण्यासाठीं एका किंवा अधिक मनुष्यांस अधिकार देण्याचा असेल तेव्हां. | एक रुपया. |
| (ड) एकाहून अधिक व्यवहारांत किंवा सामान्यतः एकाजती एकामती व प्रत्येकीं काम करण्याचा अधिकार पांचांहून अधिक नाहीं इतक्या मनुष्यांस देण्याचा असेल तेव्हां. | पांच रुपये. |
| (इ) एकाहून अधिक व्यवहारांत किंवा सामान्यतः एकाजती एकामती व प्रत्येकीं काम करण्याचा अधिकार पांचांहून अधिक परंतु दहांहून अधिक नाहीं इतक्या मनुष्यांस देण्याचा असेल तेव्हां. | दहा रुपये. |
| (फ) ऐवजाबाबद द्यावयाचा असेल, व कोणत्याहि मालमिळकतीची विक्री करण्याचा अधिकार देण्याचा असेल तेव्हां. ... | तितक्याच रकमेबद्दल कन्वेयन्सास (नंबर २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ग) इतर कोणत्याहि प्रसंगीं ... ... ... ... ... | अधिकार दिलेल्या प्रत्येक मनुष्याबद्दल एक रुपया. |
| *खुलासा.*—एकाच पेढीचीं एकाहून अधिक मनुष्यें असतील तीं या रकमेच्या कारणासाठीं एकच मनुष्य आहे असें समजावें. | |
| ४९. **प्रामिसरी नोट.** [कलम २ (२१) यांत व्याख्या केल्याप्रकारची]— | |
| (अ) तिचे तारखेनंतर एका वर्षाहून अधिक मुदतीनें तिचा ऐवज द्यावयाचा असा उल्लेख केला असेल तेव्हां. | तितक्याच रकमेबद्दल बांडास (नंबर १५) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) असा उल्लेख केला नसेल तेव्हां ... ... ... ... | तितक्याच रकमेबद्दल मागितला असतां ऐवज द्यावयाचा असें नसलेलें बिल आफ् एक्श्चेंज [नंबर १३ (ब)] यास जितकी ड्यूटी पडते तितकी. |

परिशिष्ट १ लें (चालू).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
| --- | --- |
| ९०. **बिलाचें किंवा नोटीचें प्रोटेस्ट,** ह्मणजे, बील आफ् एक्श्चेंज किंवा प्रामिसरी नोट सकारण्यास नाहीं ह्मटल्याबद्दल नोटरी पब्लिक यार्णे किंवा नोटरी पब्लिक ह्मणून कायदेशीर रीतीनें काम करणाऱ्या इतर मनुष्यानें केलेला कोणताही लेखी इकरार. | एक रुपया. |
| ९१. **तारवाचे मास्तराचे प्रोटेस्ट,** ह्मणजे, तोट्याचे हिशोबाचा निकाल करण्यासाठीं किंवा आवरेजचा हिशोब करण्यासाठीं तारवाच्या मास्तरानें तारवाच्या सफरेच्या तपशिलाचा कोणताही इकरार लिहून काढला असेल तो आणि चार्टरांनीं ( तारू नोरी करणारांनीं) तारवांत माल न चढविल्याबद्दल किंवा कन्सैनींनीं (ज्यांवर माल पाठविला असेल त्यांणीं) तारवांतून माल न उतरल्याबद्दल त्यांच्या विरुद्ध त्याणें जो जो लेखी इकरार केला असेल तो, त्या इकरावर नोटरी पब्लिकानें किंवा नोटरी पब्लिक ह्मणून कायदेशीर रीतीनें काम करणाऱ्या इतर मनुष्यानें साक्ष घातली असेल किंवा दाखला लिहिला असेल तेव्हां.<br>तारवाच्या मास्तराचे प्रोटेस्टाची नोट ( नंबर ४४. ) ही पाहा ... ... | एक रुपया. |
| ९२. (अ) ज्या एकाद्या संस्थापित किंवा एकव्यक्तिभूत मंडळीच्या स्टाकाचे किंवा फंडांचे शेर केलेले असतील व ते दुसऱ्याचे नांवावर करतां येत असतील त्या कंपनीच्या अगर मंडळीच्या मेंबराच्या, (ब) स्थानिक अधिकाऱ्यांच्या किंवा (क) कोणत्याही संस्थेच्या प्रोप्रैटराच्या (मालकाच्या), मेंबरांच्या किंवा फंडांचे वर्गणीदारांच्या कोणत्याहि एका सभेंत मत देण्याचा अधिकार कोणत्याही मनुष्यास देण्याविषयींचें प्राक्सी (मत देण्याचें अधिकारपत्र ). | एक आणा. |
| ९३. **पावती** [कलम २ (२२) यांत व्याख्या केल्याप्रकारची] कोणतेही पैक्याची किंवा इतर मालाची रकम किंवा किंमत वीस रुपयांहून अधिक असेल तेव्हां त्या पैक्याबद्दलची किंवा इतर मालाबद्दलची.<br>**माफी.**<br>पावती—<br>(अ) योग्य रीतीनें स्टांप मारलेल्या, किंवा तिसऱ्या कलमांतील विशेष ठराव (सरकारच्या वतीनें करून दिलेले दस्तऐवज याअन्वयें माफी असणाऱ्या कोणत्याही दस्तऐवजांत लिहिलेला ऐवज पोंहचला अशा मजकुराची किंवा त्या दस्तऐवजावरून निश्चित केलेला मुद्दल पैका किंवा व्याज किंवा आन्युइटि किंवा मुदती मुदतीनें मिळावयाचा इतर ऐवज पोंहो-चला अशा मजकुराची त्या दस्तऐवजाचे पाठीवर किंवा त्या दस्त-ऐवजांत लिहिलेली;<br>(ब) कन्सिडरेशनावांचून पैका दिल्याबद्दल;<br>(क) सरकारी महसुलाची आकारणी वसविलेल्या जमिनीबाबद किंवा ( मद्रास व मुंबई इलाख्यांत ) इनाम जमिनींबाबद लागवड करणारानें भाड्याचा कोणताही पैका दिल्याबद्दल ;<br>(ड) मलिका माआझमांच्या लष्करांतील किंवा मलिका माआझमांच्या हिंदु-स्थानच्या लष्करांतील गैरसनदी अमलदारांनीं किंवा शिपाई जेव्हां असे अमलदार किंवा शिपाई या नात्यानें चाकरी करीत असतील तेव्हां त्यांनीं किंवा पोलीस स्वारांनीं पगार किंवा नेमणुका पोहोंचल्याबद्दल दिलेली ; | एक आणा. |

परिशिष्ट १ लें ( चालू )

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| (इ) फ्यामिली सर्टिफिकिटें धारण करणारांनीं दिलेल्या; मात्र अशा प्रसंगीं पावतींतील रकम ज्या मनुष्यानें आपल्या पगारांतून किंवा नेमणुकींतून सोंपून दिली असेल तो मनुष्य सदहू दोहों लष्करांपैकीं कोणत्याहि एका लष्करांतील गैरसनदी अमलदार किंवा शिपाई असून सदहू प्रकारच्या नात्यानें चाकरी करीत असला पाहिजे; | |
| (फ) ज्या मनुष्यांस सदहू प्रकारचे गैरसनदी अमलदार किंवा शिपाई या नात्यानें त्यांनीं केलेल्या चाकरीबदल पेनशनें किंवा नेमणुका पोंहचत असतील व जे इतर कोणत्याही नात्यानें सरकारची चाकरी करीत नसतील त्यांणीं त्या पेनशनाबदल किंवा नेमणुकीबदल दिलेली ; | |
| (ग) मुख्यानें किंवा लंबरदारानें आपण वसूल केलेल्या जमीन महसुलाबदल किंवा कराबदल दिलेली ; | |
| (ह) कोणतेही सावकाराजवळ पैका किंवा पैक्याच्या सिक्यूरिटी (दस्तऐवज) ठेवल्या असून त्यांचा हिशोब द्यावयाचा असेल त्या पैक्याबद्दल किंवा सिक्यूरिटींबद्दल दिलेली : मात्र असें ठरविलें आहे कीं ज्या मनुष्यास त्या पैक्याचा किंवा सिक्यूरिटींचा हिशोब द्यावयाचा त्या मनुष्याखेरीज इतर कोणत्याहि मनुष्याकडून तो पैका किंवा त्या सिक्यूरिटी पोंहचल्या असें त्या पावतींत लिहिलेलें नसावें ; | |
| आणखी असेंही ठरविलें आहे कीं कोणतीही संस्थापित कंपनी किंवा तशीच दुसरी मंडळी स्थापिली असेल किंवा पुढें स्थापन करण्याचें योजिलें असेल किंवा इरादा असेल तिचे शेर वांटून देण्याचे पत्रावरून, किंवा स्क्रिपाचे किंवा शेराचे कॉलाबाबद, किंवा जो डिबेंचर बाजारांत विकण्याजोगी सिक्यूरिटी असेल त्या डिबेंचराबाबद भरलेल्या किंवा अनामत ठेवलेल्या पैक्याचे पावतीस ही माफी लागू नाहीं. | |
| ६४. **गहाण ठेवलेल्या मिळकतीचें रीकन्वेयन्स—** | |
| (अ) ज्या ऐवजाबद्दल मिळकत गहाण ठेवली तो रु. १००० यांहून अधिक नसेल तर. | रीकन्वेयन्सांत जो ऐवज लिहिला असेल त्या ऐवजाच्या रकमेच्या कन्वेयन्सास (नंबर २३) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... .. | दाहा रुपये. |
| ६५. **फारिखत,** ह्मणजे, ज्या कोणत्याही दस्तऐवजावरून कोणी मनुष्य दुसऱ्या मनुष्यावरील किंवा कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या मालमिळकतीवरील दावा सोडून देतो तो दस्तऐवज— | |
| (अ) दाव्याची रकम किंवा किंमत रु. १००० यांहून अधिक नसेल तर... | फारखतींत जी रकम किंवा किंमत लिहिली असेल त्या रकमेच्या किंवा किंमतीच्या बांडास (नंबर १५) जितकी ड्यूटी पडते तितकी. |

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
| --- | --- |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... .. | पांच रुपये. |
| ५६. **रेस्पांडेन्सिया बांड,** (आवकाचें खत), ह्मणजे, तारवावर चढविलेल्या किंवा चढवावयाच्या मालावर पैका कर्जी काढला असून तो माल ज्या बंदरीं जावयाचा त्या बंदरीं तो पोंहचला तर पैका परत देऊं अशा मजकुराचा कोणताही दस्तऐवज. | कर्जी काढलेल्या रकमेबद्दल बांडास (नंबर १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| **कोणताही ट्रस्ट किंवा सेटलमेंट रद्द करण्याचा दस्तऐवज.** सेटलमेंट ( नंबर ५८ ); ट्रस्ट ( नंबर ६४ ; पाहा. | |
| ५७. **जामीन कतबा किंवा गहाणखत,** कोणत्याही हुद्याचें काम योग्य रीतीनें करण्याविषयीं किंवा हुद्याचे सबबीनें पैका किंवा इतर मालमिळकत पोहोंचेल त्याचा हिशोब देण्याविषयीं जामीनकीबद्दल करून दिलें असेल तें, किंवा कराराची योग्य बजावणी निश्चित करण्यासाठीं एकाद्या जामिनानें करून दिलें असेल तें— | |
| (अ) निश्चित केलेली रकम रु. १००० यांहून अधिक नसेल तेव्हां ... | निश्चित केलेल्या रकमेबद्दल बांडास (नंबर १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... ... | पांच रुपये. |
| **माफी.** | |
| बांड किंवा इतर दस्तऐवज खालीं लिहिल्याप्रमाणें करून दिला असेल तेव्हां— | |
| (अ) सन १८७६ च्या बंगालच्या इरिगेशन आक्टाचे ९९ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूवरहुकुम नेमलेल्या मुखत्यांनीं त्या आक्टाअन्वयें आपलीं कर्तव्यकर्में योग्य रीतीनें करण्यासाठीं. | |
| (ब) धर्मार्थ दवाखाना किंवा आस्पिटल किंवा लोकोपयोगी इतर कोणतेंही काम याबद्दलच्या खानगी वर्गणीचें स्थानिक उत्पन्न दरमहा, निर्दिष्ट केलेले रकमेपेक्षां कमी होणार नाहीं अशी हमी देण्यासाठीं कोणत्याही मनुष्यानें; | |
| (क) सन १८७९ चा मुंबईचा इरिगेशन आक्ट याच्या ७० व्या कलमाअन्वयें मुंबई सरकार इन् कोन्सिल यांणीं केलेल्या कानूपैकीं नंबर ३ अ अन्वयें; | |
| (ड) सन १८८३चा जमीन सुधारणा कर्ज आक्ट ह्याअन्वयें तगाई घेणाऱ्या मनुष्यांनीं किंवा त्यांच्या जामिनांनीं अशा तगाईचा ऐवज परत देण्याबद्दल तारण ह्मणून करून दिलेला; | |
| (इ) कोणत्याहि हुद्याचीं कामें योग्य रीतीनें बजाविण्यासाठीं किंवा त्या हुद्याचे सबबीनें पोंहोचलेल्या पैक्याचा किंवा इतर मालमिळकतीचा योग्य रीतीनें हिशोब देण्यासाठीं सरकारी अमलदारांनीं किंवा त्यांच्या जामिनांनीं करून दिलेला. | |
| ५८. **सेटलमेंट.** | |

परिशिष्ट १ लें ( चालू ).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| अ.—सेटलमेंटाचा दस्तऐवज, (यांत मेहरचे खताचा समावेश होतो)...... | अशा सेटलमेंटांत नमूद केलेल्या मिळकतीच्या सेटल केलेल्या रकमेइतके किंवा किंमतीइतके रकमेच्या बांडास (नं. १९) जितकी ड्यूटी पडते तितकी. |
| **माफी.** | |
| (अ) मुसलमानांच्या दरम्यान झालेल्या लग्नाच्या प्रसंगीं करून दिलेलें मेहरचें खत. | |
| (ब) हुदंस, म्हणजे ज्यामध्यें कोणतीच किंमत निर्दिष्ट केलेली नसेल व ज्याबदल १० रुपये ड्यूटी भरली असेल असें धर्मसंबंधी कारणासाठीं ब्रह्म देशांतील एकाद्या बौद्धधर्मीयानें करून दिलेलें स्थावर मिळकतीचें कोणतेंही सेटलमेंट. | |
| ब. सेटलमेंट रद्द करण्याचा दस्तऐवज— ... ... ... | दहा रुपये. |
| ट्रस्ट (नं. ६४) हेंही पहा. | |
| ५९. शेरवारंटें, सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट ह्याअन्वयें काढलेलीं. | अशा वारंटांत निर्दिष्ट केलेल्या शेरांची मूळ रकमेइतक्या ऐवजाचे कन्वेयन्सास (नं. २३) जितकी ड्यूटी द्यावयाची तिचे तीन चतुर्थांश. इतकी. |
| **माफी.** | |
| त्या ड्यूटीच्या ऐवजीं खालील उक्ती रकम कलेक्टर आफ् स्टांप-रेव्हेन्यू यांकडे भरल्यावरच मात्र जीं अमलांत यावयाचीं अशीं सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट, कलम ३० ह्याअन्वयें कोणत्याहि कंपनीनें काढलेलीं शेर वारंटें; सदरहू उक्ती रकम येणेंप्रमाणें— | |
| (अ) कंपनीचा आंकडा भरलेल्या सगळ्या भांडवलावर दर शेंकडा बारा आणे ; किंवा | |
| (ब) ज्या कंपनीनें सदरहू ड्यूटी किंमत उक्ती रकम पुरी भरलेली असेल, तिनें जर तदनंतर आपलें आंकडा भरलेलें भांडवल जास्त शेर-वारंटें काढून वाढविलें, तर याप्रमाणें वाढविलेल्या भांडवलावर दरशेंकडा बारा आणे. | |
| स्क्रिप—सर्टिफिकेट (नं १९), पहा. | |
| ६०. शिपिंग आर्डर, (माल तारवावर चढविण्याबदलचा हुकुम) माल कोणत्याहि तारवावर नेण्याबद्दलची किंवा नेण्यासंबंधी. | एक आणा. |
| ६१. लीस सोडून देण्याचा लेख— | |
| (अ) लीस जेवढी ड्यूटी चार्जहोण्यास पात्र असेल ती ड्यूटी पांच रुपयांहून अधिक नसेल तेव्हां. | तें लीस जेवढी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल तेवढी ड्यूटी. |

## परिशिष्ट १ लें ( चालू ).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
| --- | --- |
| (ब) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... ... | पांच रुपये. |
| **माफी.** | |
| लीस सोडून देण्याचा लेख, जेव्हां त्यो लीसास ड्यूटीची माफी असेल तेव्हां. | |
| ६२. ट्रान्सफर ( दुसऱ्याचे नांवावर करून देण्याचा लेख)-- | |
| (अ) कोणत्याही संस्थापित कंपनींतील किंवा तशाचे इतर मंडळींतील शेरांचा. | शेराचे किंमतीइतके ऐवजाचे कन्वेयन्सास(नंबर२३) द्यावयाचे ड्यूटीचा एक चतुर्थांश. |
| (ब) ८ व्या कलमांत ज्यांच्या संबंधानें ठराव केला आहे ते डिबेंचर खेरीज करून बाजारांत विकण्याजोग्या सिक्यूरिटी असणाऱ्या इतर डिबेंचरांचा मग ते डिबेंचर ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असोत अगर नसोत. | डिबेंचराचे रकमेइतके ऐवजाचे कन्वेयन्सास (नं. २३) द्यावयाचे ड्यूटीचा एक चतुर्थांश. |
| (क) बांडांत, गहाणखतांत किंवा विम्याचे पालिसींत निश्चित केलेले कोणत्याही हक्कसंबंधाचा— | |
| (१) अशा बांडावरील गहाणखतावरील, किंवा पालिसीवरील ड्यूटी पांच रुपयांहून अधिक नसेल तर. | तो बांड, गहाणखत किंवा विम्याची पालिसी, जी ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असेल ती ड्यूटी. |
| (२) इतर कोणत्याही प्रसंगीं ... ... ... ... ... | पांच रुपये. |
| (ड) सन १८७४ च्या आडमिनिस्ट्रेटर जनरलाच्या आक्टाच्या ३१ वे कलमाअन्वयें कोणत्याही मालमिळकतीचा. | दहा रुपये. |
| (इ) ऐवज (दिल्या घेतल्या) वांचून एका ट्रस्टी ( जिम्मेदारा ) कडून दुसऱ्या ट्रस्टीकडे गेलेल्या, किंवा ट्रस्टीकडून बेनिफिशरी (हिताधिकारी) याकडे गेलेल्या कोणत्याही ट्रस्टप्रापर्टीचा. | पांच रुपये. |
| **माफी.** | |
| पाठीवर शेरा लिहून केलेलें ट्रान्सफर-- | |
| (अ) बिल आफ् एक्स्चेंजाचे किंवा चेकाचे किंवा प्रामिसरी नोटीचे; | |
| (ब) बिल आफ् लेडिंग, डिलिव्हरी आर्डर, मालाबदलचें वारंट, किंवा मालावरील सत्ताधिकाराचा इतर सावकारी दस्तऐवज, यांचा; | |
| (क) विम्याचे पालिसीचा; | |
| (ड) हिंदुस्थान सरकारच्या सिक्यूरिटींचा; कलम ८ हेंही पहा. | |
| ६३. लीसाचा ट्रान्सफर, असैन्मेंटाच्या द्वारें, पोट-लीसाच्या द्वारें नव्हे असा. | ट्रान्सफराच्या ऐवजाची जी रकम असेल त्या रकमेइतक्या ऐवजाचे कन्वेयन्सास (नंबर २३) जी ड्यूटी पडते तीच ड्यूटी. |
| **माफी.** | |
| ड्यूटी माफ असलेल्या कोणत्याही लीसाचा ट्रान्सफर. | |

परिशिष्ट १ लें ( समाप्त ).

| दस्तऐवजाचा प्रकार. | स्टांपाची योग्य ड्यूटी. |
|---|---|
| ६४. ट्रस्ट— | |
| अ—ट्रस्टाबाबद ठराव—जेव्हां तो, कोणत्याही मालमिळकतीचा किंवा मालमिळकतीसंबंधी असेल तेव्हां; मात्र तो, मृत्युपत्र किंवा सेटलमेंट नव्हे असा कोणताही लेख करून केलेला असावा. | पंधरा रुपये. |
| ब—ट्रस्ट रद्द करण्याचा लेख—कोणत्याही मालमिळकतीचा किंवा मालमिळकतीसंबंधी; मात्र तो, मृत्युपत्र नव्हे असा कोणताही दस्तऐवज करून केलेला असावा. | दहा रुपये. |
| सेटलमेंट ( नं. ५८. ) हेंही पहा. | |
| किंमतीचे आकारणीचा दस्तऐवज—किंमतीचे आकारणीचा दस्तऐवज ( नं. ८. ), पहा. | |
| वकील—वकील या सदराखालीं ( नं ३० ) दाखल केलेला मजकूर पहा. | |
| ६५. मालाबाबद वारंट, ह्मणजे, ज्यांत नांवानें नमूद केलेल्या मनुष्याचा किंवा त्याचे आसैनींचा किंवा दस्तऐवज धारण करणाराचा कोणत्याही गोदींत किंवा वखारींत किंवा धक्क्यावर असलेल्या कोणत्याही मालावरील स्वामित्वाबाबद हक्क आहे असें ज्यावरून दिसेल तसा कोणताही दस्तऐवज; मात्र त्या दस्तऐवजावर, सदहू माल ज्या मनुष्याचे ताब्यांत असेल त्या मनुष्यानें किंवा त्या मनुष्याच्या वतीनें सही केलेली असावी किंवा दाखला लिहिलेला असावा. | चार आणे. |

## परिशिष्ट २.

### आक्ट रद्द केले ते.

( कलम ७९ पहा ).

| नंबर. | वर्ष. | सरनामा. | किती रद्द केला. |
|---|---|---|---|
| १ | १८७९. | सन १८७९ चा हिंदुस्तानचा स्टांप आक्ट. | सगळा. |
| ६ | १८८२. | सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट. | कलम ३९. |
| ९ | १८८४. | सन १८८४ चा लीगल प्राक्टिशनरांबाबद आक्ट. | कलम १०. |
| १ | १८८८. | सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारण्याबाबद सन १८८८ चा आक्ट. | सगळा. |
| ५ | १८८८. | सन १८८८ चा नवीन युक्तया व नमुने यांबाबद आक्ट. | पहिल्या परिशिष्टाचा जितका भाग सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) याच्या संबंधाचा आहे तितका भाग |

परिशिष्ट २ रें ( समाप्त ).

| नंबर. | वर्ष. | सरनामा. | किती रद्द केला. |
|---|---|---|---|
| १८ | १८८८. | ब्रह्मदेशासाठीं फिनान्शियल कमिशनर नेमण्याचा, व त्याच्या अधिकारांची व्याख्या करण्याचा ठराव करण्याबाबद ॲक्ट. | त्या आक्टाच्या परिशिष्टाचा जेवढा भाग सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ( सन १८७९ चा १ लॉ ) याच्या संबंधाचा आहे तेवढा भाग. |
| ६ | १८८९. | सन १८८९ चा प्रोबेटाबाबद व वहिवाटीबाबद आक्ट. | १८ व्या कलमाचीं पोट-कलमें (३) व (४). |
| २० | १८९०. | सन १८९० चा वायव्येकडील प्रांताचा व अयोध्या प्रांताचा आक्ट. | त्या आक्टाच्या ३८ व्या कलमाचा जितका भाग सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सन ( १८७९ चा १ ला ) याच्या संबंधाचा आहे तितका भाग. |
| १२ | १८९१. | सन १८९१ चा रद्द करण्याचा व सुधारण्याचा आक्ट. | पहिल्या व दुसऱ्या परिशिष्टाच्या पहिल्या भागाचा जितका भाग सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट ( सन १८७९ चा १ ला ) याच्या संबंधाचा आहे तितका भाग. |
| ६ | १८९४. | सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारण्याबाबद सन १८९४ चा आक्ट. | सगळा. |
| १३ | १८९७. | सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारण्याबाबदचा सन १८९७ चा आक्ट. | सगळा. |

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८७९ चा स्टांप आक्ट ठरल्यावेळेपासून स्टांपाचा कायदा निरनिराळ्या दहा कायद्यांनीं सुधारला गेला आहे. हे सर्व कायदे रद्द करण्याचा व त्यांच्या ऐवजीं ते एकत्र करून दुसरा नवीन कायदा करण्याचा प्रस्तुत मसुद्याचा हेतु आहे. तसेंच या मसुद्यांत, स्टांपाच्या कायद्याप्रमाणें काम चालवितें वेळीं त्या कायद्यामध्यें जेथें जेथें व्यंगें दिसून आलीं तेथें तेथें विवक्षित सुधारणा करण्याचेंही योजिलें आहे. जे फेरफार केले आहेत ते [ मूळ इंग्रेजी मसुद्यांत ] इटालिक्स अक्षरांनीं छापले आहेत, आणि ज्या महत्वाच्या सुधारणा करण्याचें योजिलें आहे त्यांचीं कारणें, यांत खालीं सुधारलेल्या रकमांवर ज्या टीपा दिल्या आहेत त्या टीपांमध्यें सांगितलीं आहेत. वर सांगितलेले फेरफार वगैरे पहाण्यास सुलभ पडावें ह्मणून, सन १८७९ च्या हिंदुस्थानच्या स्टांपाच्या आक्टाच्या प्रत्येक कलमाची प्रस्तुत मसुद्यांत कशी व्यवस्था केली आहे-तें दाखविणारें एक तुलनादर्शक कोष्टक या निरूपणास जोडलें आहे.

### रकमांवर टीपा.

रकम २.(२) व (३).—" बिल् आफ् एक्श्चेंज " व "ऐवज मागितला असतां द्यावयाचें बिल् आफ् एक्श्चेंज" यांच्या व्याख्या सन १८९१ चा इंग्लंडचा स्टांपांबाबदचा आक्ट ( व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या ५४ व्या व ५५ व्या वर्षांतील च्याप्टर ३९ ) यांतून घेतल्या आहेत. हें लक्षांत ठेविलें पाहिजे

कीं, ( इंग्लंडांत वहिवाट आहे त्याप्रमाणें ), सदहू व्याख्यांमध्यें, सन १८८१ च्या वेचनी दस्तऐवजां-विषयींच्या आक्टांत दिलेल्या " बिल् आफ् एक्श्चेंज " या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणें जे दस्तऐवज " बिल्स आफ् एक्श्चेंज " च्या वर्गांत धरतां येत नाहींत, परंतु ज्यांची स्टांपाच्या कारणांसाठीं त्याच वर्गांत गणना करणें अवश्य आहे अशा पुष्कळ दस्तऐवजांचा समावेश होतो.

(७) " चेक " ह्या शब्दाच्या व्याख्येंत, सन १८८१ च्या वेचनी दस्तऐवजांविषयींच्या आक्टांत दिलेल्या व्याख्येशीं तिचा मेळ बसेल अशाप्रकारें फेरबदल केला आहे.

(११) " योग्य रीतीनें स्टांप मारलेला " या संज्ञेची व्याख्या सुधारली आहे. दस्तऐवज पहिल्यानें ब्रिटिश इंडियाचे बाहेर केलेला असून त्यावर नंतर ब्रिटिश इंडियांत स्टांप मारलेला असेल त्या प्रसंगीं पूर्वींची व्याख्या क्वचितच लागू होईल असें वाटतें.

(१३) " दस्तऐवज " या शब्दाची व्याख्या जास्त दाखल केली आहे.

(१९) " विम्याची पालिसी " या संज्ञेची व्याख्या अशाप्रकारें सुधारली आहे कीं तींत सर्व प्रकारच्या पालिसींचा समावेश होईल.

(२०) "मुखत्यारनामा" या शब्दाची व्याख्या अशा प्रकारें सुधारली आहे कीं तेणेंकरून ती फक्त मुखत्यारनाम्यांसच लागू होत व तिच्यांत मुख्याचा व गुमास्त्याचा संबंध उत्पन्न करणाऱ्या सर्व करारांचा समावेश होत नाहीं हें स्पष्ट होईल.

(२१) " प्रामिसरी नोट " ( वायदेचिठी ) या संज्ञेची व्याख्या सन १८९१ चा इंग्लंडचा स्टांप आक्ट यांतून घेतली आहे.

(२२) " पावती " या शब्दाच्या व्याख्येंतून " जाहिरातीवरून " हे शब्द गाळून टाकले आहेत, कारण सदहू आक्टांतील ठराव पैका पोहोंचल्याबदलच्या जाहिरातींना लागू नाहींत.

"तारूं," "लेख " व " परिशिष्ट " ह्या शब्दांच्या व्याख्या हल्लीं सन १८९७ च्या सामान्य कलमांच्या आक्टांत दाखल केल्या असल्यामुळें त्यांची गरज नाहीं अशा समजुतीनें त्या या मसुद्यांत गाळल्या आहेत.

रकम ३.—सन १८७९ च्या सदहू आक्टाच्या २ ऱ्या परिशिष्टांत जी सरकारतर्फें सामान्य माफी दिली आहे ती या रकमेच्या विशेष ठरावाच्या रूपानें या मसुद्यांत हल्लीं दाखल केली आहे.

रकम ४.—कोणता दस्तऐवज मुख्य दस्तऐवज समजावा हें ठरविण्याचा पक्षकारांस जो अधिकार दिला आहे त्या अधिकाराचा उपयोग स्टांपाची ड्यूटी टाळण्याच्या कारणासाठीं करूं नये हें स्पष्ट करण्याकरितां या रकमेंत एक विशेष ठराव जास्त दाखल केला आहे.

रकम ८.—यांत इंग्लंडच्या आक्टांतील गुन्हेगारीबाबतची रकम घेऊन ज्यास्त दाखल केली आहे.

रकम ९.— या रकमेंत एक पारिग्राफ जास्त दाखल करून त्यांत ड्यूटींची तोडजोड व एकीकरण यांबाबत ठराव केला आहे.

रकम १२.—चिकटणारे स्टांप कसे रद्द करावे या गोष्टीच्या संबंधानें हल्लींच्या कायद्याप्रमाणें संशय आहे. सदहू प्रकारचे स्टांप रद्द करण्याची योग्य रीति दाखविण्याच्या हेतूनें या रकमेंत एक पारिग्राफ जास्त दाखल केला आहे.

रकम २०.—सदहू सन १८७९ च्या आक्टाचें १९ वें कलम गाळलें आहे, कारण वटावाच्या संबंधानें रुपयाची किंमत उतरल्यामुळें तें कलम लागू होत नाहीं. प्रस्तुत रकमेच्या योगानें सर्व परदेशीय चलनी नाण्याला एकच ठराव लागू केला आहे, व तिच्या दुसऱ्या पारिग्राफाच्या द्वारें स्टांपाच्या ड्यूटीच्या कारणासाठीं वटावाचा दर ठरविण्याची सुलभ योजना केली आहे.

रकम २४.—या रकमेच्या अर्थासंबंधी संशय दूर करण्याच्या हेतूनें त्यांत एक खुलासा व एक उदाहरण हीं जास्त दाखल केलीं आहेत.

रकम २९.—ज्या पुढील काळाची मर्यादा ठरवितां येत नाहीं अशा काळीं सुरू होणाऱ्या आन्युइटींना ही रकम लागू पडेल अशा रीतीनें या रकमेची वाक्यरचना बदलली आहे.

रकम २९.—एकाद्या एस्टेटाची वांटणी करण्याविषयीं मुलकी अधिकाऱ्यानें किंवा दिवाणी कोर्टानें फर्माविलें असून त्या एस्टेटाचा एक भाग कांहीं हिस्सेदारांनीं सामायिक रीतीनें धारण करण्याचें पतकरल्यामुळें त्या भागाची वांटणी व्हावयाची राहिली असेल तेव्हां, त्या भागावर द्यावयाची ड्यूटी माफ करावी असें त्या अधिकाऱ्याच्या किंवा कोर्टाच्या नजरेस आल्यास त्यांना त्याप्रमाणें जेणेंकरून करतां येईल अशा रीतीनें ह्या रकमेची पोट-रकम (ह) सुधारली आहे.

रकम ३३.—"सरकारी हुद्दे" व "सरकारी हुद्दे स्वाधीन असणारीं मनुष्यें" ह्या संज्ञांचा अर्थ दर्शविण्यासाठीं ह्या रकमेंत एक पारिग्राफ जास्त दाखल केला आहे.

रकम ३४.—ही रकम जास्त दाखल केली आहे; कारण हल्लींच्या कायद्याअन्वयें सरकारी हिशोब तपासणाऱ्या एकाद्या अमलदारापुढें एकादी बगरस्टांपाची पावती हजर केलेली असेल तेव्हां, त्यानें तो दस्तऐवज अटकवून ठेवलाच पाहिजे, आणि त्याचे मोबदला योग्य रीतीनें स्टांप मारलेली दुसरी पावती घेण्याचा त्यास अधिकार नाहीं.

रकम ३९.—ज्या पावत्या ज्या मनुष्याच्या कसुरीमुळें बगरस्टांपाच्या राहिल्या असतील त्या पावत्या त्या मनुष्याचे विरुद्ध पुराव्यास घेण्यास हरकत येऊं नये ह्मणून या रकमेंत एक विशेष ठराव जास्त दाखल केला आहे. आणखी एक विशेष ठराव या रकमेंत दाखल करून त्यांत असें ठरविलें आहे कीं, एकाद्या दस्तऐवजावर योग्य रीतीनें स्टांप मारलेला आहे किंवा नाहीं हें पहाण्याचें एकाद्या सरकारी अमलदारानें वर्जिल्यास त्यामुळें तो दस्तऐवज पुराव्यास घेतविण्याच्या पक्षकारांच्या हक्कास बाध येऊं नये.

रकम ३७.—गफलतीमुळें एकादा अयोग्य प्रकारचा स्टांप उपयोगांत आणला असेल त्या प्रसंगीं काय करावें हें ठरविण्यासाठीं ही रकम दाखल केली आहे.

रकम ३९.—ज्या बाबतींत, अर्जी झाली असल्या वांचूनही, काम चालविणें कलेक्टरास योग्य वाटेल त्या बाबतींत त्यास तसें करण्याचा अधिकार या रकमेवरून दिला आहे.

रकम ४४.—या रकमेंत एक पारिग्राफ ज्यास्त दाखल केला असून त्यावरून असें ठरविलें आहे कीं दाव्यांतील एका पक्षकारास दुसऱ्या पक्षकाराच्या कसूरीमुळें स्टांप ड्यूटी देण्याचें भाग पडलें असेल तेव्हां त्याप्रमाणें दिलेली ड्यूटी दाव्याच्या खर्चाप्रमाणें वसूल करावी व ती वसूल करण्यासाठीं वेगळा दावा करण्याची जरूर नाहीं.

रकम ४९.—जेणेंकरून गुन्हेगाऱ्या माफ करण्याचा व त्या परत देण्याचा अधिकार निर्बंध ठेवणाऱ्या मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्यास देतां येईल अशा प्रकारें ही रकम सुधारली आहे. तींत आणखी कोणतीही फाजील ड्यूटी भरली असल्यास ती परत देण्याबाबतही ठराव केला आहे. ह्या रकमेवरून, कलेक्टराच्या हुकुमावर मुख्य रेव्हेन्यू अधिकाऱ्याकडे अपील करण्याचा अयथाविधि हक्क प्राप्त होईल.

रकम ४८.—या रकमेंत ड्यूटी व गुन्हेगाऱ्या वसूल करण्याची सुलभ रीति दिलेली आहे.

रकम ४९.—या रकमेची वाक्यरचना, जेणेंकरून त्यांत दिलेले ठराव विशेष स्पष्ट होतील, व सन १८९१ चा इंग्लंडचा स्टांपाच्या ड्यूटींची व्यवस्था करण्याविषयींचा आक्ट (व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या ५४ व्या व ५५ व्या वर्षांतील चाप्टर ३८.), यांत दिलेल्या त्याचसंबंधाच्या ठरावांशीं ज्यास्त जवळ जवळ जुळतील, अशा प्रकारें बदलली आहे.

रकम ५०.—ही रकम ह्मटली ह्मणजे सन १८७९ च्या सदहू आक्टाच्या ६१ व्या कलमांतील विशेष ठरावाचा उतारा आहे.

रकम ५१.—या रकमेवरून, संस्थापित कंपन्यांनीं दस्तऐवजांच्या छापील नमुन्यांसाठीं उपयोग केलेल्या स्टांपांचे कागदांबदल, अशा नमुन्यांची जरूर राहिली नाहीं असें असल्यास, मोबदला देण्याचा नवीन अधिकार दिला आहे.

रकम ५४.—ह्या रकमेंत स्टांपांच्या लैसेन्सवाल्या विकणारांच्या संबंधानें विशेष तजवीज करण्यासाठीं एक विशेष ठराव जास्त दाखल केला आहे.

रकम ५५.—ही रकम नवीन असून डिबेंचर नवीन करून देण्याचें काम कंपन्यांना सुलभ व्हावें या इरादानें केली आहे.

रकम ५६.—या रकमेंत, कलेक्टर हा सर्व प्रसंगीं निर्बंध ठेवणाऱ्या मुख्य रेव्हिन्यू अधिकाऱ्याचे निर्बंधास पात्र आहे हें स्पष्ट करण्याकरितां एक पारिग्राफ जास्त दाखल केला आहे.

रकम ६१.—या रकमेंत सांगितलेल्या खटल्यांत फौजदारी आणि तसेंच दिवाणी व रेव्हिन्यू कोर्टांनीं केलेल्या निवाड्यांच्या संबंधानें अपील-कोर्टांना जेणेंकरून तपासणी करण्याचा अधिकार देतां येईल अशा प्रकारें ही रकम सुधारली आहे.

रकम ६४.—जीं कृत्यें वर दिलेल्या रकमांखालीं येत नसलीं तथापि जीं ड्यूटीच्यासंबंधानें सरकारास फसविण्याच्या इराद्यानें केलीं असतील त्या कृत्यांचा समावेश करण्यासाठीं यांत एक रकम जास्त दाखल केली आहे.

रकम ६९.— कोणताहि मनुष्य लैसेन्सवाला असो अगर नसो त्यास एक आणा किंमतीचे चिकटणारे स्टांप विकतां येतील हें जेणेंकरून स्पष्ट करतां येईल अशा प्रकारें ही रकम सुधारली आहे. असाच एक विशेष ठराव ७४ वे रकमेंत केलेला आहे.

रकम ७३.— ही रकम अयोग्य रीतीनें स्टांप मारलेले दस्तऐवज शोधून काढण्याचा अधिकार कलेक्टरांस देण्याचे इरादानें दाखल केली असून ती इंग्लंडच्या आक्टांवरून घेतली आहे.

परिशिष्ट १ यावर टीपा.

सामान्य.—कलमांची रचना निव्वळ वर्णानुक्रमाप्रमाणें केली आहे. कलमांसंबंधीच्या माफी एका वेगळ्या परिशिष्टांत न देतां त्या त्या कलमाखालींच छापल्या आहेत, व सामान्य प्रकारच्या ज्या माफी आजपर्यंत वेळोवेळीं जाहीरनामे प्रसिद्धकरून केलेल्या आहेत त्या परिशिष्टांतच नमूद केल्या आहेत. सरकारी खात्यांच्या व्यवहारांसंबंधानें करून दिलेल्या दस्तऐवजांबावद थोड्या माफी सदहूं आक्टांतून गाळल्या आहेत, व त्या, कारभार चालविणारे अधिकारी ज्या मांगी करतील त्यांबरोबर जाहीर करण्यांत येतील.

कलम १.—कर्ज पोंचल्याची पावती. कर्ज पोहोंचल्याबद्दलची साक्ष घातलेली पावती ही स्पष्टपणें एक प्रकारचा बांडच आहे व अशा बांडाप्रमाणेंच तिजवर स्टांप मारणें रास्त आहे.

कलम ६.—गहाणाबावद करार. खतें पत्रें अनामत ठेऊन जें गहाण असतें व ज्याला साधारणपणें रास्त गाहाण ह्मणतात, त्याची गहाणाबाबदच्या कराराप्रमाणें अमलबजावणी होत असून "गहाणाबाबत करार" या सदराखालीं त्याचें चांगल्या रीतीनें वर्णन केलें आहे. त्याबावद द्यावयाची ड्यूटी इंग्लंडच्या आक्टांतून घेतली आहे.

कलम१३.— बिल्स् आफ् एक्स्चेंज. ज्यांचा ऐवज मागणी झाल्यावर दिला पाहिजे अशीं वीस रुपयांहून कमी रकमेचीं बिल्स आफ् एक्स्चेंज ह्यावरच्या स्टांपाच्या ड्यूटींची माफी गाळली आहे. इंग्लंडांत अशा प्रकारची माफी नाहीं. मागणी झाल्याखेरीज इतर रीतीनें ज्यांचा ऐवज द्यावयाचा अशा बिलांवरील ड्यूटीचे बाबतींत कांहींच फेरफार केलेला नाहीं, परंतु पहाण्यास सोईवार पडावें ह्मणून ड्यूटीचें पूर्वीपेक्षां एक ज्यास्त मोठें कोष्टक तयार केलें आहे.

कलम १९.— बांड. सदर्हूप्रमाणेंच बांडांसंबंधानें एक कोष्टक तयार केलें आहे.

कलम १७.— रद्द करण्याचा दस्तऐवज. हें कलम नवीन आहे.

कलम २१.— चेक. वीस रुपयांहून कमी रकमेच्या चेकांवरील स्टांपांच्या ड्यूटीची माफी गाळली आहे. इंग्लंडांत अशा प्रकारची माफी नाहीं.

कलम २३.— कन्वेयन्स. यासंबंधी ड्यूटींत फेरबदल केलेला नाहीं. परंतु पहाण्यास सोईवार पडावें ह्मणून ड्यूटींचें पूर्वीपेक्षां ज्यास्त मोठें एक कोष्टक तयार केलें आहे.

कलम २४.—नकल किंवा उतारा. डुप्लिकेट पावत्यांवर सही केली असेल किंवा साक्ष घातली असेल तेव्हां त्यांवर स्टांप लावावा असें ठरविलें आहे.

कलम २७.—डिबेंचर. हें कलम नवीन आहे. हल्लीं बांडांच्या सामान्य अर्थाखालीं डिबेंचरांची गणना होते, परंतु त्यांचा विचार वेगळ्या कलमांत व्हावा हें अधिक सोयस्कर वाटलें आहे.

कलम ३२.—आणखी चार्जाचा दस्तऐवज. आणखी चार्जाच्या दस्तऐवजाअन्वयें ताबा दिला असेल त्या बाबतींत आणखी जास्त ड्यूटी जेणेंकरून बसवितां येईल अशा प्रकारें या कलमांत फेरफार केला आहे.

कलम ३९.—निरंतरच्या लीसांवर वाजवी ड्यूटी देण्यांत यावी ह्मणून या कलमांत एक विशेष ठराव जास्त दाखल केला आहे.

कलम ४०.—गहाणखत. आणखी खातरलेखांच्या द्वारें दिलेल्या गहाणांच्या बाबतींत तजवीज करण्यासाठीं या कलमांत जास्त मजकूर सन १८९१ च्या इंग्लंडच्या स्टांप आक्टांतून घेऊन दाखल केला आहे. साधारण गहाणाचे

व्यवहार स्टांपड्यूटीस पात्र नाहींत हें स्पष्ट करण्यासाठीं एक माफी जास्त दाखल केली आहे. ताव्यासंबंधीं जो खुलासा दिला आहे तो, ताव्यासह गहाणांवर जी अधिक ड्यूटी द्यावी लागते ती टाळण्याचें बंद करावें या इरादानें दिला आहे.

कलम ४१.—पीकाबाबद गहाण. हें कलम नवीन आहे, परंतु पिकाच्या गहाणाच्या बाबतींत ज्या विद्यमान जाहिरनाम्यावरून ड्यूटी कमी केलेली आहे त्या जाहिरनाम्याचा हा उतारा आहे.

कलम ४७—विम्याच्या पालिसी. या कलमांतील ठराव विशेष स्पष्ट करावे या हेतूनें याची वाक्यरचना बदलली आहे.

कलम ४८.—पावर आफ् अटर्नी (मुखत्यारनामा). असें आढळून आलें आहे कीं विकऱ्या व गहाणें हीं कधीं कधीं मुखत्यारनाम्यांच्या द्वारें केलीं जातात. कन्वेयन्सांस जितकी ड्यूटी द्यावी लागते तितकीच ड्यूटी अशा प्रसंगीं देण्यांत यावी असा ठराव केला आहे. शिवाय या कलमाची रकम (अ) हिची व्याप्ति थोडिशी वाढविली आहे.

कलम ४९.—प्रामिसरी नोट्स (वायदेचिठ्या). मागणी झाल्यावर जिचा ऐवज द्यावयाचा अशी प्रामिसरी नोट ही निरंतर चालणाऱ्या सिक्यूरिटीच्या जातीची आहे, आणि तिच्यावर इंग्लंडांत, मागणी झाल्यावर जिचा ऐवज द्यावयाचा अशा प्रकारची नसणाऱ्या नोटीवर किंवा बिलावर जितकी ड्यूटी द्यावी लागते, तितकीच ड्यूटी पडते. हल्लीं हिंदुस्थानास तोच नियम लागू केला आहे.

कलम ५७.—कराराची योग्य बजावणी होण्यासाठीं बांड करून देणाऱ्या जामिनाच्या बाबतींत ड्यूटीची मुदत लागू केली आहे.

कलम ५८.—सेटलमेंट. इतर कोणताही ट्रस्ट रद्द करण्याच्या दस्तऐवजास जितकी ड्यूटी द्यावी लागते तितकीच ड्यूटी सेटलमेंट रद्द करण्याच्या दस्तऐवजास हल्लीं मुद्दाम चार्ज केली आहे. कर्जे केलेल्या वस्तूंच्या किंमतीचा ज्या दस्तऐवजांत उल्लेख करणें धर्मसंप्रदायाविरुद्ध असतें त्या प्रकारच्या दस्तऐवजांस सदर्हू आक्टाच्या २७ वे कलमाची जेणेंकरून माफी होईल असा एक विशेष ठराव केला आहे.

कलम ५९. शेरवारंटें. हें कलम सन १८८२ चा हिंदुस्थानचा कंपन्यांविषयीं आक्ट, याच्या ३९ वे कलमांतून घेतलें आहे. तें या आक्टांत असणें हेंच ज्यास्त रास्त आहे. त्याबाबदच्या ड्यूटीचा विशेष सुलभ रीतीनें उल्लेख केला आहे व तिची रकम तितकीच आहे.

कलम ६२.—ट्रान्सफर. जे डिबेंचर बाजारांत विकण्याजोग्या सिक्यूरिटी म्हणून असतील ते डिबेंचर ट्रान्सफर करण्याच्यासंबंधानें या कलमांत एक विशेष ठराव केला आहे. ज्यांचा ऐवज, तें आणणारांना द्यावयाचा असतो अशा डिबेंचरांला हें कलम लागू नाहीं.

(सही) जे. वेस्टलंड.

तारीख १९ माहे आक्टोबर सन १८९७.

(सही) जे एम्. म्याक्फर्सन,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

## तुलनादर्शक कोष्टक.

यांत सन १८७९ चा स्टांप आक्ट ( सन १८७९ चा १ ला ) यांतील ठरावांची सन १८९७ च्या स्टांप आक्टाच्या मसुद्यांत कसकशी व्यवस्था केली आहे तें दाखविलें आहे.

| सन १८७९ चा स्टांप आक्ट ( सन १८७९ चा १ ला ). | सन १८९७ चा स्टांप आक्टाचा मसुदा. |
|---|---|
| कलम १.—लहान सरनामा, स्थानिक व्याप्ति व सुरुवात .. ... | १ ल्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम २.—अपवाद ... ... ... ... ... | अनवश्यक ह्मणून गाळलें आहे. सन १८९७चा सामान्य कलमांचा आक्ट, ( सन १८९७ चा १० वा ) कलमें ६, ८ व २४ पहा. |
| कलम ३.—अर्थाचें कलम ... ... ... ... ... | २ ऱ्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ४.—परिशिष्टें आक्टाचे भाग आहेत असें समजून त्यांचा अर्थ करावा. | अनवश्यक ह्मणून गाळलें आहे. सन १८९७चा सामान्य कलमांचा आक्ट, ( सन १८९७ चा १० वा ) कलम ३ (४८) पहा. |
| कलम ५.—ड्यूटी चार्ज होण्यास पात्र असणारे दस्तऐवज ... ... | ३ ऱ्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ६.—एकेच कामांत उपयोग केलेले कित्येक दस्तऐवज ... | ४ थ्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ७.—कित्येक भिन्न भिन्न बाबतींसंबंधी दस्तऐवज ... ... १ ले परिशिष्टांतील निरनिराळ्या व्याख्या लागू असणारे दस्तऐवज. | ५ व्या व ६ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ७. अ.—समुद्राचे विम्याच्या पालिसी ... ... ... | ७ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ७. ब.—सन १८७९ च्या ११ व्या आक्टाअन्वयें पैका कर्जी घेण्यासंबंधीं काढलेले बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले. | ८ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ८.—ड्यूटीचे दर कमी किंवा माफ करण्याचा अधिकार ... | ९ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ९.—ड्यूटी कशा द्याव्या ... ... ... .. | १० व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम १०.—चिकटणारे स्टांपांचा उपयोग ... ... ... | ११ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ११.—चिकटणारे स्टांप रद्द करणें ... .... ... | १२ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम १२.—वठविलेले स्टांप मारलेले कागदावर दस्तऐवज कसे लिहावे... | १३ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम १३.—एका स्टांपावर एकच मात्र दस्तऐवज असावा ... .. | १४ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम १४.—१२ वे किंवा १३ वे कलमांत सांगितलेल्या रीतीविरुद्ध लिहिलेला दस्तऐवज वगरस्टांपाचा आहे असें समजावें. | १५ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम १५.—ड्यूटी दर्शविणें... ... ... ... .... | १६ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम १६.—ब्रिटिश इंडियांत करून द्यावयाचे दस्तऐवज ... ... | १७ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम १७.—बिलें व चेक व नोटी यांखेरीज इतर दस्तऐवज ब्रिटिश इंडियाबाहेर करून दिले असतील ते. | १८ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम १८.—ब्रिटिश इंडियाबाहेर लिहिलेलीं बिलें व चेक व नोटी ... | १९ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम १९.—कित्येक चालू नाण्यांत लिहिलेले रकमेचा दुसरे नाण्यांत हिशेब करणें. | गाळलें आहे, व त्यांचा समावेश २० व्या रकमेंत केला आहे. |
| कलम २०.—इतर पारके चालू नाण्यांत लिहिलेले रकमेचा दुसरे नाण्यांत हिशेब करणें. | २० व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |

| सन १८७९ चा स्टांप आक्ट ( सन १८७९ चा १ ला ). | सन १८९७ चा स्टांप आक्टाचा मसुदा. |
| --- | --- |
| कलम २१.—स्टाकाची व बाजारांत विकतां येते अशा सिक्यूरिटीची किंमत करणें. | २१ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम २२.—वटावाचा दर किंवा भावाचा अजमास लिहिल्याचें फळ ... | २२ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम २३.—व्याज मिळावयाचे दस्तऐवज ... ... ... | २३ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम २४.—कर्जाचे ऐवजीं ट्रान्सफर असेल त्यावर किंवा पुढें ऐवज द्याव-याचा ही गोष्ट वगैरे लागू असणारे ट्रान्सफरावर ड्यूटी कशी चार्ज करावी. | २४ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम २५.—आन्युइटी वगैरेचे प्रसंगीं किंमत करणें ... ... | २५ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम २६.—विषयाची किंमत ठरवितां येत नसेल तेव्हां स्टांप ... | २६ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम २७.—ड्यूटी कमजास्त करणाऱ्या गोष्टी दस्तऐवजांत लिहिणें ... | २७ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम २८.—कित्येक कन्व्हेयन्सांचे प्रसंगीं ड्यूटीबाबद हुकुम ... ... | २८ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम २९.—ड्यूटी कोणीं द्यावी ... ... ... ... | २९ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ३०—योग्य स्टांप कोणता याबाबद ठराव करणें. ... ...<br>सारांश व पुरावा मागण्याचा अधिकार कलेक्टरास आहे. ...<br>विशेष ठराव. ... ... ... ... ... | ३१ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ३१.—कलेक्टरानें देण्याचें सर्टिफिकेट. ... ... ... | ३२ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ३२.—३० वे कलमाअन्वयें फी कशी द्यावी. ... ... | आतां अनवश्यक असल्यामुळें गाळलें आहे. |
| कलम ३३.—दस्तऐवज तपासणें व अटकावून ठेवणें. ... ... | ३३ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ३४—योग्य रीतीनें स्टांप न मारलेले दस्तऐवज पुरावा वगैरेस घेण्याचा अधिकार नाहीं.<br>विशेष ठराव. ... ... ... ... ...<br>ड्यूटी व दंड दिला असतां दस्तऐवज ग्राह्य होतील; आणि फौजदारी चालविलेले कित्येक कामांत दस्तऐवज घेतल्याबाबद तकरार काढूं नये. | ३५ व ३६ व्या रकमांमध्यें उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ३५.—अटकावून ठेवलेले दस्तऐवजांबद्दल कशी व्यवस्था करावी. | ३८ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ३६.—३५ वे कलमाचे पहिले पारिग्राफाअन्वयें दिलेला दंड परत देण्याचा कलेक्टराचा अधिकार. | ३९ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ३७.—अटकावून ठेवलेले दस्तऐवजांवर स्टांप मारण्याचा कलेक्टराचा अधिकार. | ४० व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ३८.—अपायामुळें योग्य रीतीनें स्टांप न मारलेले दस्तऐवज. | ४१ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ३९.—ज्या दस्तऐवजाची ३४ वे किंवा ३७ वे किंवा ३८ वे कलमां-अन्वयें ड्यूटी दिली असेल त्या दस्तऐवजावर शेरा. | ४२ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ४०.—स्टांपाचे कायद्याविरुद्ध केलेले अपराधाबद्दल खटला करणें.<br>विशेष ठराव. ... ... ... ... ... | ४३ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ४१.—ड्यूटी किंवा दंड देणारे मनुष्यांस ती किंवा तो कांहीं प्रसंगीं वसूल करण्याचा अधिकार आहे. | ४४ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |

| सन १८७९ चा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला). | सन १८९७ चा स्टांप आक्टाचा मसुदा. |
|---|---|
| कलम ४२.—३४ वे किंवा ३७ वे कलमांअन्वयें दिलेल्या दंडाची माफी. | ४५ व्या रकमेच्या २ ऱ्या पारिग्राफांत उतरून घेतलें आहे. |
| कलम ४३.—३९ वे कलमाअन्वयें पाठविलेलें दस्तऐवज हरवल्याबद्दल जबाबदारी नाहीं. सदहूप्रमाणें पाठवावयाचे दस्तऐवजाची नकल करण्याचा अधिकार आहे. | ४६ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ४४.—ऐवज देणारास वगरस्टांपाचीं बिलें व नोटी व चेक पोंहचतील त्यांवर स्टांप लावण्याचा त्याचा अधिकार. | ४७ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ४५.—चार्ज होण्यास पात्र असणाऱ्या ड्यूटीविषयीं कलेक्टरास संशय येईल तेव्हां काम चालविण्याची रीति. | ५६ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ४६.—रेवेन्यू अधिकाऱ्यानें हैकोर्टास लिहून पाठविणें. ... | ५७ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ४७.—आणखी तपशील मागविण्याचा कोर्टाचा अधिकार. ... | ५८ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ४८.—लिहून आलेल्याचा निकाल करण्यांत काम चालविण्याची रीति. | ५९ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ४९.—दुसरे कोर्टांनीं हैकोर्टास लिहून पाठविणें. ... ... | ६० व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ५०.—स्टांपाचे पुरतेपणाबाबद कोर्टाचे कित्येक फैसल्यांची तपासणी. | ६१ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ५१.—बिघडलेले स्टांपांबद्दल मोबदला. ... ... ... | ४९ व्या व ५० व्या रकमांमध्यें उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ५२.—करावयाचा तो उपयोग न केलेले स्टांपांबद्दल मोबदला ... | ५२ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ५३.—५१ वे ५२ वे कलमांअन्वयें मोबदला कसा द्यावा. ... | ५३ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ५४.—उपयोग करण्यासाठीं ज्या स्टांपांची जरूर नसेल त्या स्टांपांबद्दल मोबदला. | ५४ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ५५.—स्टांपांचे विक्रीसंबंधी कानू करण्याचा अधिकार. ... | ७४ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ५६.—हा आक्ट एकंदरीनें अमलांत आणण्याविषयीं कानू करण्याचा अधिकार. | ७५ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ५७ (प्यारा १).—कित्येक अधिकार वेळोवेळीं चालविण्याचा अधिकार आहे. | गाळलें आहे. सन १८९७ चा सामान्य कलमांचा आक्ट, (सन १८९७ चा १० वा) कलमें १४ व २१ पहा. |
| कलम ५७ (प्यारा २).—कानू प्रसिद्ध करणें. ... ... ... | ७६ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ५८.—कांहीं प्रसंगीं पावती देण्याची अवश्यकता. ... ... | ३० व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ५९.—कोर्टफीबाबद अपवाद. ... ... ... ... | ७७ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ६०.—आक्टाचें भाषांतर व अनुक्रमणिका करावी व स्वस्त दरानें विकावी. | ७८ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ६१.—योग्य रीतीनें स्टांप न मारलेला दस्तऐवज करून दिल्याबद्दल दंड. | ६२ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ६२.—चिकटणारा स्टांप रद्द करण्यास चुकल्याबद्दल दंड. ... | ६३ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ६३.—२७ वे कलमांतील ठरावाप्रमाणें करण्याचें वर्जिलें असतां दंड. | ६४ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |

| सन १८७९ चा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला). | सन १८९७ चा स्टांप आक्टाचा मसुदा. |
|---|---|
| कलम ६४.—पावती देण्यास नाहीं झटल्याबद्दल व पावत्यांबद्दलची ड्यूटी टाळण्याची युक्ति केल्याबद्दल दंड. | ६९ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ६५.—पालिसी न करण्याबद्दल दंड, किंवा जी कोणतीही पालिसी योग्य रीतीनें स्टांप मारलेली नसेल ती करणें वगैरेबद्दल. | ६६ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ६६.—ज्या बिलाचे किंवा मरीन पालिसीचे सेट ह्मणून असतील त्या बिलांच्या किंवा मरीन पालिसींच्या संपूर्ण प्रती न लिहिल्याबद्दल दंड. | ६७ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ६७.—बिलावर पुढली तारीख घालणें वगैरेबद्दल दंड .. ... महसूल बुडविण्याची इतर युक्ति केल्याबद्दल. ... ... | ६८ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ६८.—स्टांपांचे विकरीसंबंधी कानू तोडल्याबद्दल व हुकुमावांचून विकरी केल्याबद्दल शिक्षा. | ६९ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ६९.—फिर्याद करणें व चालविणें. ... ... ... | ७० व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ७०.—माजिस्ट्रेटांची हुकुमत ... ... ... ... | ७१ व्या रकमेंत उतरून घेतलें आहे. |
| कलम ७१.—इनसाफाची जागा. ... ... ... ... | ७२ व्या रकमेंत उतरून घेऊन सुधारलें आहे. |
| कलम ७२.—इतर कायद्यांचे अमलास बाध येत नाहीं. ... ... | गाळलें आहे. सन १८९७ चा सामान्य कलमांचा आक्ट (सन १८९७ चा १० वा), कलम २६ पहा.<br>खालीं दिलेल्या नवीन रकमा जास्त दाखल केल्या आहेत, ह्मणजे :<br>रकम २ (३), (१२), (१३), (१५) (ड), (१८) (ब), आणि (२१) व रकमा २० (२), ३४, ३७, ४९ (१) व (३), ४८, ५१, ५९, ६२ (२), ७३, व ७९. |

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.